ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : वैदिक विद्वानांचा परिचय भाग २ रा

संपादक : सीताराम विष्णु केळकर

प्रकाशक : पुणें वेदपाठशाळा प्रकाशन, पुणे

प्रकाशन वर्ष : १९६२

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रूपांतर – २०२१

पुणें वेदपाठशाळा प्रकाशन
पुस्तक २रें

893.8

# वैदिक विद्वानांचा परिचय

भाग २ रा

संपादक
सीताराम विष्णु केळकर

893.8
K41
6893

मूल्य चार रुपये

D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00927

पुणें वेदपाठशाळा प्रकाशन

पुस्तक २ रें

# वैदिक विद्वानांचा परिचय

## भाग २ रा

संपादक

सीताराम विष्णु केळकर

शके १८८४

---

मूल्य चार रुपये

प्रकाशक :

श्री. चिं. ग. काशीकर
कार्यवाह, पुणें वेदपाठशाळा
३८, बुधवार पेठ, पुणें २

• • •

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधी

म/८९४

• • •

मुद्रक :

श्री. वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय
३९५ सदाशिव पेठ, पुणें २

मला गायत्री-मंत्रोपदेश करणारे
माझे पूज्य गुरु आणि पितामह
ती. कै. **वामन (आण्णासाहेब)**
**बल्लाळ केळकर**
यांस कृतज्ञतापूर्वक
समर्पण

**सी. वि. केळकर**

893.8
Kel

# प्रकाशकाचे दोन शब्द

'वैदिक विद्वानांचा परिचय – भाग १ ला' श्री. सी. वि. केळकर, पुणें वेदपाठशाळेचे कार्याध्यक्ष, यांनीं लिहिला, तो पाठशाळेतर्फें शके १८७८ मध्यें प्रकाशित करण्यांत आला. या पुस्तकाचा विद्वानांनीं आणि वृत्तपत्रांनीं गौरव केला. एक आवश्यक कर्तव्य अंशतः पार पाडल्याबद्दल वेदपाठशाळेला समाधान वाटत आहे ; पुस्तकाचे लेखक श्री. केळकर यांचीही तीच भावना असणें स्वाभाविक आहे.

पुस्तकाला भाग १ ला असें म्हटलें यावरूनच दुसरा भाग तयार करण्याचा विचार श्री. केळकर यांच्या मनांत त्या वेळीं असल्याचें दिसून येतें. त्यांच्या त्या पुस्तकाच्या निवेदनांतहि ही गोष्ट सूचित झाली आहे. भाग १ ला प्रसिद्ध झाल्यानंतर दुसऱ्या भागाचीही साधनसामग्री जुळविण्याचा उपक्रम श्री. केळकर यांनीं सुरू केला, आणि सवड होईल त्याप्रमाणें मुद्रणप्रतही लिहिण्यास आरंभ केला. पहिल्या भागाप्रमाणें हा दुसरा भागही वेदपाठशाळेतर्फें प्रकाशित व्हावा, अशी पाठशाळेच्या चालकांची इच्छा होती. तिला अनुसरून तसा रीतसर ठरावही संमत करण्यांत आला. श्री. केळकर यांनींही या योजनेला आनंदानें संमति दिली, याबद्दल पाठशाळेच्या चालकांना समाधान वाटत आहे.

पाठशाळेचा ऐंशी वर्षांचा अमृत-महोत्सव साजरा करावा, आणि त्या प्रसंगीं भाग २ चें प्रकाशन करावें असें ठरविण्यांत आलें. अमृत-महोत्सव वस्तुतः शके १८८३ च्या आश्विन महिन्यांत साजरा व्हावयाचा ; परंतु त्यापूर्वीं पानशेतचें धरण फुटल्यामुळें

पुणें शहरांत महापूर आला. पुणें शहराच्या जीवनाची घडीच विसकटल्यामुळें महोत्सव पुढें ढकलणें प्राप्तच होतें. सुदैवानें परिस्थितींत हळुहळु सुधारणा होत गेली आणि संस्थेला एक्यायशी वर्षें पुरीं झाल्यानंतर अमृत-महोत्सव साजरा करण्याचा योग येत आहे. आणि या शुभ प्रसंगानें 'वैदिक विद्वानांचा परिचय भाग २' या पुस्तकाचें प्रकाशन होत आहे, याबद्दल पाठशाळेच्या चालकांना संतोष वाटत आहे.

वैदिक विद्वानांचे परिचय प्रकाशित होण्यामध्यें अनेक लाभ आहेत. गेल्या शतकापासून सारा भारत सामाजिक आणि आर्थिक क्रांतीच्या अवस्थेंतून जात आहे. या काळांत कोण वैदिक विद्वान् होऊन गेले, त्यांनीं वेदविद्या कशी संपादन केली, कशी संभाळली, आणि तिची परंपरा पुढें कशी जागृत ठेविली, हा इतिहास मोठा उद्‌बोधक आहे. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास पुढें मागें लिहिला जाईल, त्या वेळीं एक साधनग्रंथ म्हणून या दोन्ही भागांचें किती महत्त्व आहे हें प्रत्ययाला येईल. या पुस्तकाला पंडितराज राजेश्वरशास्त्री द्रवीड, वाराणसी, यांचा पुरस्कार आणि न्यायरत्न डॉ. धुं. गो. विनोद यांचें प्रास्ताविक 'मंगलाचरण' लाभलें आहे. त्यांच्या द्वारें या पुस्तकाचें महत्त्व विशद होईलच. फक्त एकाच गोष्टीकडे मी वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों. शास्त्र, परंपरा आणि श्रद्धा यांना साक्षी ठेवून, वैदिकांनीं अत्यंत निःस्वार्थ बुद्धीनें वेदविद्येचें रक्षण केलें. जागतिक संस्कृतीच्या संदर्भात त्यांच्या कार्याचें मूल्यमापन करूं इच्छिणारांनीं अवश्य करावें; परंतु वैदिकांनीं 'हें केलें नाहीं' आणि 'तें केलें नाहीं' अशी दोषैकदृष्टि ठेवणें केवळ एकांगीपणाचें दर्शक होईल असें मला वाटतें. असो.

श्री. सी. वि. केळकर यांनीं पहिल्या भागाप्रमाणेंच या दुसऱ्या भागाचेंहि प्रकाशन करण्याची संधि पाठशाळेला दिली, आणि पुस्तक-प्रकाशनाच्या श्रेयांत पाठशाळेलाहि सहभागी केलें, याबद्दल पाठशाळेच्या वतीनें मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों. पुरस्कार-लेखक आणि 'मंगलाचरण' लेखक या दोघांच्यासंबंधीं कृतज्ञता व्यक्त करणें हें कर्तव्य आहे.

अष्टग्रही शांति अनुष्ठान मंडळानें पाठशाळेस सुमारें रुपये सतराशेंची देणगी दिली. तिचा विनियोग अमृत-महोत्सवानिमित्त व्हावयाच्या धार्मिक अनुष्ठानांकडे आणि 'वैदिक विद्वानांचा परिचय-भाग २ रा' याच्या प्रकाशनाकडे व्हावा, अशी अपेक्षाहि सदर मंडळानें व्यक्त केली. या देणगीबद्दल पाठशाळा सदर मंडळाची अतिशय आभारी आहे. या देणगीमुळें या प्रकाशनासंबंधीं पाठशाळेची आर्थिक जबाबदारी कमी झाली असली तरी अद्यापि पाठशाळेला उद्देशानुरूप अनेक कार्यें करावयाचीं असल्यानें आर्थिक साहाय्याची जरुरी आहे. तसें साहाय्य वेदाभिमानी जनतेकडून मिळेल अशी उमेद वाटते.

पाठशाळेला या प्रकाशनाच्या रूपानेंहि वेदपुरुषाची सेवा करण्याचा योग लाभला, याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून हे दोन शब्द पुरे करतों.

पुणें वेदपाठशाळा
अमृत-महोत्सव
आश्विन व॥९ शके १८८४.

चिं. ग. काशीकर,
कार्यवाह,
पुणें वेदपाठशाळा.



महर्षि न्यायरत्न

डॉ. धुं. गो. विनोद

यांनीं केलेलें

# मंगलाचरण

१ —

' बिभेत्यल्पश्रुतात् वेदो मामयं प्रहरिष्यति '

– अत्रि स्मृति

एकदां वेदपुरुष भयभीत झाला व उद्‌गारला, ' जो अज्ञ आहे, अल्प-ज्ञ आहे, त्याची मला भीति वाटते. कारण तोच माझ्यावर प्रहार करील. ' आजच्या वाढत्या लोकसंख्येच्या काळांत अज्ञ व अल्पज्ञ यांची संख्याही भयप्रद वेगानें वाढत आहे. साक्षरता, विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण याबरोबर जनतेची वेदाविषयक अज्ञता म्हणजे अज्ञानच वाढत राहिलें आहे. वेद-पुरुषाची स्वतःवर प्रहार होण्याची भीति लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणांतच वर्धमान होत आहे.

893·8/Kel
4/=
61819

पण कितीहि प्रहार झाले तरी वेदपुरुष नष्ट होण्याची मला भीति वाटत नाहीं. वेद-पुरुष हा सनातन व अमर आहे. आतांपर्यंत त्यानें अनन्त प्रहार सहन केले आहेत. वेद-पुरुषाचें चैतन्य सदैव वर्धिष्णु, जयिष्णु व प्रभविष्णु राहणार यांत संशय नाहीं.

२ —

वेद हे ' अन्-अंत ' आहेत. वेदांना स्थलतः, कालतः, स्वरूपतः व तत्त्वतः केव्हांही नाश संभवत नाहीं. पृथ्वी सूर्याच्या समोर नसली म्हणजे रात्र होते, पण रात्र झाली म्हणून सूर्याचा नाश होऊं शकत नाहीं. सूर्यनारायणाप्रमाणेंच भगवान् वेदोनारायणाचें आहे. आपल्या दृष्टीच्या आड वेदोनारायण झाले असें वाटलें, तरी त्यांच्या दृष्टीच्या आड आपण कधींहि होऊं शकत नाहीं.

सप्त महापुरुष चिरंजीव असल्याचा उल्लेख सुप्रसिद्ध आहे. वेदांचें चिरजीवन त्याहूनही श्रेष्ठ अर्थानें खरें आहे. कारण, वेद हे कृति, विकृति किंवा आकृति या परिणाम-त्रयीनें बद्ध झालेले नाहींत. अर्थात् त्यांना विनाश संभवत नाहीं. महाप्रलयकालीं परिणाम हे ' पूर्वात् पूर्व ' या प्रतिक्रमानें कारणांत लीन होत असतात. वेद हे ' कारण-तत्त्व ' आहेत, ' परिणाम ' नव्हेत. म्हणूनच वेद हे अपौरुषेय आहेत, आणि केवलरूप, स्वयंप्रकाश, स्वयंसिद्ध व स्वयंपूर्ण आहेत.

३ —

वेद म्हणजे ज्ञान. येथें ज्ञान शब्दाचा अर्थ ' जाणण्याची क्रिया ' असा नव्हे. ज्ञान म्हणजे स्वयंसिद्ध ' ज्ञप्ति ' होय. पंचदशींत विद्यारण्यांनीं ' ज्ञप्ति ' हा शब्द स्वयंसिद्ध ज्ञान या अर्थी वापरला आहे. ज्ञान ही स्थलकालातीत अशी मूल-शक्ति आहे. ' सत्यं ज्ञानं अनन्तम् ' या पदत्रयींतलें ज्ञान हें पद मूल-शक्तिवाचक व ब्रह्मवाचक आहे. ज्ञान हा शब्द या मूलार्थानें आपणास सहसा परिचित नसतो.

वेद हे ज्ञानस्वरूप आहेत हा सिद्धान्त समजावून घेतांना, ज्ञान शब्दाचा हा मौलिक अर्थ आपण ध्यानांत घेतला पाहिजे. ज्ञाता, ज्ञान आणि ज्ञेय या त्रिपुटींतला ज्ञान हा शब्द वृत्ति-ज्ञानाचा, विधानगत ज्ञानाचा दर्शक आहे.

'वेद म्हणजे ज्ञान' या विधानांतल्या ज्ञान शब्दाचा अर्थ श्रीज्ञानेश्वरांनीं पुढीलप्रमाणें स्पष्टविला आहे.

**ज्ञातृज्ञेयाविहीन । नुसधेंचि जें ज्ञान ।**
**सुखाभरलें गगन । गाळीव जें ।**

— ज्ञानेश्वरी

४ —

आज वेदपुरुषावर जे प्रहार होत आहेत, त्यांत शत्रूंकडून होणाऱ्या प्रहरांपासून वेदांना तितकासा धोका नाहीं. 'मला मित्रांपासून वांचवा', 'पाहि मां मामकीनेभ्यः' असा वेदपुरुषाचा आजचा आक्रंद आहे. आज वेदपुरुषावर भारतीय जनतेकडून जो प्रहार होत आहे, त्या प्रहाराचें नांव 'उपेक्षा' असें आहे. ही आपली वेदांबद्दलची उपेक्षावृत्ति आपल्या निश्चेष्टतेची, मृतावस्थेची ज्ञापक आहे. वेदपुरुष अमर आहे. आपण मात्र स्थिर शवासन घालून बसलों आहोंत ! यांत आपण स्वतःची हत्या करीत आहोंत. वेदांची उपेक्षा म्हणजे खरोखर आपल्या विकासाची, आपल्या स्व-त्वाची, आपल्या संस्कृतीची उपेक्षा आहे, हें आपण ध्यानांत घेऊं या.

५ —

वैदिक संस्कृति ही आजच्या भारतीय संस्कृतीहून मी निराळी समजतों. आज एकंदर सव्वाशें संस्कृति जगतींतलावर प्रतिष्ठित आहेत, असें तज्ज्ञ मानतात. वैदिक संस्कृति ही त्या 'अनेकांतली

एक ' संस्कृति नव्हे. सर्व संस्कृतींना अधिष्ठानभूत असणारी जी संस्कृति, तिचें नांव वैदिक संस्कृति असें आहे.

एखाद्या कालखंडापुरती, स्थल-विशेष-निष्ठ, अशी ही संस्कृति नव्हे. डॉ. स्पेंग्लर या सुप्रसिद्ध जर्मन पंडितानें सुचविलेले संस्कृतीचे नियम व अनुक्रम वैदिक संस्कृतीला लागूं होत नाहींत. जणूं काय, जायते, अस्ति, वर्धते, विपरिणमते, अपक्षीयते, विनश्यति, हे षड्विकार प्रत्येक संस्कृतीला अनिवार्य आहेत, असें स्पेंग्लर म्हणतो. प्रत्येक संस्कृति ही एक ( Organism ) सजीव प्रकृति आहे, व वरील अवस्थांमधून जाणें तिला अपरिहार्य आहे. भारतीय संस्कृति ही विनाशोन्मुख झाली आहे, असेंही त्याचें एक विधान आहे. तें अल्प अर्थानें खरेंही असेल. पण वैदिक संस्कृति ही अमर आहे, हें मात्र त्रिकालाबाधित सत्य आहे.

वैदिक संस्कृति ही आदर्श संस्कृति होय. प्रज्ञान, समता, विश्वाचें ईशावास्यत्व हें वैदिक संस्कृतीचें व्यावर्तक त्रैगुण्य आहे. ज्या संस्कृतींत हीं वैशिष्ट्यें आहेत ती संस्कृति वैदिक संस्कृतीचीच प्रतिनिधि आहे. मानवकुल एक आहे. मानवी संस्कृति एकच आहे. आचार-विचारांच्या गौण वैशिष्ट्यांमुळें निष्पन्न होणारी सांस्कृतिक विविधता ही मूलभूत एकात्मतेला संपन्नता आणणारी आहे, नष्ट करणारी नव्हे.

६ —

असूय-क व द्वेष्टे शत्रु वेदविद्येला पूर्व-कालींहि होते. अशाच आजच्यासारख्या एका कालखंडांत, वेदविद्येनें ' ब्रह्मविद् ' ब्राह्मणांजवळ जाऊन अभय व शरण्य मागितलें आहे :—

" विद्या ह वै ब्राह्मणम् आजगाम । गोपाय मां शेवधि: ते अहं अस्मि । असूयकाय अनृजवे अयताय न मा ब्रूया: । वीर्यवती तथा स्याम् ।। "

आचार्य यास्कांच्या निरुक्ताधारें या वचनाचा अर्थ असा आहे:—

वेदविद्या किंवा अध्यात्मविद्या ब्राह्मणाजवळ गेली व म्हणाली, " माझें संरक्षण कर. मी तुझा वैभव - निधि आहे. गुणांचे ठिकाणीं दोषाविष्कार करणाऱ्या मत्सरग्रस्ताला तूं मला देऊं नकोस. तसेंच कुटिल वृत्तीच्या दुष्टाला, शठाला माझें स्वरूप सांगूं नकोस. जो अ-यत आहे, इंद्रियांचें संयमन करीत नाहीं, त्याला माझें स्वरूप सांगूं नकोस, असें केलेंस तर मी प्रभावी, तेजस्विनी होईन. तुझ्यापासून ज्यांना माझी प्राप्ति होईल, त्यांच्या ठिकाणीं मी अन्तस्तेजानें चमकेन. "

आजचें अणुविज्ञान हें देखील संशोधकांजवळ, ज्ञात्यांजवळ हीच याचना करीत आहे. तें म्हणतें, " मला दुष्टांच्या, शठांच्या स्वाधीन करूं नका. मानवाच्या चिरशांतीसाठीं व चिरसुखासाठीं माझा उपयोग करा. मानवता ही ' अ - योध्या ' आहे. " अणुविज्ञान पुढें म्हणतें, " मी विज्ञान आहें. मी वेदविद्येचाच अवतार आहें. सर्व संहारासाठीं माझा उपयोग करणें हें मला असंमत आहे. विश्व - शांति सिद्धविण्यासाठीं माझा आविष्कार आहे. माझ्या साहाय्यानें अनंत अंतराळें, अनंत विश्वें तुम्ही काबीज करा, पण माझा संहारक उपयोग तुम्ही करूं नका. "

७ —

वेदविद्या ही अ-लौकिक उपायांची जननी आहे. " प्रत्यक्षेण अनुमित्या वा यस्तूपायो न बुध्यते । एनं विन्दाति वेदेन तस्मात्

वेदस्य वेदता ॥ " — इतर शास्त्रें हीं लौकिक आहेत. एक वेदविद्या मात्र अ-लौकिक आहे. वेदशक्ति ही अतीन्द्रिय शक्ति आहे.

ही अतीन्द्रिय शक्ति ज्यांनीं परंपरेनें 'प्रवर्तितो दीप इव प्रदीपात्' अशा अखंड संक्रमणानें या क्षणापर्यंत मुखोद्गत ठेविली, त्या भारतीय वैदिकांचे केवळ भारतावरच नव्हेत तर सर्व मानवतेवर अनन्त उपकार आहेत. या वस्तुस्थितीची जाणीव आपल्यापेक्षां विल्यम् जोन्स, मॅक्स मुल्लरपासून विद्यमान फ्रेंच पंडित रनूपर्यंतच्या पाश्चिमात्य विद्वानांना अधिक प्रमाणांत असावी याबद्दल मात्र सखेद आश्चर्य वाटतें. यंदा पुण्यास टिळक-मंदिरांत प्रतिवार्षिक वेद-व्यास महोत्सवाच्या प्रसंगीं जमलेल्या मंडळींत पांच अमेरिकन, एक बेल्जिअन, एक फ्रेंच व एक कोरिअन असे परदेशीय पंडित महोत्सवांतील व्याख्याते म्हणून उपस्थित होते. यांच्यापैकीं कांहींजण उत्कृष्ट वेदाभ्यासक होते. कोरियाचे डॉ. के. बाक यांनीं अस्खलित संस्कृतमध्यें व्यास-महर्षींबद्दल व त्यांच्या वेदव्यवस्थेबद्दल अभ्यासपूर्ण व प्रभावी भाषण करून सुमारें दोन हजार श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून सोडलें. परदेशीय विद्वानांकडून वेदविद्येला दाखविण्यांत येणारा हा आदर पाहिला म्हणजे या विद्येच्या अभिवृद्ध्यर्थ आपण, आपले पुढारी व शासनसंस्था आज काय करीत आहोंत ? असा प्रश्न सहजच मनांत येतो.

८ —

शके १८०३ मध्यें पुण्यांतील कांहीं विद्वानांनीं व वेदभक्तांनीं या प्रश्नाचें उत्तर शोधून काढलें व प्रत्यक्ष कार्याला सुरुवात केली. 'पुणें वेदपाठशाळा' या संस्थेची स्थापना करून , त्यांतून वैदिक विद्वान

निर्माण करण्याची त्यांनीं योजना केली. गेलीं ८०-८१ वर्षें ती संस्था अखंड अध्ययन-अध्यापनाचें कार्य करीत आहे. याच संस्थेच्या द्वारां " वैदिक विद्वानांचा परिचय " या पुस्तकाचा पहिला भाग शके १८७८ मध्यें प्रकाशित करण्यांत आला , व आज संस्थेच्या अमृत-महोत्सवाच्या प्रसंगीं सदर पुस्तकाचा दुसरा भाग प्रसिद्ध होत आहे, ही फार समाधानाची गोष्ट आहे.

या पुस्तकाच्या दोन्ही भागांत मिळून २३७ वैदिकांचा परिचय देण्यांत आला आहे. संपादक श्री. सी. वि. केळकर यांची ही कल्पना सर्वथैव आदरणीय आहे. वैदिक मंडळी स्वभावतःच अन्तर्मुख व प्रसिद्धिपराङ्मुख असतात. त्यांचें जीवन बाह्यतः आकर्षक नसतें. शेजारीपाजारी व नातलग यांना देखील वैदिकांची कदर नसते. अशा परिस्थितींत त्यांच्याबद्दलची माहिती मिळाविणें व चोखंदळपणें ती प्रकाशित करणें हें कार्य फार दगदगीचें आहे. पण तें केलें जाणें अत्यंत आवश्यक व फलतः समाजास अतीव उपकारक असें आहे, यांत शंका नाहीं.

श्री. केळकर यांच्या हातून ही वैदिकांचीच नव्हे तर वेद-पुरुषाची महनीय सेवा घडत आहे. या सेवेंत त्यांच्या जीवनाचें साफल्य आहे, असें मी समजतों.

वैदिकांच्या अर्वाचीन इतिहासाचीं खरीं साधनें या पुस्तकांतील अल्प चरित्रें हींच होत. शिवाय त्यांच्या वाचनानें ' अतीत ' स्मृति-बद्ध होतें व अनागताला नवीन स्फूर्ति मिळते. या ग्रंथांत इतिहास आहे, त्याचप्रमाणें भावी पिढीला एक मूक आदेश आहे. आज-कालहि विद्वान वेद-विभूति आपल्यामध्यें आहेत, असूं शकतात व उद्यांहि त्या संभवतात असें आश्वासन हा ग्रंथ आपणांस देत आहे.

श्री. केळकर यांच्या हृदयांतहि हीच श्रद्धा नंदादीपासारखी तेवत आहे. त्या नंदादीपाच्या प्रकाशांत त्यांनीं वैदिकांच्या जीवनाचें संशोधन चालविलें आहे. त्यांना उदंड आयुरारोग्य मिळावें व त्यांच्या करवीं अधिकाधिक वेदसेवा व्हावी अशी मी श्रुति-माऊलीच्या चरणीं प्रार्थना करून, हें मंगलाचरण संपवितों.

मिति आश्विन शु॥ ५ शके १८८४ धुं. गो. विनोद



पंडितराज राजेश्वरशास्त्री द्राविड-
महोदयैः कृतः
पुरस्कारः

“ आहारेष्वथ योनौ च बीजे कर्मणि चापि यः ।
शुचिः कृच्छ्रगतस्यापि न पापे रमतेऽस्य धीः ॥ ”

इत्यादिना राष्ट्राभ्युदयाय शुचित्वरक्षणमत्यावश्यकमिति सिध्यति। शुचित्वं च कामादिभिरनभिभाव्यत्वमिति विकृतं दशरूपकावलोके।

“ प्रख्यातवंशमक्रूरं लोकसंग्राहिणं शुचिम् ।
कुर्वीतात्महिताकाङ्क्षी परिवारं महीपतिः ॥ ”

इत्यादिना नीतिसारे राज्यस्य परिवारे शुचित्वमभिहितम् ।

" शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते " इति गीतया तादृशानामेव गृहे योगभ्रष्टानामुत्पत्तिरुक्ता ।

" उपनीय गुरुः शिष्यं शिक्षयेच्छौचमादितः ।
आचारमग्निकार्यं च सन्ध्योपासनमेव च ॥ "

इति मनुनापि प्रथमतः शौचाचारशिक्षणं कर्तव्यतयोक्तम् । आयुर्वेदीयरसायनाद्यनुष्ठानगतप्रायश्चित्ताधीनपापनाशरूपशौचे इष्टसाधनत्वानुमितिर्बौद्धानामप्यायुर्वेदविदामासीत् । इदं सर्वं वेदमूलकमिति साधितं न्यायदर्शने ।

" अनभ्यासेन वेदानामाचारस्य च वर्जनात् ।
आलस्यादन्नदोषाच्च मृत्युर्विप्रान् जिघांसति ॥ "

इति मनुना ब्राह्मण्यनाशकारणानि यान्युक्तानि तान्यवश्यं स्मर्तव्यानि ।

" दमं दानं दयां शिक्षे स्तनयित्नुर्वदत्यसौ ।
ददद्दिति वाग्देवी दयध्वं दत्त दाम्यत ॥ "

इत्यादिना साहित्यविदो दमरूपं शौचं मेघद्वाराऽनूद्यमानश्रुतिमूलकं वर्णयन्ति । तथा च मेघगर्जनं यदा यदा तदा तदा श्रुतिरिति लाभात् श्रुतेरपौरुषेयत्वासिद्धिः । एवं रीत्या समस्तजगतः स्थितिकारणं शौचात्मको य इन्द्रियनिग्रहरूपो दमः स यथाविधि यथा वेदाध्ययनेन सिध्यति, न तथाऽन्यमार्गेणेत्यपि

" योऽनधीत्य द्विजो वेदमन्यत्र कुरुते श्रमम् ।
स जीवन्नेव शूद्रत्वमाशु गच्छति सान्वयः ॥ "

ति मनुवचनादवगम्यते । अतो वेदाध्ययनं यथाविधि क्रियमाणं

सर्वधर्मस्य मूलं तस्मिन्नुच्छिन्ने सर्वमुच्छिन्नं भवेत् । वेदाध्ययन-प्रोत्साहनाय वैदिकानां चरित्रप्रकाशनं तेषां राजमान्यताप्रकाशनेन बालानां वेदाध्ययने रुचिमुत्पादयितुं सर्वथा समर्थमिति श्री. सीताराम-विष्णु-केळकर-महोदयैः क्रियमाणं सर्वथा भारतीयराजनीति-विदामनुमोदनार्हम् ।

एते हि महाभागाः कुलपरम्परया वेदशास्त्रसंरक्षकाः पुण्यवन्तो नितरां स्मरणीयाः, यथा दशावतारेषु वेदोद्धरणायैव प्रथमोऽवतारो जातस्तद्वद्वैदिकचरित्रनिर्माणेनानितरकृतेन धार्मिकं जगदाह्लादयन्ति । एतत्कीर्तिभूतोऽयं ग्रन्थः पूर्णतां चिरस्थायितां च लभतामिति वेद-पुरुषमभ्यर्थयामहे ।

—श्रीराजेश्वरशास्त्री द्राविड

---

# संपादकाचें निवेदन

सुमारें सहा वर्षांपूर्वी या पुस्तकाचा पहिला भाग प्रसिद्ध झाला. त्या वेळीं अशा तऱ्हेच्या पुस्तकाचें स्वागत कोणत्या प्रकारें होईल याबद्दल मनास साशंकता होती. पण लो. ना. बापूजी अणे, डॉ. बाबासाहेब जयकर, न्यायरत्न डॉ. विनोद, म. म. पोतदार, पं. बाळशास्त्री हरदास, ह. भ. प. प्राचार्य दांडेकर, बदलापूरचे श्री. नानासाहेब चापेकर इ. थोर विद्वानांनीं या उपक्रमास प्रकट रीत्या पाठिंबा दिला. तसेंच केसरी, सकाळ, चित्रमयजगत्, तरुण भारत, पुरुषार्थ, अखंड भारत इ. नियतकालिकांनीं आपले अनुकूल अभिप्राय प्रगट केले. यामुळें पुस्तकाचा निदान दुसरा भाग तयार करून छापावा व महाराष्ट्र-शारदेच्या भव्य मंदिरांतील, 'केव्हां तरी' लागणाऱ्या सामानाच्या अडगळीच्या खोलींतील अत्यल्प जागा अडवावी, असा उत्साह मनास वाटला. शिवाय, पहिल्या खंडांत फक्त दिवंगत व्यक्तींची माहिती समाविष्ट केली होती; विद्यमान वैदिकांचीही माहिती संकलित करून छापली गेली पाहिजे, असा मनाचा लकडा होताच. तेव्हां विद्यमान व दिवंगत विद्वानांची जेवढी माहिती मिळाली तेवढी संकलित करून हा दुसरा भाग तयार केला, व पुणें वेदपाठशाळेनें याही भागाचें प्रकाशन करण्याचें ठरविलें. त्यास अनुसरून पाठशाळेच्या ८१ व्या वर्धापनदिनीं या पुस्तकाचें प्रकाशन होण्याचा सुयोग येत आहे.

पहिल्या खंडांत ११७ व या खंडांत १२० एकूण २३७ वैदिकांची माहिती संग्रहीत करण्यांत आलेली आहे. आडनांवांतील आद्याक्षरांच्या अनुक्रमानें पहिल्या खंडाप्रमाणेंच याहि खंडांत सर्व व्यक्तींची माहिती छापली आहे. अर्थातच कालानुक्रम साधण्याचा

यांत प्रयत्न केलेला नाहीं, अगर शाखाभेदानें वर्गीकरण केलेलें नाहीं; तसेंच, अकारविल्हेनें माहिती दिली असल्यानें, श्रेष्ठ – कनिष्ठ भाव दिग्दर्शित करण्याचा हेतू नाहीं. हें वास्तविक निराळें सांगण्याची जरूर नाहीं. पण पहिल्या खंडाच्या प्रसिद्धीनंतर, एका चांगल्या वैदिकाचा रोष–त्यांच्या वडिलांची माहिती मी शेवट घातली याबद्दल–झाल्याचें मला समजलें ! त्यांच्या आडनांवाचें आद्याक्षर वर्णमालेंत सुरवातीस नसून बरेंच पुढें आहे; याला मी तरी काय करणार ? असा कोणाचाहीं गैरसमज होऊं नये, म्हणून मुद्दाम हें स्पष्टीकरण करीत आहें. पुस्तक छपाई सुरू झाल्यानंतर आलेली माहिती ' पुरवणी – विभागांत समाविष्ट केली आहे.

या खंडांत ज्या विद्वानांचा परिचय छापला आहे, त्यांची प्रारंभीं निराळी अनुक्रमणिका न छापतां, पुस्तकांत शेवटीं छापलेल्या सूचींत व्यक्तीच्या नांवामागे + अशी खूण करून निर्देश केला आहे.

पहिल्या भागाच्या प्रकाशनानंतर ठिकठिकाणीं जे विचार प्रकट करण्यांत आले ते लक्षांत घेतां, अशा तऱ्हेनें माहिती प्रसिद्ध करण्याच्या बाबतींतील भूमिका थोडक्यांत मांडणें व कांहीं स्पष्टीकरण करणें इष्ट वाटतें.

उपक्रम, उपसंहार इ. लक्षणांनीं युक्त असा हा 'ग्रंथ' नव्हे. परमताचें खंडण आणि स्वमताचें मंडण करून, कांहीं सिद्धान्त प्रस्थापित करणें हाहि या पुस्तकाचा विषय नाहीं. आंकडेवारीच्या साहाय्यानें कांहीं निष्कर्ष काढण्याचाही यांत प्रयत्न केलेला नाहीं. कारण हे सर्व प्रयत्न यशस्वी रितीनें करण्यास आवश्यक असणारी साधन – सामग्री अद्याप तरी अत्यंत अपुरी आहे, असा अनुभव प्रारंभींच कोणत्याही व्यक्तीस सहज येण्यासारखा आहे. समाजाचा

सर्वांगीण अभ्यास होण्यास, पुरेशीं साधनें संकलित करणें हें सुरुवातीचें पण अत्यंत महत्त्वाचें काम असतें. अशी साधन-सामग्री-उपलब्ध करून देण्याचा या पुस्तकाचा प्रामुख्यानें उद्देश आहे. म्हणून या व अशा तऱ्हेच्या पुस्तकांना साधन–ग्रंथ म्हणण्यास मला हरकत वाटत नाहीं.

लहान – मोठा असा कोणताहि साधन – ग्रंथ तयार करतांना, त्यांत कोणताही क्रम अगर नियमबद्धता फारशी असण्याची आवश्यकता नाहीं. खटपटीनें अनेक ठिकाणांहून मिळेल तसतशी सर्व माहिती संकलित करणें, हेंच अशा उद्योगाचें प्रधान स्वरूप राहातें. त्या दृष्टीनेंच या प्रयत्नाकडे पाहाणें जरूर आहे.

इतिहासकालीन आचार-विचार व घडलेल्या घटना या आपल्या आवडीनिवडीवर अगर आपल्या सद्यःकालीन विचारांवर अवलंबून असत नाहींत. वस्तुनिष्ठ रितीनेंच, त्या जशा घडल्या असतील तशा स्वरूपांत त्यांची नोंद करणें आवश्यक असतें. त्या घटनांचा अगर आचार – विचारांचा काय परिणाम झाला अगर होत आहे याबद्दल चिकित्सा करण्याचा व उलट-सुलट प्रतिपादन करण्याचा अधिकार प्रत्येकास आहे. पण एखादी गोष्ट आपणांस कमी महत्त्वाची वाटली किंबहुना समाजाच्या उत्कर्षास हानिकारक वाटली तरी त्या त्या काळच्या समाजास ती बाब जर महत्त्वाची व उन्नतिकारक वाटली असेल तर तिचा अनुल्लेख करणें अगर उपेक्षा करणें योग्य होणार नाहीं. वेदशास्त्र – विद्या ही आज कित्येकांस महत्त्वशून्य वाटत असली तरी अगदीं नजीकच्या काळापर्यंत तिचें समाजांत उच्च स्थान होतें, ही गोष्ट अनेक साधनांनीं स्पष्ट झाली तर तशी नोंद व्हावयासच पाहिजे. तसें केलें नाहीं तर त्या त्या काळच्या समाज-स्थितीचें चित्रण पूर्ण झालें असें म्हणतां यावयाचें नाहीं.

आपला सर्वांगीण इतिहास तयार व्हावा याकरतां अनेक बारिक-सारिक गोष्टींचीं टिपणें – टांचणें प्रसिद्ध केलीं जात आहेत, ही अभिनंदनीय गोष्ट आहे. जुने पोषाख, जुने कारागीर, जुने गायक, वादक, नर्तक, फडवाले, इतकेंच काय पण इतिहास - प्रसिद्ध पुरुषांच्या नाटकशाळांचीसुद्धां माहिती साक्षेपानें जमा केली जात आहे. ही कामगिरी उपयुक्त व महत्त्वाची आहे हें कोणीही इतिहास-प्रेमी कधीं नाकारणार नाहीं. पण याबरोबरच वैदिक विद्वान्, शास्त्री – पंडित, भाष्यकार व टीकाकार यांच्याहि माहितीचीं टांचणें आपण करीत राहिलें पाहिजे, त्यांची उपेक्षा होणें ठीक नाहीं. अशा तऱ्हेच्या उपेक्षेचें आणखी एक उदाहरण देतां येण्यासारखें आहे. श्रीशंकराचार्य व त्यांच्या मठ – संस्था यांचा जनमनावरील दाब कांहीं शतकें तरी होता. त्याचे अवशेष अगदीं अलीकडच्या म्हणजे न्यायमूर्ति रानडे व लो. टिळक यांच्या काळापर्यंतहि आपणांस पाहावयास मिळतात. या निरनिराळ्या पीठांमधून केंद्रित झालेली सत्ता, तिचें झालेलें सामाजिक व कांहीं अंशीं राजकीयही परिणाम, त्यांनीं संस्कृतिसंरक्षणाकरतां केलेले प्रयत्न, याबाबत पद्धतशीर संशोधन व लेखन झालें पाहिजे. हें करण्याकरतां भूतपूर्व मठाधिपतींची माहिती, मठांतील जुने कागदपत्र, जमाखर्च, सनदा, आज्ञापत्रें, पुकारलेले बहिष्कार इ. साधनें अगोदर उपलब्ध झालीं पाहिजेत. प्राक्कालीन किती तरी गोष्टींवर या संशोधनानें महत्त्वाचा प्रकाश पडण्याचा संभव आहे. पण हें काम करणार कोण ? पीठांनीं स्वतः होऊन हें काम करावें तर त्या कामीं लागणारी दृष्टि व फुरसद त्यांना उपलब्ध होईलसें दिसत नाहीं. बाहेर आमच्या धुरीणांकडे पाहावें तों ‘साहित्य व संस्कृति’च्या राखीव जागेंत अद्याप वैदिक – शास्त्री मंडळींचा प्रवेश होणें कठीण आहे, मग शंकराचार्य – मठां-विषयीं तर बोलावयासच नको !

असो. वेदशास्त्रांबद्दल ज्यांना आस्था असेल त्यांनीं कोणासही दोष न देतां व आपलें औदासीन्य टाकून, आपल्या हातून होईल तेवढें काम करीत राहावें; व आपल्या समाजाचा जो सर्वांगीण इतिहास पुढें तयार व्हावयाचा आहे त्याला लागणारीं जीं साधनें व सामग्री आपल्याला उपलब्ध होईल तेवढी पुरविण्याची काळजी घ्यावी. याच प्रमुख उद्देशानें हें काम हातीं घेतलें. पुढें मागें याचा अत्यल्पहि उपयोग झाला तरी केलेल्या श्रमाचें चीज होईल.

या दुसऱ्या खंडांत दिलेली काशींतील वैदिकांची माहिती व छायाचित्रें मिळविण्याच्या बाबतींत काशीचे घनपाठी वैदिक वे. विश्वनाथ वामन देव यांनीं बहुमोल साहाय्य केलें. वऱ्हाडांतील उमरखेड येथील विद्वानांची माहिती पं. रामचंद्र अंबादास जोशी यांनीं पुरविली. याबद्दल मी उभयतांचा ऋणी आहें. तसेंच 'केसरी', 'सकाळ', 'शारदा' या वृत्तपत्रांनीं व वैदिक संशोधन मंडळ, पुणें या संस्थेनें प्रत्येकीं एक एक फोटो-ब्लॉक छापण्याकरितां दिला याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

पुणें वेदपाठशाळा या संस्थेनें या पुस्तकाचें प्रकाशन करण्याची जबाबदारी स्वीकारली याबद्दल मी त्या संस्थेचे कितीहि आभार मानले तरी ते थोडेच होतील. पंडितराज राजेश्वरशास्त्री द्रविड व न्यायरत्न डॉ. धुं. गो. विनोद यांनीं 'पुरस्कार' लिहून व 'मंगलाचरण' करून या लहानशा पुस्तकाचें जें कौतुक केलें, त्याबद्दल मला वाटणारी कृतज्ञता व्यक्त करण्यास माझ्याजवळ पुरेशी शब्दसंपत्ति नाहीं.

विजयादशमी, शके १८८४ — सी. वि. केळकर

# वैदिक विद्वानांचा परिचय

## भाग २ रा

### १ : वे. गणेश सखाराम आठल्ये

**अलीबाग**

यांचा जन्म शके १७५५ मध्यें रत्नागिरी जिल्ह्यांतील देवळें या गांवीं झाला. यांच्या वडिलांचें नांव वे. सखाराम ( सुखानंद ) वासुदेव व मातुःश्रींचें नांव सरस्वतीबाई. वडील कोंकणांत शेती व भिक्षुकी करीत. वे. गणेशभटजी यांनीं वेदाध्ययनासाठीं प्रथम कांहीं दिवस कोल्हापुरास वास्तव्य केलें व नंतर ते पनवेल येथें गेले. तेथें त्यांनीं ऋग्वेदाचें घनान्त अध्ययन पूर्ण केलें. अध्ययन पूर्ण झाल्यानंतर ते बडोद्यास परीक्षेकरितां गेले. परीक्षा उत्तम दिली असें पाहून, बडोद्याचे त्यावेळचे अधिपति श्रीमंत खंडेराव महाराज यांनीं त्यांना महावस्त्र देऊन रुपये पंचवीसचें आजीव वर्षासन करून दिलें. नंतर वे. गणेशभटजी अलीबागेस श्रीमंत भाऊसाहेब बिवलकर यांचे आश्रयास येऊन राहिले. श्री. बिवलकर यांनीं अलीबागेस जे अनेक यज्ञ केले, त्या यज्ञांतून वे. गणेशभटजी यांचेकडे मुख्य पुरोहिताचें काम असे. शेवटपर्यंत ते बिवलकरांचे आश्रित म्हणून अलीबागेसच होते.

मंत्रांच्या सामर्थ्यावर त्यांचा विश्वास असे. अरणांतील विशिष्ट मंत्रानें पाणी मंत्रवून ते प्रसूतिसमयीं सुलभप्रसूतीसाठीं स्त्रियांना देत व त्याचा अनेक वेळां गुणही येत असे. त्यांचें हस्ताक्षर उत्तम होतें व वेदाच्या पुष्कळ पोथ्या त्यांनीं स्वहस्तें लिहून काढल्या. त्यांच्या हस्तलिखित ऋग्वेद संहिता-होमाच्या पोथीवरून निर्णयसागर छापखान्यानें पोथी छापली आहे व त्याप्रमाणें

पोथीच्या आरंभीं यांच्या नांवाचा उल्लेखही केला आहे. ऋग्वेद संहितेंतील कोणता अध्याय मोठा यावर एकदां वैदिक मंडळींत चर्चा निघाली असतां, अमुक अध्याय सर्वांत मोठा व अमका लहान असें यांनीं सांगितलें. पण आपलें मत सप्रमाण सिद्ध करण्याकरितां यांनीं सर्व अध्यायांतील ऋचा, पदें व अक्षरें मोजून काढलीं व आपलें म्हणणें सप्रमाण सिद्ध केलें! ती सर्व माहिती शके १८०४ मध्यें पुण्याच्या जगद्धितेच्छु छापखान्यांत 'ऋग्वेदीय छंदःप्रभृति संख्या-संग्रह' या नांवानें पुस्तकरूपानें प्रसिद्ध केली. तैत्तिरीय संहितेचींही अक्षरें त्यांनीं मोजून काढलीं होतीं. वे. गणेशभटजी याज्ञिककृत्यही उत्तम करीत.

त्यांच्या शिष्यवर्गांत वे. आत्माराम बाळकृष्ण जोशी, वे. अनंतभट देवस्थळी, वे. त्रिंबकभट मोघे या वैदिकांचा समावेश होतो.

वे. गणेशभटजींच्या भार्येचें नांव लक्ष्मीबाई पिता श्रीधर रामचंद्र मुळये, मिरजोळें. यांना चार पुत्र व तीन कन्या झाल्या. वे. गणेशभटजी शके १८३१ मध्यें वारले.

• • •

## २ : वे. विनायक सीताराम आठल्ये

### सांगली.

यांच्या घराण्याचें मूळगांव रत्नागिरी जिल्ह्यांतील शिपोशी हें होय. नंतर कांहीं पिढ्या संगमेश्वर तालुक्यांतील भडकंबें येथें झाल्या. वे. विनायकभटजींच्या वडिलांचें नांव सीताराम भास्कर. हे भडकंब्यास शेती व भिक्षुकी करीत. मातेचें नांव सुंदराबाई पिता जयराम सदाशिव सप्रे, मोरडें. वे. विनायकभटजी यांचा जन्म शके १८३५ मध्यें झाला. त्यांचें सुरुवातीचें वेदाध्ययन साखरपें येथील वे. नृसिंहभटजी कानिटकर यांचेकडे झालें. नंतर मलकापूर येथें येऊन वे. महादेवभटजी पुरोहित गुरुजी यांच्याजवळ ऋग्वेदाचें पदापर्यंत अध्ययन केलें. पुढें सांगलीस येऊन, तेथें वे. काशीनाथभटजी

केळकर गुरुजी यांचेजवळ घनान्त अध्ययन पूर्ण केलें. नंतर सांगलीसच वास्तव्य असून, तेथें श्री गणपती मंदिरांत कायमचें अनुष्ठान मिळालें आहे.

वे. विनायकभटजींनीं ऋग्वेदाचें घन–पारायण सन १९५२ मध्यें सांगलीस केलें. नंतर सोलापूर, नांदेड व बार्शी येथें जटेचीं पारायणें केलीं. सन १९५७ मध्यें मुंबईस घनाचें पारायण केलें. वे. शा. सभेची घनाची परीक्षाहि यांनीं दिली असून, बडोदें व पंढरपूर येथेंहि वेदपरीक्षा दिल्या आहेत. बंगलोर येथें झालेल्या स्वाहाकारांत यांनीं भाग घेतला होता. यांच्या प्रथम पत्नीचें नांव सरस्वतीबाई पिता परशुराम सरपोतदार, कोचरी. दुसरी भार्या–कमलाबाई पिता गणेश हर्डीकर, सोलगांव. यांना चार मुली व दोन मुलगे आहेत.

● ● ●

## ३ : वे. गोपीनाथ काशीनाथ आठवले

### काशी

यांचा जन्म सन १८७६ मध्यें झाला. यांचे वडील वे. काशिनाथभटजी हे काशीस भिक्षुकी करीत. आजे वे. चिंतामणि हे वैदिक व मंत्रशास्त्री होते. त्यांनीं संन्यास घेतला होता व त्यांची समाधि बिदरला आहे. वे गोपीनाथ-भटजींचें ऋग्वेदाचें अध्ययन वे. मामा पेंडसे यांच्याजवळ झालें वे गोपीनाथ-भटजी काशींत प्रख्यात वैदिक व मंत्रशास्त्री होते.

वे. गोपीनाथभटजींनीं ॐकारपूर्वक पद–पारायणें पुणें, रत्नागिरी, जळगांव, नाशिक, नागपूर, इंदूर इ. ठिकाणीं सुमारें ५० केलीं, व घनाचें पारायण मुंबईस केलें. काशीस घर विकत घेतांना कर्ज झालें होतें तें फेडण्या-करतां यांनीं पारायणें केलीं. यांच्या भार्येचें नांव राधाबाई पिता गोविंद दामोदर केळकर, काशी.

वे. गोपीनाथभटजींना महादेव व रामचंद्र असे दोन मुलगे व चार मुली आहेत. दोघेही पुत्र अथर्ववेदी म्हणून प्रसिद्ध असून, धर्मसंघविद्यालयांत अथर्व-वेदाचें अध्यापन करतात. वे. गोपीनाथभटजी सन १९३९ मध्यें वारले.

● ● ●

## ४ : वे. गोविंद सदाशिव आठवले

### नाशिक

याचा जन्म नाशिक येथें शके १७९७ मध्यें झाला. यांचे वडील सदाशिव लक्ष्मण हे नाशिक येथें वैदिक होते. मातेचें नांव काशी पिता पांडुरंग नारायण साठ्ये, नाशिक. वे. गोविंदभटजी यांनीं ऋग्वेदाचें क्रमान्त अध्ययन प्रथम वडिलांजवळ व नंतर वे. निळंभटजी लोंढे, वे. भालचंद्रभट जामखेडकर व वे. जनार्दनभटजी काळे यांचेकडे नाशिक येथें केलें. मुंबई येथें स्वाहाकाराकरतां व दिल्ली येथें करपात्रीजी महाराजांनीं करविलेल्या यज्ञाकरतां गेले होते. नाशिक येथें भिक्षुकी करीत. हल्लीं वृद्धावस्थेमुळें वडील चिरंजीवांजवळ मुंबईस असतात.

वे. गोविंदभटजींच्या पत्नीचें नांव राधाबाई पिता वामन नारायण दांडेकर, नाशिक. यांना पुत्र १ अनंत–हे पोलिस सुपरिंटेंडेंट आहेत, २ प्रभाकर–यांचें मुंबईस सराफी दुकान आहे, व कन्या–द्वारका भ्र. परशुराम भगीरथ आपटे, खेड.

• • •

## ५ : वे. केशव नारायण आपटे दीक्षित

### पुणें

यांचा जन्म शके १८१९ मध्यें सातारा जिल्ह्यांतील गोवें या गांवीं झाला. वडील वे. नारायण कृष्ण हे वर्षांतील कांहीं महिने पुण्यास व कांहीं महिने गोवें येथें भिक्षुकी करीत. मातेचें नांव लक्ष्मीबाई पिता शंकर माणिराम दातार, पांचवड. वे. केशवभटजी यांनीं कृष्णयजुर्वेदाचें अध्ययन वे. रामभटजी गद्रे, गोवें; वे. विष्णु दीक्षित आपटे; वे. लक्ष्मणभटजी विनोद; वे. अण्णाभटजी अभ्यंकर यांचेजवळ केलें व श्रौताचीहि माहिती घेतली. पुण्याच्या वे. शा. सभेची शाखेची व पंचग्रंथांची परीक्षा देऊन, नंतर कोल्हापूर, मिरज, सांगली,

इचलकरंजी, रामदुर्ग या संस्थानांतूनहि वेदपरीक्षा दिल्या. सांगलीस वे. शंकर दीक्षित नातू यांनीं केलेल्या सर्वतोमुख यज्ञांत वे. केशवभटजी यांनीं मैत्रावरुणाचें काम केलें. आहिताग्नि विश्वनाथ नारायण भिडे यांच्या निरूढपशुयज्ञांत मैत्रावरुणाचें व अग्निष्टोम यज्ञांत अच्छावाकाचें काम यांचेकडे होतें.

वे. केशवभटजींच्या पहिल्या भार्येचें नांव रमाबाई पिता नरहर विनायक रानडे, पुणें. यांना अपत्य नाहीं. दुसरी भार्या – जानकीबाई पिता कृष्णाजी विनायक गाडगीळ, उकसाण. यांना तीन पुत्र व तीन कन्या आहेत.

• • •

# ६ : वे. नारायण रामचंद्र उत्तरेश्वरी

## काशी

यांचा जन्म सन १८७६ च्या सुमारास झाला. यांच्या घरींच काण्वशाखीयांची वेदशाळा होती. त्यामुळे वे. नारायणभटजी यांची स्वशाखेची घनान्त तयारी उत्तम प्रकारें झाली. तसेंच श्रौत व स्मार्त याज्ञिकाची यांना उत्तम माहिती होती. यज्ञीय सामगायनहि ते चांगल्या प्रकारें करीत. यांचा आवाज फारच उंच व स्वच्छ असल्यानें त्यांच्या म्हणण्यास उठाव येत असे.

काण्व समाजांतील जन्म – मृत्यूंची व महत्वाच्या घटनांची नोंद करून ठेवण्याचा यांना फार वर्षांचा छंद होता. त्या नोंदीचा पुष्कळांना फार उपयोग होई व त्या नोंदी प्रमाण मानून त्याप्रमाणें ते कामें करीत.

वे. नारायणभटजींना सखाराम या नांवाचे पुत्र आहेत.

वे. नारायणभटजी सन १९५० मध्यें वारले.

• • •

## ७ : वे. रामचंद्र विष्णु ओक

### वांई

यांच्या घराण्याचें मूळगांव रत्नागिरी जिल्ह्यांतील नरवण हें होय. यांचा जन्म वांईस सन १८९८ च्या सुमारास झाला. वे. रामभटजी यांनीं कृष्ण-यजुर्वेदाच्या पंचग्रंथांचें अध्ययन वे. आण्णाभटजी अभ्यंकर यांचेजवळ वांईस केलें. नंतर इंदूर येथें पंचग्रंथांची परीक्षा दिली होती. वांईस ते एक प्रसिद्ध वैदिक म्हणून गणले जात.

वे. रामभटजींच्या पत्नीचें नांव सीताबाई. यांना तीन मुलगे व दोन मुली आहेत.

वे. रामभटजी सन १९४८ मध्यें वारले.

● ● ●

## ८ : वे. भालचंद्र वामन करंबेळकर

### पुणें

यांचा जन्म शके १८३३ मध्यें झाला. यांचे वडील वामन गंगाधर हे सावंतवाडी व बावडा भागांतील प्रसिद्ध पुराणिक होते. वे. भालचंद्रभटजी यांच्या मातेचें नांव मदालसा पिता गोपाळ केशव सप्रे. वयाच्या दुसऱ्या वर्षींच पितृवियोग झाल्यानें वे. भालचंद्रभटजी यांचें पालन त्यांचे चुलते विष्णु-शास्त्री यांनीं केलें. नित्यकर्माचें अध्ययन घरीं करून, सावंतवाडीच्या वेदशाळेंत वे. गंगाराम रामकृष्ण कशाळीकर यांचेजवळ भालचंद्रभटजी यांनीं ऋग्वेदाचें शाखाध्ययन केलें. संस्कृतचें प्राथमिक अध्ययन वे. शा. सं. शंकरशास्त्री कशाळी-कर यांचेजवळ सावंतवाडीसच केलें. नंतर पुण्यास वे. गोविंदभटजी फाटक यांच्या खासगी शाळेंत येऊन, पुढील अध्ययन केलें. पुण्यास अध्ययन संपेपर्यंत भोजनाची सोय आयुर्वेदाचार्य नानलशास्त्री यांच्याकडे झाली. क्रमाचें अध्ययन चालू असतांनाच, गुरुजींच्या आज्ञेवरून, वे. बापूभटजी ताम्हनकर यांचेजवळ निवित् – चतुष्टय व वे. कृष्णंभटजी प्रभुणे यांचेजवळ ऋक्–प्रातिशाख्य यांचेंहि

अध्ययन वे. भालचंद्रभटजी यांनीं केलें. जटा – घनाचें अध्ययन पुणें वेदपाठ-शाळेंत वे. किंजवडेकर गुरुजी यांचेजवळ केलें. अध्ययन चालूं असतांना महाराष्ट्र ब्राह्मण सभा, पुणें; कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई व वे. शा. सभा, पुणें या संस्थांकडून शिष्यवृत्ति मिळत होती.

अध्ययन संपल्यावर वे. शा. सभा, पुणें, येथें प्रथम दशग्रंथाची व नंतर घनाची परीक्षा वे. भालचंद्रभटजी यांनीं दिली. नंतर पंढरपूर येथील गर्गेगुरु विद्यापीठ व बडोदें, इंदूर, कोल्हापूर, कुरुंदवाड, सावंतवाडी इ. ठिकाणीं वेदपरीक्षा दिल्या. श्रीशंकराचार्यांकडून यांना 'वेदशिखामणि' अशी पदवी मिळाली.

वे. भालचंद्रभटजी यांनीं पुणें येथील शांकर विद्यापीठ, वैदिक स्मार्त धर्माश्रम, धर्मचैतन्य संस्था, यांतून अध्यापक म्हणून कांहीं वर्षें काम केलें. हल्लीं घरींच खासगी शाळा चालूं आहे. यांतून दशग्रंथाच्या परीक्षेस दोन विद्यार्थी व जटाघनाच्या परीक्षेस एक विद्यार्थी पाठविण्यांत आला.

मुंबईस अ. भा. वर्णाश्रम स्वराज्य संघाच्या सहाव्या अधिवेशनास रत्नागिरीचे प्रतिनिधि म्हणून गेले होते. शिष्यस्वामी शंकराचार्यमठ यांच्या पुण्याच्या मुक्कामांतील सत्कार मंडळांत यांनीं पुढाकारानें काम केलें. स्वाध्याय–मंडळ, औंध व वैदिक संशोधन मंडळ, पुणें, यांचीं वेदविषयक प्रुफें तपासण्याचें काम कांहीं वर्षें वे. भालचंद्रभटजी करीत होते. इंदूर येथील नरहरगुरु वैदिकाश्रमाच्या अतिथिगृहाच्या पायाचा मुहूर्त यांचे हस्तें झाला. पुण्यांतील प्राचीन पद्धतीच्या सार्वजनिक संस्थांतून सभासद म्हणून काम करतात. संस्कृत कमिशनपुढें पुणें वेदशाळेचे प्रतिनिधि म्हणून यांची साक्ष झाली. सध्यां अष्ट-विकृतींचें लेखन करण्याचा उपक्रम वे. भालचंद्रभटजी यांनीं केला आहे.

वे. भालचंद्रभटजी यांनी पशुपतेश्वर, केदारनाथ, बदरीनारायण, त्रिस्थळी, सोमनाथ इ. यात्रा केल्या आहेत. यांच्या भार्येचें नांव – शारदाबाई पिता अनंत रामचंद्र ठाकूर, गराडें. यांना तीन पुत्र आहेत.

• • •

## ९ : वे. गदाधर उद्धव काणे

### खेड ( रत्नागिरी )

यांचा जन्म शके १८०९ मध्यें झाला. यांचे वडील उद्धव विष्णु हे रत्नागिरी जिल्ह्यांतील खेड येथें भिक्षुक होते. मातेचें नांव यशोदाबाई. वे. गदाधर-भटजींनीं ऋग्वेदाचें क्रमान्त अध्ययन खेड येथील राममंदिराचे पुजारी वे. पाध्ये यांच्याजवळ केलें. तसेंच फलज्योतिषशास्त्राचाहि यांचा व्यासंग होता. वे. गदाधरभटजी यांचें सर्व आयुष्य खेडासच गेलें. व्यवहार व सामान्य कायदा जाणणारे व चार मंडळींत मिळून मिसळून राहाणारे वैदिक व ज्योतिषी अशी त्यांची प्रसिद्धि होती.

वे. गदाधरभटजींच्या पत्नीचें नांव पार्वतीबाई. या वेरळ, ता. खेड येथील आप्पाजी दाजी पेंडसे यांच्या कन्या होत्या. यांना सहा पुत्र आहेत. वे. गदाधरभटजी शके १८७६ मध्यें वारले.

• • •

## १० : वे. बाळ दीक्षित काळे

### काशी

यांचा जन्म सन १८३८ मध्यें झाला. यांनीं ऋग्वेदाचें पदांपर्यंतचें अध्ययन ब्रह्मावर्तास वे. धुपकर गुरुजी यांच्याजवळ केलें. नंतर ते क्रमाच्या अध्ययना करितां काशीस वे. दिनकर बाळकृष्ण जोशी यांच्याकडे आले. गुरुजींनीं त्यावेळीं यांना एकट्यालाच क्रम शिकविला. त्यावेळची अशी आख्यायिका सांगतात कीं, गुरुजी तिसऱ्या मजल्यावर बसून, तळमजल्यावर असलेल्या या विद्यार्थ्यास संथा देत व विद्यार्थ्यानेंहि ती येवढ्या मोठ्यानें म्हटली पाहिजे कीं, ती वर गुरूंना स्पष्ट ऐकूं गेली पाहिजे. तशी या विद्यार्थ्याला गुरूंनीं अटच घातली होती. या कसोटीसहि वे. बाळ दीक्षित उतरले व त्यांनीं गुरूची मर्जी संपादन केली. गुरुजी मरणोन्मुख झाले तेव्हां त्यांच्या दोन्ही पुत्रांचें वेदाध्ययन अपूर्ण होतें. तेव्हां स्वतःची वेदशाळा चालविण्यास वे. बाळ दीक्षित यांनाच

गुरुजींनीं सांगितलें. गुरुजींच्या मुलांचें अध्ययन संपेपर्यंत वे. बाळ दीक्षित यांनीं दोन पर्याय पढविले. त्यांत तयार झालेल्या शिष्यवर्गांत पुढील वैदिक प्रमुख होते. १ वे. रामकृष्ण दिनकर जोशी २ वे. रामजी दिनकर जोशी. ३ वे. विनायक भटजी पांचगांवकर. ४ वे.चुनीलाल खेलावाड (गुजराथी). ५ वे. रामेश्वर दीक्षित नागर ( गुजराथी ). ६ वे. रामभटजी रटाटे ७ वे. महादेव दीक्षित चितळे. ८ वे. बाबूभट रामडोहकर. ९ वे. कृष्ण दीक्षित महाडकर.

वे. बाळभटजी यांच्या कांहीं विस्मयजनक हकीकती अद्याप सांगण्यांत येतात. त्यांना इच्छा होईल त्या दिवशीं गंगातीरावर बसून बारा तासांत ऋग्वेदसंहिता सर्वानुक्रमासहित स्पष्टपणें म्हणत. प्रतिवर्षीं महाशिवरात्रीला पंचक्रोशी यात्रेस पायीं निघत व ही ४२ मैलांची प्रदक्षिणा आटोपून सूर्यास्तास घरीं येत. या अवधींत पदांची संपूर्ण आवृत्ति चालतांना म्हणत असत. मकरसंक्रांतीला आदले दिवशीं काशीहून पायीं निघून, दुसरे दिवशीं पर्वाच्या वेळीं प्रयागास त्रिवेणीवर स्नान करीत व त्याच पावलीं परत फिरून रात्रींपर्यंत काशीस येत. या पायीं प्रवासांत दशग्रंथाची आवृत्ती म्हणत असत! हा क्रम त्यांचा पुष्कळ वर्षें अव्याहत चालू होता, असेंहि सांगतात.

वे. बाळंभटजी यांनी अग्निहोत्र घेतलेलें होतें, व पुढें स्वतःचे चिरंजीव वे. सोनु दीक्षित यांच्याकडूनही तें त्यांनीं घेवविलें होतें.

वे. बाळंभटजींच्या पत्नीचें नांव सावित्रीबाई पिता गोविंद वासुदेव सोमण, काशी. वे. बाळंभटजी सन १८९६ मध्यें वारले.

• • •

## ११ : वे. विष्णु ( बाळंभट ) हरि काळे

### मिरज

यांचा जन्म मिरजेस शके १७७४ चे सुमारास झाला. यांचें ऋग्वेदाच्या दशग्रंथाचें अध्ययन घरीं वडिलांजवळ झालें. व्यावहारिक शालेय शिक्षण मुळींच झालें नव्हतें. अक्षरओळख व पाढे यांच्यापुढें मजल कधींच गेली

नाहीं. त्यामुळें पुढें संस्थानच्या वेदशाळेवर गुरुजी म्हणून नेमणूक झाल्यावर पगाराच्या पावतीवर सही करण्यास त्यांना बरीच मोठी जागा लागे! पण व्यावहारिक शिक्षण नसलें तरी वेदाध्यापनाच्या कामांत त्यांनीं दीर्घकाल पर्यंत जी महत्त्वाची कामगिरी केली ती स्मरणीय आहे.

स्वतःचें अध्ययन झाल्यावर, त्यांनीं मिरज संस्थानच्या वेदशाळेंत अध्यापनाचें काम सुरूं केलें व तें सतत सुमारें पंचेचाळीस वर्षें चालविलें. गुरुजी म्हणून त्यांना सुरुवातीपासून शेवटपर्यंत दरमहा दहा रुपये पगार मिळत असे! पण तशा स्थितींतहि, येईल त्या परस्थ विद्यार्थ्यांस हौसेनें, आस्थेनें, व प्रसंगीं पदरचे पैसे खर्चून व घरीं ठेवून यांनीं शिकविलें. असे निदान २५ तरी विद्यार्थी त्यांचे घरीं राहून शिकून गेले. वे. बाळंभटजी यांच्या हाताखालीं पाठशाळेंत एकंदर १००।१२५ विद्यार्थी वेदाध्ययन करून गेले.

वे. बाळंभटजी यांचा स्वभाव भाविकहि होता. मिरज येथील श्रीरामलिंगानजिकच्या दत्ताची पालखी प्रत्येक शनिवारीं निघत असते. पालखीनंतर वेदपठनाची सेवा यांनीं श्रीपुढें अव्याहत ५० वर्षें केली.

वे. बाळंभटजींच्या पत्नीचें नांव रमाबाई. या मिरज येथील करमरकर घराण्यांतील होत्या. यांना ८ अपत्यें झालीं. पण एक मुलगा व एक मुलगी मोठ्या वयापर्यंत वांचलीं. पैकीं पुत्र गोविंद यानेंहि क्रमान्त वेदाध्ययन केलें होतें. तो बाळंभटजींच्या हयातींतच वयाच्या २५।२६व्या वर्षीं वारला. एकुलत्या एक पुत्राच्या निधनामुळें वे. बाळंभटजींना मोठाच मानसिक धक्का बसला व त्यांची भ्रमिष्टासारखी स्थिति झाली. पुत्रनिधनानंतर दोन वर्षांनीं वे. बाळंभटजी शके १८४६ मध्यें वारले.

• • •

## १२ : वे. दत्तात्रय पांडुरंग किंजवडेकर
### पुणें

यांचा जन्म बेळगांव जिल्ह्यांतील पाटणें या गांवीं शके १८३९ मध्यें झाला. यांचें मूळगांव कणकुंबी, जि. बेळगांव हें होय. यांच्या वडिलांचें नांव पांडुरंग गोपाळ व मातेचें नांव लक्ष्मीबाई. या गोव्यांतील कुण्णेगांव येथील वे. चिंतामणभटजी पराडकर यांच्या कन्या. वे. दत्तात्रयभटजी किंजवडेकर यांचे पणजोबा धोंडभटजी किंजवडेकर हे दशग्रंथी वैदिक होते. आजोबा गोपाळभटजी यांनींही वेदाध्ययन केलें होतें. वडील पांडुरंगभटजी यांच्यावर प्रपंचाचा भार अल्पवयांत पडल्यानें त्यांचें वेदाध्ययन फारसें होऊं शकलें नाहीं. चुलते नृसिंहशास्त्री यांनीं शास्त्राध्ययन केलें. यामुळें आजोबा गोपाळभटजी यांना अंतकाळीं फार वाईट वाटलें व त्यांनीं उद्गार काढले, " घरांतील वेदविद्या गेली व शास्त्रविद्या आली. " तेव्हां नृसिंहशास्त्री यांनीं त्यांना वचन दिलें, " पुढच्या पिढींत आपल्या इच्छेप्रमाणें पुन्हां वेदविद्या चालू करीन. " हें वचन पूर्ण करण्याकरतां वे. दत्तात्रयभटजी यांना पुढें वेदाध्ययनाकडे घालण्यांत आलें. वेदाध्ययन सुरू करतांना त्यांचें मराठी चौथीपर्यंत शालेय शिक्षण झालें होतें. वे. वासुदेवभटजी जायदे यांचेकडे संहितेचें बरेंच अध्ययन झालें. त्यानंतर पुढील अध्ययनाकरतां वे. दत्तात्रयभटजी यांना सांगलीच्या सरकारी वेदशाळेंत वयाच्या १३ व्या वर्षीं ठेवण्यांत आलें. तेथील गुरुजी वैदिकचूडामणि काशीनाथभटजी केळकर यांचेजवळ दशग्रंथांपैकीं बरेंच अध्ययन झालें. त्यावेळीं वे. वासुदेव हरि भातखंडे, नांगाव; वे. नारायण हरि केळकर, अलीबाग, नरहरि वासुदेव टिळक, सांगली; वे. विनायक सीताराम आठल्ये भडकंबें, हे यांचे सहाध्यायी होते. केळकर गुरुजी निवृत्त झाल्यानंतर वे. गोविंद रामकृष्ण मांडवगणे यांची नेमणूक शाळेचे गुरुजी म्हणून झाली. त्यांचेकडे दशग्रंथांपैकीं राहिलेलें अध्ययन पूर्ण करून, शके १८६१ मध्यें वेदशास्त्रोत्तेजक सभेची दशग्रंथांची परीक्षा वे. दत्तात्रयभटजी यांनीं दिली. त्या परीक्षेंत २०० पैकीं १९५ गुण यांना मिळाले व पारितोषिक आणि 'वेदकोविद' ही पदवी देण्यांत आली. बडोद्यासही दशग्रंथांची परीक्षा दिली तेव्हां पारितोषिक व 'ऋग्वेदरत्न' ही पदवी मिळाली.

यानंतर सांगली सोडून वे. दत्तात्रयभटजी यांनीं कल्याणास राहून चुलते नृसिंह शास्त्री यांच्याजवळ पावणे दोन वर्षें संस्कृतचें अध्ययन केलें. तेथें काव्य, नाटक, व्युत्पत्ती व कौमुदीच्या कांहीं भागाचें अध्ययन झालें. वे. शा. सभेची व्युत्पत्ति प्रथमा ही परीक्षाही दिली. पण नंतर चैत्र शु॥ १ शके १८६४ पासून पुणें वेदपाठशाळेंत ऋग्वेदी मुख्याध्यापक म्हणून वे. दत्तात्रयभटजी यांची नेमणूक झाल्यानें, संस्कृतचें अध्ययन पूर्ण होऊं शकलें नाहीं.

वे. दत्तात्रयभटजी यांनीं शके १८६७ मध्यें पुण्यास बेलबागेंत जटेचें पारायण केलें व शके १८७० मध्यें तेथेंच घनपारायणही केलें. दोन्ही पारायणांचे वेळीं जनतेकडून पारायणींचा उत्तम सत्कार करण्यांत आला. पुणें वेदशाळा व पुण्यांतील इतर धार्मिक संस्था व व्यक्ति यांनीं या कामीं आत्मीयतेनें साहाय्य केलें. घनपारायण–समाप्तीच्या वेळीं श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य अधिकारी शिष्य स्वामी महाराज (काशीकर) यांनीं आशीर्वाद व 'ऋग्वेदचूडामणि' ही पदवी दिली. घनपारायण–समाप्तीच्या वेळीं वे. दत्तात्रयभटजी यांचे वडील व मातुःश्री, गुरुजी वे. काशीनाथभटजी केळकर व चुलते नृसिंहशास्त्री हे समारंभाला उपस्थित होते. असा योग येणें ही गोष्ट महद्भाग्याचीच समजली पाहिजे.

पारायण आटोपल्यानंतर वे. दत्तात्रयभटजी यांनीं वडील, मातुःश्री, पत्नी व मुलें यांना बरोबर घेऊन त्रिस्थळी यात्रा केली.

वे. दत्तात्रयभटजी यांना स्वाहाकाराकरितां व अनुष्ठानांकरितां सर्व महाराष्ट्रांतून व बाहेरूनही अनेक ठिकाणचीं निमंत्रणें येतात. अशा स्वाहाकारांतून व उत्सवांतून ते भाग घेतात. दिल्लीस करपात्रीजी महाराज यांनीं शके १८६५ मध्यें कोटिमहायज्ञ केला. त्यांत वेदपारायणामध्यें निमंत्रणावरून यांनीं भाग घेतला. शके १८७३ मध्यें सौराष्ट्रांत श्रीसोमनाथाचे अर्चेकरतां वे. दत्तात्रयभटजी गेले होते. तसेंच विलेंपार्लें येथें ब्रह्मपारायण यज्ञांतही यांना पाचारिलें होतें. पुण्याच्या मीमांसा महाविद्यालयांत शके १८७८ मध्यें चातुर्मास्य याग झाला, त्यांत यांनीं हौत्र केलें. साताऱ्यास श्रीशंकराचार्य मठांत अनेक वर्षें दशग्रंथ पारायणांत भाग घेतात. शके १८७९ मध्यें कानपूर येथें सर्व-शाखा वैदिक संमेलनास निमंत्रणावरून गेले होते.

पुण्याच्या वे. शा. सभेंत व पंढरपूरच्या गर्गे गुरु विद्यापीठांत वेदपरीक्षक म्हणून काम केलें आहे. वे. वि. ह. घैसास यांच्या जटापारायणाच्या वेळीं व वे. विश्वनाथ वामन देव, काशीकर यांच्या घनपारायणाच्या वेळीं श्रवणाकरतां यांची नियुक्ति झाली होती. संकेश्वर पीठाकडून वे. दत्तात्रयभटजी यांना "वैदिक शिरोमणि" व "वेदाचार्य" अशा पदव्याही मिळाल्या आहेत. आज वे. दत्तात्रयभटजी हे पुण्यांत वेदविद्येंतील भूषण समजले जातात. सन १९६१ मध्यें गुजराथ राज्यांतील अंबाजी संस्थानांत अखिल भारतीय वेदपाट-स्पर्धेत यांना ५०० रुपयाचें पहिलें पारितोषिक मिळालें.

वे. दत्तात्रयभटजी गेलीं २१ वर्षें पुणें वेदपाठशाळेंत ऋग्वेदाचे मुख्याध्यापक म्हणून काम करीत आहेत. त्यांच्या शिष्यांपैकीं वे. रा. स. फणसळकर यांनीं वे. शा. सभेची व काशीच्या साङ्गवेदविद्यालयाची घनान्त परीक्षा दिली आहे. वे. भा. वा. करंबेळकर यांनीं वे. शा. सभेची जटा–घनाची परीक्षा दिली आहे.

वे. दत्तात्रयभटजी यांच्या भार्येचें नांव सुमतीबाई पिता दामोदरभटजी नवरे, सातारा. यांना भास्कर या नांवाचा पुत्र व तीन कन्या आहेत.

• •

## १३ : वे. विनायक चिंतामण केळकर

### मिरज

यांचा जन्म शके १८०१ मध्यें मिरजेस झाला. यांचे वडील चिंतामणि भास्कर हे रत्नागिरी जिल्ह्यांतील आचरें येथून मिरजेस राहाण्यास आले. तेथें ते भिक्षुकी व सावकारी करीत. वे. विनायकभटजींच्या मातेचें नांव भागीरथीबाई. या हिंदळ्याचे रामचंद्र बल्लाळ पटवर्धन यांच्या कन्या होत्या. वे. विनायकभट तथा बंडंभट यांचें ऋग्वेदाचें क्रमान्त अध्ययन मिरजेच्या वेदशाळेंत वे. विष्णु हरि काळे गुरुजी यांच्याजवळ झालें. वे. विनायकभटजी यांची काशीयात्रा व दिल्ली, हरद्वार या ठिकाणीं प्रवास झाला. वे. विनायक भटजी यांनीं मिरजेच्या वेदशाळेवर कांहीं दिवस गुरुजी म्हणून काम केलें.

वे. विनायकभटजी यांच्या भार्येचें नांव कमलजाबाई पिता विठ्ठलराव भावे. यांना गणेश, नीळकंठ व महादेव असे तीन पुत्र आहेत. वे. विनायकभटजी शके १८८० मध्यें वारले.

● ● ●

## १४ : वे. विश्वनाथ दिनकर केळकर

### बांबर (गोंवा)

यांचा जन्म सन १८७४ मध्यें झाला. यांच्या वडिलाचें नांव दिनकर जनार्दन व मातेचें नांव भागीरथी. वे. विश्वनाथ भटजींचें ऋग्वेदाच्या दशग्रंथांचें अध्ययन झालेलें होतें. अध्ययन संपल्यावर गडहिंग्लज, चिकोडी व बेळगांव येथील वेदशाळांतून अध्यापकाचें काम केलं. वयाच्या पन्नाशीनंतर गोवें प्रांतांत सत्तरी तालुक्यांत बांबर येथें राहात असत. गोव्यांत मुलांना शाळांतून किमान मराठी तरी शिक्षण मिळावें, या दृष्टीनें जे प्रयत्न झाले त्यांत वे. विश्वनाथ भटजी सहभागी होते.

वे. विश्वनाथ भटजींच्या पत्नीचें नांव सुंदराबाई पिता दामोदर मोरेश्वर वझे, गडहिंग्लज. यांना एक पुत्र व एक कन्या अशी संतति होती. पण पुत्र गजानन हे तरुणपणींच वारले.

वे. विश्वनाथभटजी सन १९४३ मध्यें वारले.

● ● ●

## १५ : वे. शा. सं. गणेश अनंत खरे

### गोकर्ण

यांचा जन्म शके १८२३ मध्यें झाला. यांचे वडील अनंत केशव हे वैदिक असून, प्रथम कांहीं वर्षे मुंडाजें, जि. द. कानडा येथें बागाइती करीत. नंतर ते श्रीक्षेत्र गोकर्ण येथें राहावयास आले. वे. गणेशशास्त्री यांच्या मातेचें नांव

गौरीबाई. वे. गणेशशास्त्री यांनीं कृष्णयजुर्वेदाचें क्रमान्त अध्ययन गोकर्णास वे. कृष्णाजी पांडुरंग दाते यांच्याजवळ केलें, नंतर त्यांनीं घनाचीहि तयारी केली. पुढें काव्य, साहित्य व वेदान्ताचें अध्ययन पं. अनंत महाबलेश्वर उपाध्याय, गोकर्ण यांचेजवळ केलें. हिरण्यकेशी, बौधायन व आश्वलायन श्रौतसूत्रांची व प्रयोगाची उत्तम माहिती पं. गणेशशास्त्री यांना आहे. त्यांनीं आजपर्यंत २५ मोठ्या यज्ञांतून आर्त्विज्य केलें आहे. पुण्यास झालेल्या सन १९५५ मधील वाजपेय यज्ञांत गणेशशास्त्री संचालक होते. यांनीं संहिता व ब्राह्मण ग्रंथांचें अर्थज्ञानपूर्वक अध्ययन केलें असल्यानें त्यांचें श्रौतप्रयोगाचें ज्ञान डोळस आहे, व त्यामुळें त्यांनीं केलेला श्रौतप्रयोग यथार्थ व परिणामकारक होतो. यज्ञाच्या निमित्तानें त्यांनीं भारतांत अनेक ठिकाणीं प्रवास केला आहे. स्वतः कृष्णयजुर्वेदी असून, पं. गणेशशास्त्री यांनीं सबंध ऋग्वेदाचें गुरुमुख केलेलें आहे. त्यांचे गुरुजी पं. अनंतशास्त्री यांची अट त्यांच्या विद्यार्थ्यांनीं इतरत्र परीक्षा देतां कामां नये अशी होती. त्यास अनुसरून पं. गणेशशास्त्री यांनीं दुसरीकडे कोठेंहि परीक्षा दिलेल्या नाहींत.

पं. गणेशशास्त्री यांनीं गोकर्णास गेलीं २० वर्षें स्वतःची खासगी वेदशाळा विनावेतन चालविली आहे. त्या शाळेंतून वेदाध्ययन पूर्ण केलेले पुढीलप्रमाणें विद्यार्थी आहेतः–१ वे. रामचंद्र गणेश कोडलेकेरे यांनीं पुण्याच्या वेदशास्त्रोत्तेजक सभेची घनाची परीक्षा दिली असून, शके १८७९ मध्यें पुण्यास कृष्णयजुर्वेदाचें घनपारायणहि केलें. या शाखेचें पुण्यांत झालेलें अलीकडच्या काळांतील हें पहिलेंच घनपारायण होय. २ वे. दत्तात्रय महाबलेश्वर ३ वे. विश्वेश्वर नागेंद्र उप्पुंद. यांचेशिवाय अनेक विद्यार्थी शाखाध्ययन करून गेले.

शके १८७९ मध्यें शृंगेरी जवळ शिरनाळी येथे सर्वपृष्ठाप्तोर्याम याग झाला त्यावेळीं यांना द्वारकेच्या शंकराचार्यांनीं 'श्रौतविज्ञानालंकार' अशी पदवी दिली. तसेंच 'वेदरत्न' अशीहि पदवी त्यांना मिळालेली आहे.

पं. गणेशशास्त्री यांच्या भार्येचें नांव सरस्वतीबाई. या वे. कृष्णाजी पांडुरंग दाते यांच्या कन्या आहेत. यांना केशव हे पुत्र असून, त्यांचेही क्रमान्त वेदाध्ययन झालेलें आहे व श्रौताचा अभ्यास ते करीत आहेत. त्यांनींही अनेक श्रौतयज्ञांत महत्त्वाचीं कामें केलीं आहेत.

• • •

## १६ : वे. परशुराम महादेव गद्रे


पुणें.

यांचा जन्म शके १८१८ मध्यें खडकाळें ( हल्लींचें कामशेत ) येथें झाला. यांचे वडील महादेव बाळकृष्ण हे गद्रे–लावगन, जि. रत्नागिरी येथून देशावर खडकाळें येथें आले व तेथें शेती करून राहात असत. वे. परशुरामभटजी यांच्या मातुःश्रीचें नांव उमाबाई. या भातगांवचे बगाजी विष्णु वैद्य यांच्या कन्या. वे. परशुरामभटजी सुमारें दीड वर्षांचे असतांना वडील वारले व कुटुंबाची आर्थिक परिस्थिति एकदम खालावली. वे. परशुरामभटजी यांचें शिक्षण मराठी चौथीपर्यंत खडकाळें येथें कसेबसें झालें. नंतर परशुरामभटजी व त्यांचे थोरले बंधु यादवराव यांना वे. रावजीभटजी जोगळेकर यांनीं पुण्यास आणलें. सदरचे जोगळेकर हे महादेव बाळकृष्ण यांचे जांवई होत. पुण्यास आल्यानंतर मधुकरी मागून पुणें वेद पाठशाळेंत परशुरामभटजी यांनीं कृष्णयजुर्वेदाचें अध्ययन सुरू केलें. नंतर जोगळेकर यांच्याशीं कांहीं मतभेद होऊन परशुरामभटजी त्यांचेकडून निघाले व पुणें अनाथ विद्यार्थी गृहांत राहाण्यास गेले. तेथें एक वर्ष वास्तव्य केल्यानंतर परशुरामभटजी यांना अंकगणितकर्ते कै. गणेश बळवंत लिमये यांच्या घरीं आश्रय मिळाला व तो दहा वर्षें टिकला. त्या अवधींत परशुरामभटजी यांनीं कृष्णयजुर्वेदाच्या पंचग्रंथांचें अध्ययन पुणें वेद पाठशाळेंत संपविलें. वेदाध्ययनांतील त्यांचे गुरु वे. कृष्णंभटजी गोगटे, वे. रामभटजी आपटे, वे. आण्णाभटजी आपटे व शेवटीं वे. अण्णाभटजी अभ्यंकर हे होते. अध्ययन चालू असतांनाच शके १८३८ मध्यें पुणें वेदपाठशाळेंत उपगुरुजी म्हणून वे. परशुरामभटजी यांची नेमणूक झाली. तेव्हांपासून आजपर्यंत प्रथम उपगुरुजी व नंतर गुरुजी म्हणून ते पाठशाळेंत सतत काम करीत आहेत. यांच्याजवळ कांहीं विद्यार्थ्यांनीं शाखाध्ययन पूर्ण केलें व नित्यकर्म शिकून आजपर्यंत शेंकडों विद्यार्थी गेले.

वे. परशुरामभटजी यांनीं पुण्याच्या वे. शा. सभेची व कोल्हापूर व इंदूर येथील वेदपरीक्षा दिल्या आहेत. इंदूर येथें यांना महावस्त्र मिळून सन्मान झाला.



वे. गोपिनाथ काशीनाथ आठवले (पृ. २)




वे. भालचंद्र वामन करंबेळकर (पृ. ६)




वे. बाळ दीक्षित काळे (पृ. ८)



वे. दत्तात्रय पांडुरंग किंजवडेकर (पृ. ११)



वे. शा. सं. **गणेश अनंत खरे** (पृ. १४)



वे. **प. म. गद्रेगुरुजी** ( पृ. १६ )

तसेंच पुणें वेदपाठशाळेच्या हीरकमहोत्सव प्रसंगींही शाळेचे गुरुजी म्हणून यांचा महावस्त्र देऊन सत्कार करण्यांत आला. त्रिस्थळी यात्रेनिमित्त काशीस गेले असतांना, वे. भिकू दीक्षित लेले यांच्या पाठशाळेंतर्फेंही सत्कार करण्यांत आला होता.

वे. शा. सभा, पुणें; सांगली संस्थानची वेदशाळा व पंढरपूर येथील गर्गेगुरु विद्यापीठ या ठिकाणीं वे. परशुरामभटजींनीं कृष्णयजुर्वेदाचे परीक्षक म्हणून काम केलें आहे. शके १८७९ मध्यें पुण्यास वे. रामचंद्रभटजी कोडलेकरे यांनीं कृष्णयजुर्वेदाचें घनपारायण केलें. त्यावेळीं श्रवणाकरतां वे. परशुरामभटजी यांची नियुक्ति झाली होती. श्रीसोमनाथाच्या प्रतिष्ठेच्या वेळीं निमंत्रणावरून वे. परशुरामभटजी सोमनाथास गेले होते.

सार्वजनिक संस्थांतून काम करण्याची वे. परशुरामभटजींना आवड आहे. वेदशास्त्रोत्तेजक सभेचे ते उपाध्यक्ष असून, पुण्याच्या महाराष्ट्र चित्तपावन संघाच्या नियामक मंडळाचे व महाराष्ट्र ब्राह्मणसभेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद आहेत.

वे. परशुरामभटजींच्या वयास ६० वर्षें पूर्ण झालीं तेव्हां पुणें वेदपाठशाळेनें डॉ. ना. भि. परुळेकर यांच्या हस्तें त्यांचा सत्कार मोठ्या थाटानें केला.

वे. परशुरामभटजींच्या पहिल्या पत्नीचें नांव लक्ष्मीबाई पिता विष्णु गणेश काळे, नांदिवडें; या भार्येस एक कन्या आहे. दुसरी पत्नी लक्ष्मीबाई पिता श्रीधर गणेश लेले, महाळुंगें. यांना काशीनाथ, बी. ए., एल्‌एल्. बी. व शरदचंद्र, बी. ए. असे दोन पुत्र व दोन कन्या आहेत.

## १७ : वे. भास्कर परशुराम गोखले

### विलेपार्लें

यांचा जन्म शके १८१७ मध्यें राजापूर तालुक्यांतील गोवळ या गांवीं झाला. यांनीं कृष्णयजुर्वेदाचें क्रमान्त अध्ययन वे. सीताराम बल्लाळ गोखले

गुरुजी यांच्याजवळ राजापुरास केलें. नंतर शके १८५८ मध्यें पुण्याच्या वे. शा. सभेची कृष्णयजुर्वेदाची द्वितीय परीक्षा दिली. याशिवाय इंदूर व कोल्हापूर येथेंहि वेदपरीक्षा दिल्या. ग्वाल्हेर येथें शके १८३९ मध्यें क्रमाचें पारायण केलें.

वे. भास्करभटजींच्या पत्नीचें नांव सरस्वतीबाई, पिता गोविंद रामचंद्र गोरे यांना पांडुरंग या नांवाचे चिरंजीव असून ते बी. कॉम्. झालेले आहेत. त्यांच्याजवळ विलेपार्ल्यास वे. भास्कर भटजींचें वास्तव्य आहे.

• • •

## १८ : वे. वासुदेव वामन गोखले

### पुणें

यांचा जन्म शके १८३९ मध्यें झाला. डोंगर, ता. राजापूर येथील प्रसिद्ध वैदिक कै. वे. गोपाळभटजी गोखले यांचे हे नातू होत. वे. वासुदेव भटजी यांचे वडील कै. वे. वामन गोपाळ हेहि वैदिक होते. मातेचें नांव रमाबाई पिता गोपाळ विठ्ठल परांजपे, मिठगवाणें. वे. वासुदेवभटजींचें कृष्णयजुर्वेदाचें क्रमान्त अध्ययन राजापूरच्या वेदशाळेंत वडिलांजवळ झालें. घरीं आजोबांचें अग्निहोत्र असल्यानें श्रौताचीहि पुष्कळ माहिती झाली. पुण्याची वे. शा. सभा, पंढरपूरचें गर्गे-गुरु विद्यापीठ येथें क्रमान्त परीक्षा दिल्या. तसेंच बडोद्यास व इतर संस्थानांतहि वेदपरीक्षा दिल्या. वे. शा. सभेचे परीक्षक म्हणूनहि काम केलें आहे.

वे. वासुदेव भटजी यांनीं सांगली, वाई, पुणें येथें झालेल्या अग्निष्टोम, वाजपेय, सर्वतोमुख, पौंडरीक, बृहस्पतिसव वगैरे यज्ञांत आर्त्विज्य केलें आहे.

वे. वासुदेव भटजी यांच्या पत्नीचें नांव इंदिराबाई पिता शंकर विष्णु बापट, गणपतीपुळें. यांना माधव नांवाचा मुलगा आहे.

• • •

## १९ : वे. सीताराम बल्लाळ गोखले

### राजापूर

यांचा जन्म शके १७८७ मध्यें झाला. यांच्या वडिलांचें नांव बल्लाळ विठ्ठल व मातेचें नांव गौरबाई. वे. सीतारामभटजींनीं कृष्णयजुर्वेदाचें व याज्ञिकीचें अध्ययन गोळप येथें वेदशाळेंत केलें. अध्ययन चालू असतांना हे मधुकरी मागत असत. नंतर राजापूरच्या हिरण्यकेशी पाठशाळेंत सुमारें २० वर्षें अध्यापन करीत. राजापूरचे श्री. जगन्नाथराव शेवडे यांचा वे. सीतारामभटजींना आश्रय असे.

वे. सीताराम भटजींच्या पत्नीचें नांव जानकीबाई. यांना एक पुत्र व एक कन्या अशीं अपत्यें आहेत. पुत्र वे. दत्तात्रयभटजी हे वैदिक असून, मुंबईस राहातात.

वे. सीतारामभटजी काशीयात्रेस गेले असतां तेथें आकस्मिपपणें शके १८५० मध्यें वारले.

●●●

## २० : वे. बाळकृष्ण विष्णु गोगटे

### पुणें

यांचा जन्म शके १८१४ मध्यें पुण्यास झाला. यांच्या घराण्याचें मूळ गांव मालवण तालुक्यांतील चिंदर–त्रिंबक हें होय. तेथून वे. बाळकृष्ण भटजींचे निपणजे गणेशभट तालीकोट येथें गेले. तेथें कांहीं वर्षें वास्तव्य करून नंतर ८६ वर्षांपूर्वी पुण्यास आले. गेल्या चार पिढ्या या घराण्यास श्री. सरदार रास्ते यांचा आश्रय आहे. वे. बाळकृष्ण भटजींच्या वडिलांचें नांव विष्णु प्रभाकर व मातेचें नांव अन्नपूर्णाबाई पिता महादेव गंगाधर जोशी. वे. बाळकृष्णभटजी यांनीं कृष्णयजुर्वेदाच्या पंचग्रंथांचें अध्ययन प्रथम वे. आण्णाभटजी अभ्यंकर व नंतर वे. रामभटजी खरे यांच्याजवळ केलें.

सांगली व भोर येथें परीक्षा दिल्या. श्री. रास्ते यांनीं १०।१२ वर्षें वांईस देव ठेवले होते. त्या मुदतींत वे. बाळकृष्ण भटजी यांचेंहि वास्तव्य पूजेकरतां वांईस होतें. आतां पुण्यासच राहातात.

वे. शा. सभेचे सन १९४१ मध्यें परीक्षक होते. सांगलीच्या वे. शंकर दीक्षित नातू यांच्या दोन यज्ञांत व शके १८७१ मध्यें वे. निळंभटजी लेले यांनीं अग्निष्टोम केला त्यांत यांनीं आर्त्विज्य केलें होतें. यांनीं घरीं स्मार्ताग्नि ठेविला आहे.

वे. बाळकृष्णभटजी यांची पहिली भार्या–राधाबाई पिता विनायक बाळंभटजी रानडे. यांना दोन मुलगे आहेत. दुसरी भार्या–राधाबाई पिता गंगाधर जोशी, जमखंडी. यांना एक मुलगा व दोन कन्या आहेत.

● ● ●

## २१ : वे. गजानन महादेव गोडबोले

### सातारा

यांच्या घराण्याचें मूळ गांव देवाचें गोठणें, जि. रत्नागिरी हें होय. तेथून संगम–माहुली येथें सुमारें दीडशें वर्षें वास्तव्य झालें. नंतर अलीकडे २५–३० वर्षांपासून सातारा येथें या घराण्याचें राहाणें आहे. वे. गजाननभटजी यांचा जन्म माहुली येथें शके १८२३ मध्यें झाला. यांचे वडील महादेव बाळंभटजी यांनीं क्रमान्त वेदाध्ययन केलेलें होतें. वे. गजाननभटजी यांच्या मातेचें नांव यमुनाबाई पिता गोविंदराव लिमये, लिंब. वे. गजाननभटजींनीं कृष्णयजुर्वेदाच्या पंचग्रंथांचें अध्ययन वे. परशुराम (नाना) गोविंद गोडबोले यांच्याजवळ केलें. नंतर पुणें येथें वे. शा. सभेची पंचग्रंथांची परीक्षा शके १८५६ मध्यें दिली. तसेंच कोल्हापूर येथेंहि नंतर परीक्षा दिली. अलीकडे इंदूर येथें नरहर गुरुंच्या वाढदिवसाच्या वेळीं वैदिकाश्रमातर्फें संभावना देऊन त्यांचा सत्कार करण्यांत आला.

वे. गजाननभटजी यांच्या भार्येचें नांव सीताबाई पिता हरिभाऊ गोखले, महागांव. यांना प्रभाकर व नारायण असे दोन पुत्र आहेत.

• • •

## २२ : वे. दत्तात्रय रामकृष्ण गोरे

### काशी

यांचा जन्म सन १९१४ मध्यें झाला. यांचे वडील वे. रामकृष्णभटजी हे काशींतील प्रसिद्ध वैदिक होते. वे. दत्तात्रय भटजी यांचें ऋग्वेदाचें संपूर्ण अध्ययन काशीस वे. विनायक दीक्षित जोशी गुरुजी यांच्याजवळ झालें. स्मार्तयाज्ञिक व धर्मशास्त्र या विषयांचेंही यांना चांगलें ज्ञान आहे. हल्लीं ते वडिलांच्या प्रमाणेंच मथुरेस गोपाल वेदपाठ शाळेंत अध्यापक म्हणून काम करीत आहेत. वे. दत्तात्रय-भटजी अविवाहित आहेत.

• • •

## २३ : वे. रामकृष्णभटजी गोरे

### काशी

यांचा जन्म काशीस सन १८८९ मध्यें झाला. यांचें मूळगांव कोंकणांतील संगमेश्वर हें होय. यांच्या घराण्याचें मूळ आडनांव जोशी. नंतर यांना गोरे म्हणूं लागले. वे. रामकृष्णभटजी यांनीं ऋग्वेदाच्या दशग्रंथांचें अध्ययन काशीस वे. बाळंभटजी पेंडसे यांच्याजवळ केलें. नंतर पुण्याच्या वे. शा. सभेची दशग्रंथांची परीक्षा दिली. यांना श्रौताची, स्मार्तयाज्ञिकाची व धर्मशास्त्राची चांगली माहिती होती. वऱ्हाड, नागपूर, महाराष्ट्र व गुजरात यांमध्यें यांनीं बराच प्रवास केला होता, व बडोद्यास चातुर्मास्यांत बरींच वर्षें मुक्काम करीत. सन १९४० पासून वे. रामकृष्णभटजी यांची मथुरेस गोपाल वेदशाळेंत अध्यापक म्हणून नियुक्ति झाली व तें काम त्यांनीं शेवटपर्यंत केलें.

पं. भाऊशास्त्री वझे हे यांचे श्वशुर होत. वे. रामकृष्णभटजी यांना दत्तात्रय नांवाचे पुत्र असून, ते वैदिक आहेत.

वे. रामकृष्णभटजी सन १९४५ मध्यें वारले.

● ● ●

## २४ : वे. रामचंद्र बजंभट जोशी घांगरेकर

### चिखलें

यांचा जन्म सन १८६३ चे सुमारास झाला. वडिलांचें नांव विश्वनाथ ( बजंभटजी ) बहिरव व मातेचें नांव अन्नपूर्णाबाई. चिखलें, ता. पनवेल येथें वडिलांचा भिक्षुकीचा व्यवसाय होता. वे. रामभटजी यांनीं ऋग्वेदाचें क्रमान्त अध्ययन कर्जत तालुक्यांतील तिवरें या गांवीं वे. बाळंभट भाऊ काळे यांच्याजवळ केलें. श्री. तिवरेकर जोशी यांचेकडे ते तिवऱ्यास राहात असत. अध्ययन संपल्यानंतर वे. रामभटजी यांचें वास्तव्य चिखलें या गांवीं होतें. त्यांची घरची परिस्थिति बरी असल्यानें ते गांव सोडून बाहेर फारसे पडले नाहींत.

वे. रामभटजींच्या पत्नीचें नांव जानकीबाई पिता महादेव गोविंद जोशी, इनामदार, नेरें. यांना मुकुंद या नांवाचे पुत्र आहेत.

वे. रामभटजी सन १९३० मध्यें वारले.

● ● ●

## २५ : वे. विनायक हरि घैसास

### पुणें

याचा जन्म श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथें शके १८३८ मध्यें झाला. यांच्या घराण्याचें वास्तव्य क्षेत्रोपाध्याय म्हणून त्र्यंबकेश्वर येथें पेशवाईच्या काळापासून आहे. यांच्या वडिलांचें नांव हरि भास्कर. मातेचें नांव जानकीबाई पिता

वे. विष्णु बाळकृष्ण तथा आप्पाभटजी लेले, नाशिक. वे. विनायकभटजी यांचें सुरुवातीचें वेदाध्ययन त्र्यंबकेश्वरीं वे. सोमनाथ दाजी घैसास व वे. परशुरामभटजी घैसास यांच्या वेदशाळेंत झालें. नंतर पदांपासूनचें अध्ययन पुण्यास वेदाचार्य गोविंदभटजी फाटक यांच्याजवळ वैदिकाश्रमांत झालें. नंतर पुणें येथील वेदशास्त्रोत्तेजक सभेंत वेदाची क्रमान्त परीक्षा दिली व वेदकोविद ही उपाधि मिळविली.

वे. विनायकभटजी यांनीं पुढें लिहिल्याप्रमाणें वेदपारायणें केलीं :— सन सन १९५० मध्यें ठाणें येथें क्रमपारायण. सन १९५१ मध्यें बडोद्यास जटा-पारायण. सन १९५२ मध्यें पुणें येथें बेलबागेंत जटा–पारायण. या पारा-यणाच्या समाप्तीच्या वेळीं श्रीशंकराचार्य शिरोळकर स्वामी यांनीं विनायक-भटजींना ' वेदमार्तंड ' अशी पदवी देऊन गौरव केला. सन १९५६ मध्यें सोलापुरास जटा-पारायण. सन १९५७ मध्यें रत्नागिरी व जळगांव येथें ॐकार-पूर्वक क्रमपारायण. त्याच वर्षीं बेळगांव येथें ॐ गं ॐ हें बीज लावून क्रमपारायण. सन १९५९ मध्यें विलेपार्लें येथेंही वे. विनायकभटजींनीं याच-प्रमाणें क्रमपारायण केलें. पुण्यास विनायकभटजी यांनीं आपल्या घरीं गेलीं कांहीं वर्षें वेदशाळाही चालविली आहे.

वे. विनायक भटजी यांची धार्मिक प्रवृत्तीचें सार्वजनिक कार्य करण्याची हौस उल्लेखनीय आहे. वेदाचार्य फाटक गुरुजी यांच्या निधनानंतर त्यांच्या शिष्यांनीं फाटक गुरुजी विद्यार्थी अनुष्ठान–मंडळ स्थापन करून, प्रतिवर्षीं ऋक्संहितास्वाहाकार मंडळामार्फत सुरू केला. त्या स्वाहाकारांत व तदनुषंगानें होणाऱ्या कार्यक्रमांत वे. विनायकभटजी यांचा महत्त्वाचा भाग असतो. पुण्यांतील शनिपार ते ब्राह्मण कार्यालय या रस्त्याला ' वेदाचार्य फाटक गुरुजी रस्ता ' हें नांव महानगरपालिकेकडून देवविण्यास यांचीच खटपट कारणीभूत आहे. स्वतःचे गुरु वे. गोविंदभटजी फाटक यांचें चरित्र डॉ. राहुरकर व डॉ. सहस्रबुद्धे यांच्याकडून लिहवून घेऊन तें विनायकभटजी यांनीं प्रसिद्ध केलें. पुण्यास फाटक गुरुजी स्मारक मंदिर व त्र्यंबकेश्वर येथें वैदिक महाविद्यालय स्थापन करण्याची त्यांची मनीषा आहे.

वे. विनायकभटजींच्या भार्येचें नांव विमलाबाई पिता केशव नारायण आपटे, पुणें. यांना चार पुत्र व दोन कन्या अशीं अपत्यें आहेत.

• • •

## २६ : वे. गंगाधर मणिराम चांदेकर

### काशी

यांचें कृष्णयजुर्वेदाचें अध्ययन वे. भिकू दीक्षित लेले व वे. रामभटजी देव यांच्याजवळ झालें. श्रौत व याज्ञिक विषयाचा अभ्यासही केला होता. यांची म्हणणी उत्तम व पाठांतर दांडगें होतें. अध्ययन संपल्यावर काशीच्या सांगवेद विद्यालयांत अध्यापनाचें काम करीत.

वे. गंगाधरभटजींच्या पत्नीचें नांव मैनाबाई पिता भय्याजी होशिंग. यांना अपत्य नाहीं.

वे. गंगाधरभटजी तरुणपणींच कॉलरा होऊन सन १९४९ मध्यें वारले.

• • •

## २७ : वे. सुब्रह्मण्य महाबलेश्वर चित्रिगेमठ

### गोकर्ण

यांचा जन्म शके १८०० चे सुमारास झाला. यांनीं कृष्णयजुर्वेदाचें क्रमान्त अध्ययन केलें असून, गोकर्णास स्वतःच्या घरीं पन्नास वर्षें वेदशाळा चालू ठेविली आहे. त्या शाळेंत आजपर्यंत अनेक विद्यार्थी अध्ययन करून गेले. वे. सुब्रह्मण्यभटजी यानीं अग्निहोत्र ठेवलें असून, सोमयाग व चयन केले आहेत. यांना चार पुत्र असून त्यांचेपैकीं गणपति व गजानन वैदिक आहेत.

• • •

## २८ : वे. अनंत नीलकंठ जावडेकर

### बडोदें

यांचा जन्म शके १८१४ मध्यें झाला. यांचें मूळ गांव गोमंतकांतील सुर्लें हें होय. यांचे वडील नीलकंठभटजी हे भिक्षुकी करीत. मातेचें नांव अन्नपूर्णाबाई असें होतें. यांनीं ऋग्वेदाचें क्रमान्त अध्ययन सातारा जिल्ह्यांतील लिंब येथें वे. गाडगीळ गुरुजी यांच्याजवळ केलें. थोडें ज्योतिष व व्युत्पत्तीहि म्हटली होती. इंदूर, ग्वाल्हेर, कोल्हापूर व बडोदें येथें वे. अनंतभटजींनीं दशग्रंथांच्या परीक्षा दिल्या असून हे बडोद्यांत उत्तम वैदिकांपैकीं गणले जात. यांची राहणी साधी व जुन्या पद्धतीची म्हणजे अंगांत कपडा न घालण्याइतकी जुन्या पद्धतीची असे.

वे. अनंतभटजी यांनीं नेपाळपर्यंत प्रवास केला होता व गुजराथमध्यें अनेक ठिकाणीं यज्ञ व स्वाहाकाराच्या निमित्तानें ते गेले होते. इंदूरच्या नरहरगुरु वैदिकाश्रमांत यांचा कांहीं वर्षांपूर्वीं सत्कार करण्यांत आला.

वे. अनंतभटजी हे ब्रह्मचारी होते. ते शके १८८२ मध्यें संन्यास घेऊन समाधिस्थ झाले.

● ● ●

## २९ : वे. बाळकृष्ण वासुदेव जोगळेकर

### गोकर्ण

यांचा जन्म शके १८०० चे सुमारास झाला. यांनीं ऋग्वेदाचें क्रमान्त अध्ययन गोकर्णास केलें. नंतर यांनीं अग्निहोत्र घेऊन तें पस्तीस वर्षें चालविलें. शके १८६४ मध्यें यांनीं सोमयाग केला. वे. बाळकृष्णभटजींच्या घराण्यांत अग्निहोत्राची परंपरा सात पिढ्यांची आहे. परंतु यांनींच प्रथम सोमयाग केला.

वे. बाळकृष्णभटजींच्या भार्येचें नांव राधाबाई पिता रामकृष्ण सुब्रह्मण्य मराठे, सोंदें. यांना पुत्र नीलकंठ व दिनकर या नांवाचे असून, त्यांचेपैकीं नीलकंठ हे वैदिक आहेत.

● ● ●

## ३० : वे. अनंत नीलकंठ जोशी येडूरकर

### येडूर–सातारा

यांचा जन्म शके १८०५ मध्यें जुगूळ येथें झाला. यांच्या घराण्याचें वास्तव्य सांगली संस्थानांतील येडूर या गांवीं होतें. वे. अनंतभटजींच्या वडिलांचें नांव नीलकंठ विरुपाक्ष आणि मातेचें नांव पार्वतीबाई. वे. अनंतभट यांनीं ऋग्वेदाचें अध्ययन प्रथम लिंच-गोवें येथें वे. गाडगीळ गुरुजींच्या जवळ व नंतर नरसोबाचे वाडीस वे. दामले गुरुजींजवळ केलें. येडूर येथें वीरभद्राचें देवालय आहे. त्या देवालयाच्या पुजारीपणाचा हक्क वे. अनंतभटजी यांच्या घराण्याकडे होता. पण लिंगायत समाजानें त्याबाबत वाद उत्पन्न करून, दावा प्रिव्ही कौन्सिलपर्यंत लढविला. हें काम एकूण १८ वर्षें चाललें. शेवटीं दावा लिंगायतांच्या बाजूनें होऊन, सन १९१९ मध्यें मंदिर लिंगायत समाजाच्या ताब्यांत गेलें. सबब वे. अनंतभटजींनीं येडूर सोडून कांहीं काळ मिरजेस वास्तव्य केलें. तेथें त्यांनीं आहिताग्नि लक्ष्मण दीक्षित गुळवणी यांच्याजवळ श्रौत कर्मकांडाचें अध्ययन केलें. नंतर साताऱ्यास श्रीसीता-रामचंद्र सनातन वैदिक धर्मसंस्था या ट्रस्टतर्फें अग्निहोत्र सुरूं करावयाचें आहे असें समजल्यावरून, साताऱ्यास येऊन सन १९२६ मध्यें अग्निहोत्राचा स्वीकार केला. नंतर ३५ वर्षें त्यांनीं अग्निनारायणाची सेवा पत्नीच्या मृत्यूपर्यंत अखंड चालू ठेविली. या कामीं त्यांच्या पत्नीचें त्यांना विशेष साहाय्य झालें. वे. अनंतभटजी यांना पांच पुत्र व सहा कन्या आहेत. पुत्रांपैकीं वे. रामचंद्रभटजी यांनीं शके १८८४ मध्यें वरील ट्रस्टतर्फें अग्निहोत्र स्वीकारलें आहे.

• • •

## ३१ : वे. गजानन सदाशिव जोशी

### पुणें

यांचा जन्म शके १८१५ मध्यें खेरशेत, ता. चिपळूण येथें झाला. यांचे वडील सदाशिव रामचंद्र हे खेरशेतास शेती व भिक्षुकी करीत असत. मातेचें नांव चंद्रभागाबाई पिता रघुनाथ गोपाळ खरे, लावगन. वे. गजानन भटजी यांचें ऋग्वेदाच्या दशग्रंथांचें अध्ययन, घरीं असलेल्या वेदशाळेंत वे. भिकंभटजी मोरेश्वर पित्रे यांचेजवळ झालें. याज्ञिक विषयाचें अध्ययन स्वतःच्या वडिलां-जवळ केलें. सर्व अध्ययन वयाच्या २० व्या वर्षीं संपवून शके १८३५ मध्यें वे. गजाननभटजी पुण्यास कै. वामन बल्लाळ ऊर्फ आण्णासाहेब केळकर यांच्याकडे उपाध्याय म्हणून आले. तेव्हांपासून आजपर्यंत वे. गजाननभटजी त्या घराण्यांत उपाध्याय म्हणून आहेत. वे. गजाननभटजी यांनीं इंदूर येथें दशग्रंथांची परीक्षा दिली व तेथें त्यांचा महावस्त्र व दक्षिणा देऊन सन्मान करण्यांत आला. ठिकठिकाणीं झालेल्या स्वाहाकारांत निमंत्रणावरून यांनीं भाग घेतलेला आहे. पुण्यांतील विद्यमान प्रमुख वैदिकांत वे. गजाननभटजी यांची गणना होते. स्वतःच्या षष्ट्यब्दपूर्तीनिमित्त यांनीं स्वतःही घरीं संहिता-स्वाहाकार केला. यांनीं पुण्यांत स्वतःचें घर बांधलें असून, त्रिस्थळी वगैरे यात्राही केल्या आहेत. सोमनाथ – मंदिराचा जीर्णोद्धार भारत सरकारनें करून सोमनाथाची पुन्हां स्थापना केली, त्याकरतां निमंत्रित असलेल्य वैदिकांत वे. गजाननभटजी होते. पुण्याच्या रामेश्वर – ब्रह्मवृंद – मंडळाचे ते अध्यक्ष आहेत.

वे. गजाननभटजी यांनीं आपले धाकटे बंधु वे. शा. सं. महेश्वरशास्त्री व वे. बाळकृष्णभटजी यांना खेरशेताहून पुण्यास आणलें व त्यांचें शिक्षण पूर्ण केलें. महेश्वरशास्त्री यांनीं धर्मशास्त्र व्याकरणादि शास्त्रांचें अध्ययन अल्पवयांत संपविलें व संस्कृत पंडित म्हणून चांगली प्रसिद्धी संपादिली. दुर्दैवानें त्यांचा अंत अकालीं ऐन तारुण्यांत झाला. वे. बाळकृष्णभटजी पुण्यांत पौरोहित्य करतात. वे. गजाननभटजी यांनीं त्यांचे थोरले बंधु कै. दत्तात्रय सदाशिव यांच्या पुत्रांच्या शिक्षणाचीहि व्यवस्था लाविली.

वे. गजाननभटजींच्या प्रथम पत्नीचें नांव यशोदाबाई पिता गणेश बाळकृष्ण केतकर, भिलें. यांना अपत्य नाहीं. दुसरी पत्नी यशोदाबाई, पिता रामचंद्र साने, देवरुख. यांचे पुत्र, प्रभाकर एम्. ए. बी. टी. व मनोहर बी. कॉम्., एल्एल् बी. आणि कन्या सौ. विमल भ्र. पांडुरंग हरि आठवले.

• • •

## ३२ : वे. चिंतामण विश्वनाथ जोशी

### गुळसुंदें – पुणें

यांचा जन्म शके १८४१ मध्यें गुळसुंदे, ता. पनवेल येथें झाला. यांच्या पूर्वजांस फार वर्षांपूर्वी देशावरून गुळसुंदें येथें जोसपणाचें वृत्तीकरतां स्थानिक आगरी लोकांनीं मुद्दाम नेलें व तेंव्हांपासून अनेक पिढ्या या घराण्याची वस्ती गुळसुंद्यास आहे. वे. चिंतामणभटजी यांच्या वडिलांचें नांव विश्वनाथ हरि. हे गुळसुंद्यास भिक्षुकी व शेती करीत. यांचे घरीं बरींच वर्षें वेदशाळा चालू होती. मातेचे नांव गंगाबाई, पिता रामचंद्र गणेश जोशी, जांभुळपाडें. वे. चिंतामणभटजींनीं ऋग्वेदाचें अध्ययन पदांपर्यंत चुलते खंडो हरि यांच्याजवळ केलें. उपग्रंथही त्यांनीं चुलत्यांजवळच म्हटले. नंतर क्रमाचें अध्ययन पुण्यास वे. गोविंदभटजी फाटक गुरुजी यांच्याकडे वैदिकाश्रमांत केलें. जटाघनाचें अध्ययन पुण्यासच वे. भा. वा. करंबेळकर यांचेजवळ झालें. अध्ययनानंतरहि वास्तव्य पुण्यासच आहे. वे. शा. सभेची दशग्रंथांची व जटाघनाची परीक्षा दिली आहे. पंढरपूरच्या गर्गेगुरु विद्यापीठांतहि दशग्रंथांची परीक्षा दिली. यांनीं पुण्यास जटेचें पारायण कसबा गणपती मंदिरांत शके १८७९ मध्यें केलें. त्यावेळीं नागरिकांतर्फे सत्कार करण्यांत आला. शके १८८० मध्ये दशग्रंथांचें पारायणही पुण्यास केलें. वे. चिंतामणभटजींच्या पत्नीचें नांव शारदा, पिता दत्तात्रय जोशी, पाचळ. या लग्नानंतर थोड्याच वर्षांत वारल्या.

• • •

## ३३ : वे. दत्तात्रय विष्णु जोशी, मेणवलीकर
### वांई

यांचा जन्म वाईस शके १८१५ मध्यें झाला. यांचे वडील विष्णु परशुराम हे नाणावलेले वैदिक होते. सर्व-प्रसिद्ध वैदिक परशुराम सदाशिव ऊर्फ बाबाजी जोशी मेणवलीकर यांचे वे. दत्तंभटजी हे नातू होत. यांच्या मातेचें नांव लक्ष्मीबाई, पिता विनायक हरि भिडे, वाई. वे. दत्तंभटजी यांनीं ऋग्वेदाच्या संहितेचें व ब्राह्मणाचें अध्ययन वडिलांच्या जवळ केलें, व दशग्रंथांपैकीं राहिलेलें अध्ययन वे. महादेवभटजी गाडगीळ यांच्याजवळ केलें. नंतर जटेचें अध्ययन वडिलांच्याजवळ केलें. इंदूर, नगर व कोल्हापूर येथें वे. दत्तंभटजी यांनीं दशग्रंथांच्या परीक्षा दिल्या आहेत; यांचें कायमचें वास्तव्य वांईस असतें.

वडिलांच्या मृत्यूनंतर भोर, सांगली, मिरज, इचलकरंजी इ. संस्थानांमध्यें घराण्यांत ज्या नेमणूका होत्या त्यांस वे. दत्तंभटजींचें नांव दाखल होऊन, त्या त्यांना मिळूं लागल्या. श्री. फडणीस मेणवलीकर यांचेकडून इनाम जमीन मिळालेली होती ती आतां खालसा झाली आहे.

यांनीं महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं झालेल्या ३४ स्वाहाकारांत भाग घेतला आहे. पुण्यांतील बेलबागेंत गोकुळअष्टमीच्या मंत्रजागराकरितां ते सतत ४४ वर्षें येत आहेत. यात्रेनिमित्त उत्तर हिंदुस्थानांत देवप्रयागपर्यंत गेले होते. श्रीसोमनाथाचे प्रतिष्ठेकरितांहि गेलें होते.

वे. दत्तंभटजींच्या पहिल्या पत्नीचें नांव यशोदाबाई पिता गोपाळ भिकाजी करंदीकर, वांई. यांचे पुत्र रामकृष्ण, एम्. एस्सी., पीएच्. डी व कन्या काशी. दुसरी भार्या – यशोदाबाई पि. कृष्णाजी अनंत आगाशे, पुणें. यांना पुत्र वासुदेव व दोन कन्या आहेत.

• • •

## ३४ : वे. दिनकर बाळकृष्ण जोशी

### काशी

यांचा जन्म सन १८१० मध्यें काशीस झाला. यांचे वडील वे. बाळकृष्ण ऊर्फ आण्णाभाऊ यांना बरींच वर्षें अपत्यलाभ न झाल्यानें त्यांनीं श्रीसिद्धिविनायकाची उपासना करून, श्वेत लक्ष दुर्वा समर्पणाचें अनुष्ठान केलें होतें असें सांगतात. नंतर प्रौढ वयांत त्यांना दिनकर हा एकच मुलगा झाला. वे. दिनकरभाऊ यांचें ऋग्वेदाचें संपूर्ण अध्ययन घरीं वडिलांजवळ झालें. अध्ययन संपल्यावर यांनीं घरीं वेदशाळा सुरूं केली व त्यांत वेदाध्यापनाचें कार्य सुरूं केलें. यांनीं चार पर्याय घनान्त शिकवून तयार केले. वे. दिनकरभाऊ यांनीं घरीं सुरूं केलेली वेदशाळा पुढेंहि तीन पिढ्या उत्तम रीतीनें चालली होती व त्या शाळेंत शिकून अक्षरशः शेंकडो विद्यार्थी तयार झाले.

वे. दिनकरभाऊ यांचा फोटो उपलब्ध नाहीं. पण त्यांच्या पादुका अद्याप वेदशाळेंत ठेवलेल्या आहेत. गेल्या पिढीपर्यंत या पादुकांचें नित्य दर्शन घेण्याचा काशींतील पुष्कळ वैदिकांचा नियम होता. यावरूनच त्यांच्याविषयीं वैदिकांना किती आदर होता हें दिसून येईल. वे. दिनकरभाऊ यांना वे. रामकृष्ण ( दादा ) व वे. रामजी ( काका ) असे दोन पुत्र होते.

वे. दिनकरभाऊ सन १८७७ मध्यें वारले.

• • •

## ३५ : वे. नरहर बाळंभट जोशी

### मिरज

यांचा जन्म शके १८१५ मध्यें मिरज येथें झाला. वे. नरहरभटजींनीं वयाच्या १२ व्या वर्षीं वेदशाळेंत जाऊन, वे. बाळंभट काळे गुरुजी यांच्या जवळ ऋग्वेदाच्या दशग्रंथांचें अध्ययन केलें. जोसपणाची वृत्ति असल्यानें याज्ञिक विषयाचेंहि अध्ययन केलें आहे.

वे. नरहरभटजींनीं शके १८५६ मध्यें आपले घरीं संहिता-स्वाहाकार केला. त्यावेळीं प्रसिद्ध वैदिक मंडळी त्या कार्याकरतां त्यांनीं बोलाविली होती. वे. नरहरभटजी भागवताचा सप्ताहहि करीत असतात. शके १८८० मध्यें त्यांनीं भागवत-स्वाहाकार व रुद्र-स्वाहाकार आणि १०८ सत्यनारायण केले. यांनीं चारहि धामें, बारा ज्योतिर्लिंगें, पशुपतेश्वर इ. सर्व यात्रा केल्या आहेत. सतत धर्मकृत्यें करण्याची यांना फार हौस आहे.

वे. नरहर भटजींच्या पत्नीचें नांव लक्ष्मीबाई पिता गणपतराव तोरो, मिरज. यांना चार मुली व दोन मुलगे आहेत.

• • •

## ३६ : वे. रघुनाथ विठ्ठल जोशी

### कोतवडें

यांचा जन्म शके १८०६ मध्यें झाला. यांच्या घराण्यांत वैदिकांची परंपरा निदान चार पिढ्यांची आहे. यांचे वडील विठ्ठल विनायक हे वैदिक असून, कोतवडें, जि. रत्नागिरी येथें शेती व भिक्षुकी करीत. वे. रघुनाथ-भटजींच्या मातेचें नांव सत्यभामाबाई. वे. विठ्ठलभटजी यांनीं वेदाध्यापनाचें कार्य पुष्कळ वर्षें चालविलें व त्यांच्या विद्यार्थ्यांपैकीं ८-९ विद्यार्थी संपूर्ण अध्ययन करून गेले. वे. रघुनाथभटजी यांनीं ऋग्वेदाच्या दशग्रंथांचें अध्ययन कोतवड्यास वडिलांजवळच केलें. नंतर इंदूर येथें दशग्रंथांची परीक्षा दिली. यांनीं कोतवडें येथें क्रमाचें पारायण केलें, त्या वेळीं यांना 'केशवानंद वैदिक-पारितोषिक' व 'वेदरत्न' अशी पदवी देण्यांत आली. वे. रघुनाथभटजी प्रतिवर्षीं चातुर्मास्यांत भिक्षुकीकरतां मुंबईस येत असत.

यांच्या पहिल्या पत्नीचें नांव सीताबाई पिता जनार्दन गणेश परांजपे, मावळंगे. यांना दोन मुली आहेत. दुसऱ्या भार्येचें नांव लक्ष्मीबाई, पिता रामचंद्र गोपाळ भागवत, सरंद. यांना पांच मुलगे व चार मुली अशी संतति आहे.

वे. रघुनाथभटजी शके १८८१ मध्यें वारले.

• • •

## ३७ : वे. रामकृष्ण दिनकर जोशी

### काशी

यांचा जन्म सन १८५३ मध्यें काशीस झाला. यांच्या वडिलांचें नांव वे. दिनकर बाळकृष्ण. वे. रामकृष्ण यांचें ऋग्वेदाचें अध्ययन वे. बाळ दीक्षित काळे यांच्याजवळ झालें. यांची स्मरणशक्ति असामान्य असल्यानें 'एकपाठी' अशी त्यांची ख्याती होती. वे. रामकृष्ण यांचें चित्त संसारांत फारसें नव्हतें. वडिलांच्या मृत्यूनंतर संसाराचा व शाळेचा भार वे. रामकृष्ण यांच्यावर पडला. त्यांचें वेदाध्ययन त्या वेळीं पूर्ण झालें नसल्यानें, तें पूर्ण होईपर्यंत यांच्या वडिलांचे एक प्रमुख शिष्य वे. बाळ दीक्षित काळे यांनीं शाळा चालविण्याचा भार उचलला. पण वे. रामकृष्ण यांचें अध्ययन संपतांच, त्यांच्यावर शाळा सोंपवून, वे. बाळ दीक्षित काळे गुरुवचनांतून मुक्त झाले. वे. रामकृष्ण यांनीं थोडे दिवस शाळा चालविली व स्वतःचे धाकटे बंधु वे. रामजी यांचें अध्ययन पूर्ण करून घेऊन, अल्पवयांतच त्यांच्यावर शाळेची जबाबदारी टाकून, आपण निवृत्त झाले.

वे. रामकृष्ण यांच्या पत्नीचें नांव राधाबाई. या काशींतील पं. राजाराम-शास्त्री बोडस यांच्या कन्या. यांना दोन मुली झाल्या.


वे. रामकृष्ण सन १९०४ मध्यें वारले.

• • •


## ३८ : वे. रामजी दिनकर जोशी

### काशी

यांचा जन्म सन १८६० मध्यें झाला. यांच्या वडिलांचें नांव वे. दिनकर बाळकृष्ण. हे काशींतील प्रसिद्ध वैदिक व वेदाध्यापक होते. त्यांच्या पादुका वे. रामजी यांच्या वेदशाळेंत आहेत. वे. रामजींचे मोठे बंधु वे. रामकृष्ण हे एकपाठी म्हणून संबोधिले जात. वे. रामजी यांचें ऋग्वेदाचें अध्ययन,



वे. विनायक हरि घैसास
(पृ. २२)




वे. अनंत नीळकंठ जावडेकर (पृ. २५)



वे. अनंत नीळकंठ जोशी,
येडूरकर (पृ. २६)



वे. गजानन सदाशिव जोशी (पृ. २७)



वे. नरहर बाळंभट जोशी व वे. सदाशिव सीताराम नाथजोशी
(पृ. ३० व ३४)



वे. रघुनाथ विठ्ठल जोशी
(पृ. ३१)

कै. म. म. द वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह



वे. रामजी दिनकर जोशी ( पृ. ३२ )

त्यांच्या वडिलांचे शिष्य वे. बाळ दीक्षित काळे यांच्याजवळ व नंतर ज्येष्ठ बंधु वे. रामकृष्ण यांच्याजवळ झालें. नंतर वे. रामजी यांनीं वयाच्या १७ व्या वर्षापासून काशींत ३०।३५ वर्षें वेदशाळा चालविली. ही शाळा काशींत फार प्रसिद्धीस येऊन, या शाळेंत काशींतील व इतर प्रांतांतील शेकडों विद्यार्थी शिकून गेले. त्यांच्यापैकीं कांहीं प्रमुख शिष्य पुढीलप्रमाणें :— १ वे. गोपाळभटजी राजाराम गोरे २ वे. वामन ( बाळंभट ) गंगाधर देव ३ वे. गणेशभटजी पुराणिक ४ वे. विनायकभटजी पुराणिक ५ वे. गोविंदाचार्य सोलापूरकर ६ वे. रामकृष्णभटजी गोरे ७ वे. सोमनाथभटजी सोलापूरकर, ८ वे. सोनभटजी आचवल ९ वे. रामकृष्ण दीक्षित फडके इ.

वे. रामजी गुरु यांच्या पत्नीचें नांव जानकीबाई पिता दामोदर साठे, ब्रह्मावर्त. वे. रामजी यांच्या कन्या बारुताई या विद्यमान असून, यांना ऐकून ऐकून दशग्रंथ पाठ येतात असें म्हणतात !

वे. रामजी हे सन १९२१ मध्यें वारले.

## ३९ : वे. विनायक नारायण दीक्षित जोशी

### काशी

यांचा जन्म सन १८८९ मध्यें काशीस झाला. यांचे वडील वे. नारायण विनायक दीक्षित हे काशीस वैदिक, श्रौती व धर्मशास्त्री होते. वे. विनायक दीक्षित यांनीं त्यांचे मामा वे. भिकंभटजी पटवर्धन यांच्याकडे ऋग्वेदाच्या दशग्रंथांचें संपूर्ण अध्ययन केलें. सर्व अध्ययन फार लवकर म्हणजे वयाच्या अठराव्या वर्षीं पूर्ण केलं. वे. विनायक दीक्षितांची म्हणणी फार स्वच्छ, गोड व लयबद्ध होती. वे. रामजी जोशी यांनीं त्यांना काशींतील अण्णागुरूंच्या वेदशाळेंत गुरुजी म्हणून नियुक्त केलें. वे. विनायक दीक्षितांनीं त्या पाठशाळेंत दशग्रंथांचा संपूर्ण एक पर्याय पढविला. हे स्वभावानें तापट व विद्यार्थ्यांच्या म्हणण्याकडे बारिक लक्ष ठेवणारे होते. वयाच्या सुमारें चाळीसाव्या वर्षी-

पासून यांनीं प्रतिग्रह घेण्याचें बंद केलें होतें. ईश्वरावर भरंवसा ठेवून वेदाध्यापनाचें कार्य करीत. यांचे शिष्यवर्गापैकीं वे. श्रीकृष्ण वामन देव, वे. आत्मारामभट आचवल व वे. दत्तात्रय रामकृष्ण गोरे हे वैदिक आहेत.

वे. विनायक दीक्षित यांचा स्वामी करपात्रीजी यांच्याशीं पूर्वीपासून बराच परिचय होता. स्वामीजींनीं प्रारंभीं बरींच वैदिक अनुष्ठानें काशींत दीक्षितांच्या मार्फत केलीं. तसेंच वे. विनायक दीक्षित यांनीं स्वतःच्या वेदशाळेंत संहितास्वाहाकारही केला. वे. विनायक दीक्षितांचा सुमारें तीस वर्षें पहांटे स्नान करून बाराशें गायत्री जप करण्याचा व काळभैरवाची सकाळची पूजा करण्याचा नियम चालूं होता.

वे. विनायक दीक्षितांच्या भार्येचें नांव शारदाबाई पिता जगन्नाथ बाळाजी साने, काशी. यांना वेणीमाधव व नारायण असे दोन पुत्र व एक कन्या झाली. दोघेहि पुत्र काशीस वैदिक असून, वेणीमाधव हे काशींतील धर्मसंघ विद्यालयांत वेदाध्यापक आहेत.

वे. विनायक दीक्षित हे सन १९४९ मध्यें आतुर संन्यास घेऊन काशीस समाधिस्थ झाले.

● ● ●

## ४० : वे. सदाशिव सीताराम नाथ जोशी

### मिरज

यांचा जन्म शके १८०१ मध्यें झाला. वडील वे. सीतारामभटजी मिरजेस भिक्षुकी करीत. मातेचें नांव अन्नपूर्णाबाई. वे. सदाशिवभटजी यांचें ऋग्वेदाचें क्रमान्त अध्ययन मिरजेच्या वेदशाळेंत वे. विष्णु हरि काळे गुरुजी यांचेजवळ झालें. श्रौताचेंहि ज्ञान संपादन केलें असून, याज्ञिक व ज्योतिष यांचीहि यांना माहिती आहे. लहानपणीं टांगता व वेताचा मल्लखांब व कुस्ती केलेली आहे. त्रिस्थळी यात्रा झालेली आहे. श्रीमंत तात्यासाहेब मिरजकर यांचा आश्रय आहे.

वे. सदाशिवभटजी यांच्या भार्येचें नांव रखमाबाई पिता वामन बळवंत घोरपडे. यांना अनंत, गोविंद, गोपाळ, बाळकृष्ण असे चार पुत्र व तीन कन्या आहेत.

● ● ●

## ४१ : वे. गणेश शिवराम ठकार

### पुणें

यांचा जन्म शके १८०१ मध्यें पुणें जिल्ह्यांतील सासवडास झाला. पूर्वी सरदार पुरंदरे यांनीं २।३ अग्निहोत्री घराणीं सासवडास राहाण्यास आणलीं, त्यांतच वे. गणेशभटजींच्या पूर्वजांस आणण्यांत आलें होतें व तेव्हांपासून या घराण्याची वस्ती सासवडासच होती. गणेशभटजींचे वडील शिवरामभटजी हे सासवडास भिक्षुकी करीत. मातेचें नांव सरस्वतीबाई असून त्या केशव रावजी खळदकर रा. एखतपूर यांच्या कन्या होत्या. वे. गणेशभटजी यांनीं ऋग्वेदाचें अध्ययन प्रथम सासवडास वे. पंढरीनाथ नागेश शाळिग्राम यांच्या-जवळ सुमारें पांच वर्षें केलें. नंतर पुढील अध्ययनाकरतां ते वे. गंगाधरभटजी नवाथे यांचेकडे रत्नागिरीस गेले. पण तेथील हवा न मानवल्यामुळें ते सुमारें एक वर्षांतच तेथून परत आले व वांईस वे. गणेशभटजी पटवर्धन यांच्या शाळेंत पांच वर्षें राहून पदें व आरण्यक यांचें अध्ययन त्यांनीं पूर्ण केलें. नंतर पुढील अध्ययनाकरितां ते पुण्यास आले व पुणें वेदशाळेंत त्यांनीं क्रम व उप-ग्रंथांचें अध्ययन प्रथम वे. रामभटजी प्रभुणे यांचेजवळ व नंतर वे. वासुदेव-भटजी साने यांच्याजवळ पूर्ण केलें. त्या वेळीं त्यांचे सहाध्यायी वेदाचार्य गोविंद भटजी फाटक हे होते. शके १८३२ मध्यें वे. शा. सभेची शाखेची परीक्षा दिली. नंतर वर्षानें वडील वारल्यामुळें प्रपंच अंगावर पडला व पुढील परीक्षा देतां आल्या नाहींत. यानंतर यांचें आजपर्यंतचें सर्व आयुष्य पुण्यांतच गेलें आहे. सरदार बिनीवाले घराण्याचा यांना आश्रय आहे. वे. गणेशभटजी यांनीं कसब्याचे गणपति-मंदिरांत वेदाध्यापनाचा वर्ग कांहीं दिवस चालविला होता.

वे. गणेशभटजींच्या भार्येचें नांव यमुनाबाई पिता बळवंत गोपाळ खळदकर, खळद. यांना श्रीराम या नांवाचा पुत्र व तीन कन्या आहेत.

• • •

## ४२ : वे. केशव गणेश डोंगरे

### बडोदें

यांचा जन्म शके १८१९ मध्यें झाला. यांचे दत्तक वडील गणेश रामचंद्र वैदिक असून बडोद्यास भिक्षुकी करीत. मातेचें नांव सरस्वतीबाई पिता विष्णुपंत मोडक पडघवली. वे. केशवभटजी यांनीं कृष्णयजुर्वेदाच्या पंचग्रंथांचें अध्ययन बडोद्यास वडिलांजवळ केलें. व्युत्पत्ति व ज्योतिष या विषयांचाहि अभ्यास केला आहे. वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत वेदाभ्यास सुरू न केल्यामुळें व स्वाध्यायी नसल्यानें अध्ययन करतांना यांना परिश्रम फार पडले. अध्ययन संपल्यावर यांनीं इंदुरास क्रमान्त परीक्षा दिली. सांगलीच्या वेदशाळेंतहि पुढें यांनीं परीक्षा देऊन संभावना मिळविली. अनेक ठिकाणच्या स्वाहाकारांतून यांनीं भाग घेतला आहे. पुरीचे श्रीशंकराचार्य यांच्या अध्यक्षतेखालीं बडोद्यास कांहीं वर्षांपूर्वीं वेदस्वाहाकार यज्ञ झाला, त्यांत वे. केशवभटजींनीं आचार्यत्व केलें. कोंकणांतहि अनेक ठिकाणीं यांचा प्रवास झाला असून ठिकठिकाणीं मंत्रजागरणाचे व पारायणाचे प्रसंग झाले. इंदूरच्या वैदिकाश्रमांत यांची योग्य संभावना झाली. वे. गंगाधरभट लेले यांनीं बडोद्यास पूर्वीं पदपारायण केलें तेव्हां व वे. विनायक हरि धैसास यांच्या जटापारायणाचे वेळीं श्रवणाकरितां यांची योजना झाली होती.

वे. केशवभटजींनीं सुमारें ७।८ वर्षांपूर्वीं सहकुटुंब काशीयात्रा केली व तेव्हांपासून परान्न घेण्याचें सोडलें आहे. यांच्या भार्येचें नांव कमलाबाई पिता केशव रावजी दांडेकर, इंदूर. यांचे पुत्र १ रामचंद्र–यांनीं पंढरपूर, अहमदाबाद व काशी येथें राहून साहित्य, न्याय, वेदान्त या विषयांचा अभ्यास केला व

वेदान्तभूषण ही पदवी मिळविली आहे. २ प्रभाकर–हे बी. ए. बी. टी., एम्. एड्. झाले असून, यांनीं वेदाध्ययनहि केलें आहे.

• • •

## ४३ : वे. विनायकभटजी डोंगरे

### काशी

यांचा जन्म सन १८३० मध्यें झाला. यांचें ऋग्वेदाचें अध्ययन ब्रह्मावर्तास श्री तत्सत् गुरु यांच्याजवळ झालें. श्री तत्सत् गुरु हे साक्षात्कारी व प्रत्यक्ष वेदमूर्ति असे नैष्ठिक ब्रह्मचारी होते. यांनीं चार शिष्यांना वेदपारंगत करून, चार दिशांना वेदाध्यापनार्थ पाठविलें. त्यांत वे. विनायकभटजींना काशीस जाण्याची त्यांनीं आज्ञा केली. त्याप्रमाणें वे. विनायकभटजींनीं काशीस जाऊन जन्मभर वेदाध्यापनाचें कार्य केलें.

वे. विनायकभटजींनीं आपली पाठशाळा गंगेच्या सान्निध्यांत ब्रह्मघाटावर शेणवाई यांच्या काशी-मठांत सुरू केली, व तेथेंच ती आयुष्यभर चालविली. या पाठशाळेंत वे. विनायकभटजींच्या जवळ शेंकडों विद्यार्थी शिक्षण घेऊन गेले. वे. विनायकभटजींनीं वैदिक क्षेत्रांत असामान्य लौकिक संपादन केला, व 'गुरुजी' या नांवानेंच ते सर्वत्र संबोधिले जाऊं लागले. आजहि काशींत त्या नांवानेंच त्यांचा उल्लेख होतो.

अत्यंत परोपकारी म्हणून त्यांची प्रसिद्धी होती.

यांच्या शिष्य मंडळींत पुढील वैदिकांचा प्रामुख्यानें समावेश होतोः— १ वे. काशिनाथभटजी हर्डीकर २ वे. सोनभट आचवल ३ वे. गंगाधर ऊर्फ बाबूशास्त्री सोलापूरकर ४ वे. रामचंद्रजी खेडावाल ५ वे. भिकंभटजी पटवर्धन (यांनींच गुरुजींच्या आज्ञेवरून पुढें वेदशाळा चालविली.) ६ आहिताग्नि धोंडू दीक्षित केळकर ७ वे. गोपाळभटजी घाटे इ.

वे. विनायकभटजी यांचा विवाह झाला होता, पण कुटुंब लवकरच निवर्तलें. अपत्य नाहीं. वे. विनायकभटजी हे सन १९०४ मध्यें वारले.

• • •

## ४४ : वे. वासुदेव रामचंद्र तोरो

### मिरज

यांचा जन्म मिरज येथें सन १८६३ मध्यें झाला. वे. वासुदेवभटजी हे चुलत्याच्या मांडीवर दत्तक आले होते. वे. वासुदेवभटजींना वेदाध्ययनाकरतां सांगलीच्या वेदशाळेंत पाठविण्यांत आलें. तेथें त्यांनीं आपस्तंबशाखेच्या यजुर्वेदाचें बारा वर्षें अध्ययन केलें. नंतर कांहीं वर्षें येड्डर, अंकली, सौंदत्ती येथें राहून, पुन्हां ते मिरजेस राहण्यास आले. मिरजेंतील एक अग्रगण्य विद्वान म्हणून त्यांना मान मिळत असे.

वे. वासुदेवभटजींची पहिली पत्नि येड्डर येथील मोकाशी घराण्यांतली होती. दुसरी भार्या धोंडूबाई या अंकली येथील वे. दत्तंभटजी जोशी यांच्या कन्या. यांना तीन मुलगे व दोन मुली अशी संतति झाली.

वे. वासुदेवभटजी सन १९४१ सालीं वारले.

• • •

## ४५ : वे. शा. सं. गंगाधर मणीराम दातार

### पुणें

यांचा जन्म शके १७४४ मध्यें झाला. वडिलांचें नांव वे. मणीराम रामकृष्ण व मातेचें नांव लक्ष्मीबाई. या दातार घराण्याचें कोंकणांतील मूळगांव कोळथरें, ता. दापोली हें होय. तेथून वे. शा. सं. गंगाधरशास्त्र्यांचे पूर्वज प्रथम मोंगलाईंत व नंतर काशीस गेले. कै. बाळाजीपंत नातू हे काशी-यात्रेस गेले असतां तेथें त्यांची व गंगाधरशास्त्र्यांचे आजे रामकृष्णभटजी यांची भेट झाली. नातूंनीं परत येतांना रामकृष्णभटजींस पुण्यास आणलें व नंतर स्वतःचें इनामगांव पांचवड येथें राहाण्यास घर देऊन त्यांना पांचवडास स्थायिक केलें. गंगाधरशास्त्री यांनी ऋग्वेदाचें अध्ययन पांचवडास वडिलांजवळ केलें. नंतर त्यांनीं पुण्यास येऊन, पं. त्र्यंबकशास्त्री शाळिग्राम, पं. जनार्दन-

शास्त्री जोशी गोळपकर प्रभृतींजवळ शास्त्राध्ययन केलें व श्रौत विषयाचीही उत्तम माहिती घेतली. एक चतुरस्त्र विद्वान म्हणून गंगाशास्त्र्यांचा लौकिक त्यानंतर पुण्यास व बाहेर पुष्कळ झाला. ते विद्यार्थ्यांस धर्मशास्त्राचे पाठ देत. पुण्यांतील व बाहेरच्चीं मंडळीं त्यांना समक्ष व पत्रद्वारें धर्मशास्त्राचे अनेक प्रश्न नेहमीं विचारीत व अनेक ग्रंथांतील आधार पाहून ते शास्त्रार्थ कळवीत.

त्यांनीं 'मुहूर्तसिंधु' हा ग्रंथ तयार केला व तो पुण्यास सन १८८४ मध्यें कै. रावजी श्रीधर गोंधळेकर यांनीं प्रकाशित केला. याशिवाय गंगाधरशास्त्र्यांनीं 'निबंधसार' या नावाचा एक ग्रंथ लिहून पुरा केला, परंतु तो अप्रकाशितच राहिला.

शास्त्रीबुवांस श्री. गंगाबाई बेहेरे यांनीं शनवार पेठेंतील आपटे घाटावरील स्वतःचें घर व त्रिंबक विष्णु बापट यांनीं शुक्रवार पेठेंतील त्यांचें घर दान दिलें होतें. कै. बाबा महाराज यांच्याकडूनही त्यांना कांहीं साहाय्य मिळे. न्या. रानडे यांचेकडून सन १८८२ ते १८८७ पर्यंत शास्त्रार्थ-संशोधन व लेखन या कार्याकरतां शास्त्रीबुवांना ठराविक दक्षिणा मिळत असे.

शास्त्रीबुवांच्या निर्णायानंतर ता. १-५-१८८८ रोजीं 'केसरी'त त्यांच्यावर लिहिलेल्या लेखांत केसरीनें पुढील उद्‌गार काढले; "पुण्यामध्यें नांव घेण्याजोगे जे कांहीं शास्त्री राहिले आहेत त्यापैकीं गंगाधरशास्त्री हे अग्रणी होते. शास्त्रीबोवा धर्मशास्त्र व ज्योतिष यांतच प्रवीण होते असें नाहीं, तर त्यांस याज्ञिक व श्रौतकर्मांचीही माहिती होती..."

वे. शा. सं. गंगाधरशास्त्र्यांच्या पहिल्या भार्येचें नांव उमाबाई पिता करमरकर. यांना पुत्र काशीनाथ व एकनाथ अशीं अपत्यें झालीं. दुसरी भार्या गोपिकाबाई पिता रंगनाथ राजाराम फडके, पुणें. यांना पुत्र महादेव, नागेश, विश्वनाथ, सोमेश्वर, विष्णु, हरि व तीन कन्या अशी संतति झाली.

वे. शा. सं. गंगाधरशास्त्री शके १८१० मध्यें वारले. मृत्यूपूर्वीं त्यांनीं संन्यास घेतला होता.

• • •

## ४६ : वे. गणेश विश्वनाथ दातार

### बडोदें

यांचा जन्म शके १७८४ मध्यें झाला. यांचे वडील वे. विश्वनाथभटजी हे नर्मदाकिनारीं कर्नाळी येथें वैदिक होते. मातेचें नांव अन्नपूर्णाबाई. वे. गणेशभटजींनीं वडिलांजवळ कर्नाळी येथें ऋग्वेदाचें घनान्त अध्ययन केलें. याज्ञिकाचाही अभ्यास केला. नंतर बडोद्यास परीक्षा दिली. वे. विश्वनाथ-भटजी यांच्यावर बडोद्याचे अधिपती श्री. खंडेराव महाराज यांची मर्जी होती व त्यांनीं विश्वनाथभटजींस रु. १९६ चें वर्षासन करून दिलें होतें. तें वर्षा-सन वे. गणेशभटजी यांनाही ते हयात असेपर्यंत मिळालें; पुढे बंद झालें. वे. विश्वनाथभटजी यांनीं भावनगरला घन–पारायण केलें, तेव्हां त्यांना अठरा हजार रुपये मिळाले होते असें म्हणतात.

वे. गणेशभटजी यांचें वास्तव्य बडोद्यास असे. कांहीं दिवस ते खेडा जिल्ह्यांतील उमरेठ येथें वेदशाळेवर गुरुजी म्हणून गेले होते. त्यावेळीं कांहीं गुजराथी विद्यार्थ्यांनीं त्यांच्याजवळ अध्ययन केलें.

वे. गणेशभटजींच्या भार्येचें नांव साळूबाई पिता मोरेश्वर जोशी, बडोदें. यांना नारायण, गोविंद व विष्णु असे पुत्र व दोन कन्या झाल्या. पैकीं वे. नारायणभटजी हे बडोद्यास वैदिक आहेत. वे. गणेशभटजी सन १९४२ मध्यें वारले.

म/८१४

• • •

## ४७ : वे. काशीनाथ महादेव दाते

### पुणें

यांच्या घराण्याचें मूळ गांव राजापूर तालुक्यांतील आडिवरें हें होय. वे. काशीनाथभटजी यांचा जन्म शके १८१० मध्यें वांईस झाला. यांचे वडील वे. महादेव जनार्दन हे घनपाठी वैदिक होते. मातेचें नांव पार्वतीबाई पिता बल्लाळ रामचंद्र केळकर, गावडेआंबेरें. वे. काशिनाथभटजीनीं कृष्णयजु-

वेंदाचें कांहीं अध्ययन वडिलांच्या जवळ करून, नंतर पांच अष्टक पदांपर्यंतचें अध्ययन वे. शंकरभटजी गोखले यांच्याजवळ केलें. गोखले यांच्याकडे अध्ययन चालू असतांनाच श्रौताचें शिक्षणहि वे. आण्णाभटजी अभ्यंकर यांचेकडे चालूं होतें. वे. शंकरभटजी गोखले यांच्याकडे अग्निहोत्र असल्यानें, तेथें अण्णाभटजी येऊन विद्यार्थ्यांकडून इष्टि प्रत्यक्ष करून घेत. वे. शंकरभटजी प्लेगनें वारल्यानंतर वे. काशीनाथभटजींचें क्रमान्त वेदाध्ययन वे. शा. सं. बाळंभटजी रानडे यांच्याजवळ झालें. वे. काशिनाथभटजी यांनीं कोल्हापुरास वेदपरीक्षा दिली आहे. वयाच्या ४१ व्या वर्षापर्यंत वांईस वास्तव्य करून, तेव्हांपासून पुण्यास राहतात.

वे. काशीनाथभटजींच्या पत्नीचें नांव गिरिजाबाई पिता विष्णु रामचंद्र मराठे. यांना सहा मुलगे व पांच कन्या अशी संतति आहे.

● ● ●

## ४८ : वे. महादेव जनार्दन दाते
### वांई

यांचा जन्म शके १७५३ चे सुमारास झाला. यांच्या वडिलांचें नांव जनार्दन रघुनाथ. वे. महादेवभटजींचें कृष्णयजुर्वेदाचें क्रमान्त अध्ययन मिरज येथें झालें. नंतर शास्त्राध्ययन करण्याच्या हेतूनें ते रामदुर्ग येथें वे. शा. सं. गणेश दीक्षित गोडाखिंडीकर यांच्याकडे राहिले. शास्त्राध्ययन चालू असतांनाच वांईचे प्रसिद्ध घनपाठी वे. महादेवभट बापू गद्रे हे रामदुर्गास आले. त्यांनीं तेथील वैदिकांस व विद्यार्थ्यांस सांगितलें, "आपल्याकडे जटा घन म्हणणारे कमी आहेत. तेलंग वैदिक येऊन जागरणांत जटा-घन सुरू करतात तेव्हां आपल्याला स्वस्थ बसावें लागतें. तरी जटाघनाचें अध्ययन करा." या बोलण्यामुळें वे. महादेवभटजींस स्फूर्ति येऊन, ते वे. गद्रे यांच्याबरोबरच वांईस आले. तेथें गद्रे यांच्याजवळ जटा-घनाची आवृत्ति व प्रातिशाख्य आणि सप्तशिक्षा यांचें अध्ययन केलें. नंतर नेहमींचें वास्तव्य

वांईसच असे. वे. गद्रे यांनीं ‘ लक्षणचंद्रिका ’ नांवाची टीका प्रातिशाख्यावर लिहिली आहे.

वे. महादेवभटजींच्या पत्नींचें नांव पार्वतीबाई पिता बल्लाळ रामचंद्र केळकर, गावडेआंबेरें. यांना चार पुत्र व दोन कन्या झाल्या. मुलांपैकीं काशीनाथभट हे पुण्यास वैदिक आहेत. वे. महादेवभटजी शके १८१८ मध्यें वारले.

● ● ●

## ४९ : वे. यज्ञेश्वर नारायण दीक्षित

### त्र्यंबकेश्वर

यांचा जन्म शके १८०८ मध्यें झाला. यांचे वडील वे. नारायणभटजी भिक्षुकी करीत असत. वे. यज्ञेश्वरभटजी यांचें शुक्लयजुर्वेदाच्या त्रिपदीचें अध्ययन त्यांचे चुलते वे. बाळंभटजी दीक्षित यांच्याजवळ झालें. वे. यज्ञेश्वरभटजी यज्ञासाठीं आसाम, सिलहट, कानपूर, नृसिंहगड, बिकानेर, जव्हार येथें गेले होते. जव्हार संस्थानांतून यांना कांहीं दक्षिणाहि मिळत असे.

वे. यज्ञेश्वरभटजींच्या पत्नीचें नांव सरस्वतीबाई पिता बाळंभटजी भेटे, त्र्यंबकेश्वर. यांना भास्कर या नांवाचे चिरंजीव असून, त्यांचें वेदाध्ययन झालेलें आहे.

● ● ●

## ५० : वे. दामोदर बाळकृष्ण देव

### निंवसर

यांचा जन्म शके १८२५ चे सुमारास झाला. यांच्या वडिलांचें नांव बाळकृष्ण रघुनाथ. हे शेती करीत असत. मातेचें नांव यमुनाबाई. वे.

दामोदरभटजींनीं ऋग्वेदाच्या दशग्रंथांचें अध्ययन निंवसर येथें वे. भालचंद्र सखाराम हळबे यांच्याजवळ केलें. नंतर इंदूर येथें दशग्रंथाची परीक्षा दिली.

वे. दामोदरभटजींच्या पत्नीचें नाव राधाबाई पिता कृष्ण जोशी धर्माधिकारी, हराचिरी. यांना एक पुत्र व तीन कन्या आहेत.

● ● ●

## ५१ : वे. वामन ( बाळंभट ) गंगाधर देव

### काशी

यांचा जन्म सन १८८९ मध्यें झाला. यांचे वडील वे. गंगाधरभटजी हे काशीस भिक्षुकी करीत असत. वे. वामनभटजींनीं ऋग्वेदाच्या दशग्रंथांचें अध्ययन वे. रामजी जोशी यांच्याजवळ केलें. यांना नाडीपरीक्षाहि चांगली होती. नेत्रपल्लवी व करपल्लवी यांना ज्ञात होती. नागपुरास सतत चौदा वर्षें चातुर्मास्यांत वास्तव्य करीत. मृत्यूपूर्वीं एक वर्ष वे. वामनभटजींची दृष्टि मंद झाली होती.

वे. वामनभटजी यांना तीन भार्या होत्या. तिसरी भार्या गोदूबाई पिता जगन्नाथ गंगाधर लेले. यांना श्रीकृष्ण व विश्वनाथ असे दोन पुत्र आहेत. वे. श्रीकृष्ण यांचें दशग्रंथांचें अध्ययन झालें असून, त्यांनीं 'वेदाचार्य' परीक्षा दिलेली आहे. इंटरपर्यंत त्यांचें कॉलेज-शिक्षण झालें असून, याज्ञिक विषयाचें व मंत्रशास्त्राचें ज्ञान आहे. दुसरे पुत्र वे. विश्वनाथभटजी हे प्रसिद्ध घनपाठी वैदिक असून, उभयतांचें चरित्र या पुस्तकांत दिलें आहे.

वे. वामनभटजी सन १९३९ मध्यें वारले.

● ● ●

## ५२ : वे. विश्वनाथ वामन देव

### काशी

यांचा जन्म सन १९३१ मध्यें झाला. यांचे वडील वे. वामन गंगाधर हे काशींत भिक्षुकी करीत. मातेचें नांव रमाबाई. वे. विश्वनाथ यांचें उपनयनापूर्वीच शिक्षा, ज्योतिषादि कांहीं अध्ययन वडिलांजवळ झालें. उपनयन ८ व्या वर्षीं झाल्याबरोबर त्यांनीं वे. रामजी जोशी यांच्या वेदशाळेंत, वे. विनायक दीक्षित जोशी यांच्याजवळ ऋग्वेद – संहिता म्हणण्यास सुरुवात केली. त्याच वर्षीं वे. विश्वनाथ यांना पितृवियोग झाला. पांच अष्टक संहिता व कांहीं उपग्रंथ वे. विनायक दीक्षित यांच्याजवळ म्हणून झाल्यावर, साङ्ग वेदविद्यालयांत वे. अनंतराम ( बाबा ) पटवर्धन यांच्याकडे अवशिष्ट दशग्रंथ व पदें, क्रम, प्रातिशाख्य यांचें अध्ययन वे. विश्वनाथभटजी यांनीं केलें. कांहीं अथर्ववेदोक्त अनुष्ठानें व याज्ञिक या विषयांचें अध्ययन यांनीं थोरल्या बंधूजवळ केलें.

वयाच्या १२ व्या वर्षीं यांनीं संहिता संपविली. त्याच वर्षीं दिल्ली येथें झालेल्या शतमुख गायत्री कोटि होमांत वे. विश्वनाथ यांना ' द्वारपाल ' म्हणून निमंत्रण मिळालें. यज्ञसमाप्ति – समारंभांत श्री करपात्री स्वामी महाराजांकडून यांचा गौरव करण्यांत आला व पुढील वेदाध्ययनाकरतां उत्तेजनार्थ प्रतिवर्षीं शंभर रुपयांची शिष्यवृत्ति दोन वर्षेंपर्यंत देण्यांत आली. दिल्लीच्या यज्ञापासून वे. विश्वनाथभटजी यांची प्रसिद्धि वैदिक क्षेत्रांत होऊं लागली.

वयाच्या सतराव्या वर्षीं यांनीं काशी येथील साङ्ग वेदविद्यालयाची सर्वोच्च वेद – परीक्षा दिली व तेथील आजीव मिळणारें १०० रु चें वर्षासन संपादन केलें. साङ्ग वेदविद्यालयाची ही परीक्षा कठीण समजली जाते व इतक्या अल्पवयांत ती उत्तीर्ण झाल्यानें, वे. विश्वनाथभटजी यांचा लौकिक दूरवर पसरला.

सन १९५१ मध्यें पुण्याच्या वेदशास्त्रोत्तेजक सभेची परीक्षा देऊन, यांनीं ' वेदकविद ' व ' वेदचूडामणि ' या पदव्या मिळविल्या. रत्नागिरीच्या ' अखिल चित्पावन ब्राह्मण साहाय्यक संस्थे'कडून वेदाच्या परीक्षेंत उत्तम यश संपादन केल्याबद्दल यांना प्रतिवर्षीं रु. १०० प्रमाणें पांच वर्षें वर्षासन देण्यांत आलें.

वे. विश्वनाथभटजी यांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें वेद – पारायणें केलीं आहेतः—

१ नाशिक येथें डोंगरे गणपति मंदिरात जटा – पारायण. सन १९५०

२ पुण्यास श्री बेलबाग विष्णु मंदिरांत घन-पारायण. सन १९५३

३ नागपुरास श्रीदाक्षिणामूर्ति मंदिरांत घन-पारायण. सन १९५४

४ मुंबई येथें फडके श्रीगणपति मंदिरांत घन-पारायण. सन १९५५

५ काशी येथें काशीराज श्रीविभूति नारायण सिंह यांच्या राजवाड्यांत शाखापारायण. सन १९५९

वरील सर्व ठिकाणीं पारायण समाप्तीच्या वेळीं वे विश्वनाथभटजींचा त्यांच्या विद्वत्तेस साजेसा सत्कार करण्यांत आला. काशीराजांनीं त्यांना सुवर्ण-कंकण व ‘ वैदिकरत्न ’ अशी पदवी दिली. पुण्यास झालेल्या घन पारायणाच्या वेळीं श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य मठ संकेश्वर यांनीं वे. विश्वनाथभटजींना ‘ वेदाचार्य ’ अशी पदवी दिली.

याशिवाय सातारा येथें आचार्यमठांत शिष्यस्वामी श्री वाडीकर यांचेकडून ‘ वैदिक शिरोमणी ’ ही पदवी देण्यांत आली. सन १९५२ मध्यें इंदूर येथें नरहरगुरु वैदिकाश्रमांत सत्कार करण्यांत आला. तसेंच, पंढरपुरासही फार भव्य असा सत्कार पंढरपूरवासीयांकडून करण्यांत आला.

सन १९५९ मध्यें पुण्यास झालेल्या वाजपेय यज्ञांत यांनीं ‘ मैत्रावरुणा ’चें काम केलें. तसेंच सन १९५७ मध्यें अमरावतीस झालेल्या सोमयागांत यांनीं होतृत्व केल.

गुजरात राज्यांत अंबाजी देवस्थानांत झालेल्या अखिल भारतीय वेदपाठ – स्पर्धेंत सन १९६० मध्यें यांना पहिल्या क्रमांकाचें रु. ५०० चें पारितोषिक मिळालें.

काशींतील ‘ वाराणसेय संस्कृत विश्वविद्यालया ’च्या ‘ मध्यमा ’ व ‘ शास्त्री ’ या परीक्षा ऋग्वेद हा विषय घेऊन वे. विश्वनाभटजी उत्तीर्ण झाले असून, शेवटच्या ‘ आचार्य ’ परीक्षेस बसणार आहेत.

हा सर्व विद्याव्यासंग चालूं असतानांही वे. विश्वनाथभटजी यांचें सामाजिक व धार्मिक संस्थांकडे लक्ष असून, अशा संस्थांतून ते भाग घेत असतात. काशी, प्रयाग, गया या क्षेत्रांतून यात्रेकरूंना पंड्यांपासून उपद्रव होतो. सबब यात्रेकरूंना योग्य मार्गदर्शन करण्याच्या हेतूनें 'त्रिस्थळी महाराष्ट्र-भवन संघ' ही संस्था उभी करण्यांत वे. विश्वनाथभटजी यांचा पुढाकार होता. आतां त्या संस्थेचा पसारा वाढला असून, संस्थेचें रूपान्तर 'अखिल भारतीय महाराष्ट्र तीर्थ – पुरोहित संघ' या नांवानें केलें आहे. संस्थेच्या मार्गदर्शनाचा लाभ महाराष्ट्रांतून जाणाऱ्या हजारों लोकांनीं घेतला आहे.

वे. विश्वनाथभटजी यांचा प्रवास काश्मीर, पंजाब, महाराष्ट्र इ. अनेक ठिकाणीं झाला असून, बदरीनारायण – बदरीकेदार यात्राही झाल्या आहेत.

वाराणसी महानगरपालिकेच्या सन १९५९ मध्यें झालेल्या निवडणुकींत वे. विश्वनाथभटजी हे जनसंघातर्फे उभे राहून, सभासद म्हणून निवडून आले आहेत.

वे. विश्वनाथभटजींच्या पत्नींचें नांव विमलाबाई पिता वे. चिंतामण दत्तात्रय फडके, पुणें. यांना विनायक नांवाचा पुत्र आहे.

## ५३ : वे. शा. सं. श्रीकृष्ण वामन देव

### काशी

यांचा जन्म काशी येथें सन १९२८ मध्यें झाला. यांचे वडील वे. वामन गंगाधर हे काशीस भिक्षुकी करीत. मातेचें नांव रमाबाई. वे. श्रीकृष्ण यांनीं ऋग्वेदाच्या दशग्रंथांचें अध्ययन वे. विनायक नारायण जोशी दीक्षित यांच्याजवळ केलें. वेदाध्ययनानंतर वे. श्रीकृष्ण यांनीं शास्त्राध्ययन व अथर्ववेदाच्या अध्ययनाकडे लक्ष दिलें. अथर्ववेदाचें अध्ययन वे. सखारामशास्त्री वैद्य, अध्यापक गोयनका संस्कृत महाविद्यालय, काशी यांच्याजवळ केलें. 'व्याकरण–मध्यमा' ही परीक्षा देऊन, नंतर बिहार संस्कृत समितीची 'ऋग्वेदाचार्य' ही पदवी व सुवर्णपदक मिळविलें. पुढें 'कृष्णयजुर्वेदाचार्य' व 'शिक्षाशास्त्री'

अशा दोन सरकारी संस्कृत कॉलेजच्या पदव्याहि यांना मिळाल्या. वयाच्या केवळ १७ व्या वर्षीं वे. श्रीकृष्ण यांनीं दिल्ली येथें झालेल्या शतमुख गायत्री-कोटि-होमाच्या अनुष्ठानांत शतपद्म कुंडाचा विशाल मंडप निर्माण केला व व सगळ्यांकडून शाबासकी मिळविली. या यज्ञांत वे. श्रीकृष्ण यांनीं अथर्व-वेदाच्या पद्धतीनें प्रथम कुंडाचार्यत्व केलें.

सन १९४५ मध्यें काशी येथें अथर्ववेदोक्त महारुद्र यागाचें यांचेकडे आचार्यत्व होतें. सन १९५५ मध्यें पुण्यास श्रौताचार्य बापट यांच्या वाजपेय यज्ञांत वे. श्रीकृष्ण यांनीं 'होता' म्हणून काम केलें.

राजपंडित हरिशंकरशास्त्री शुक्ल, बऱ्हाणपूर यांच्याकडे वे. श्रीकृष्ण यांचें आगमशास्त्राचें अध्ययन व दीक्षा झालेली आहे.

वे. शा. सं. श्रीकृष्ण यांनीं सन १९५२ मध्यें जामनगर येथें ऋग्वेदाचें जटापारायण व अथर्ववेदाचें शाखा-पारायण केलें. त्यावेळीं तेथें त्यांनीं वेदांवर प्रवचनेंहि केलीं. समाप्तीच्या वेळीं त्यांचा जनतेनें चांगला सत्कार केला. शिवाय जामसाहेब यांनीं यांना राजवाड्यांत निमंत्रण करून स्वतंत्र सत्कार केला.

वे. शा. सं. श्रीकृष्ण यांची लेखन, काव्य व वक्तृत्व यांत गति असून सार्वजनिक कार्याचीहि आवड आहे. काशींतील पंचद्राविडांच्या संस्थांतून ते पुढाकारानें कार्य करतात. यज्ञ व अनुष्ठानांच्या निमित्तानें यांचा हिंदुस्थानांत प्रवासहि पुष्कळ झालेला आहे.

काशीच्या हिंदू विश्वविद्यालयांत सन १९५७ मध्यें ऋग्वेदाध्यापक म्हणून यांनीं एक वर्ष काम केलें. नंतर १९६० पासून 'वाराणसेय संस्कृत विश्वविद्यालयां'त ऋग्वेदाध्यापक म्हणून यांची नियुक्ति झालेली आहे. सांप्रत वेदविषयक संशोधन चालू असून, 'विद्यावारिधि' (पीएच्. डी.) पदवीकरतां अभ्यास चालू आहे.

वे. शा. सं. श्रीकृष्ण यांच्या पत्नीचें नांव-सुधा पिता गोविंद रामचंद्र रानडे, बेळगांव. वे. श्रीकृष्ण यांना तीन पुत्र व दोन कन्या अशी संतति आहे.

• • •

## ५४ : वे. गोविंद काशीनाथ धारप

### खार

यांच्या घराण्याचें मूळगांव केळशी. तेथून कुलाबा जिल्ह्यांतील पाली येथें वास्तव्य झालें. वे. गोविंदभटजी यांचा जन्म शके १८१८ मध्यें झाला. यांचे वडील वे. काशीनाथभटजी हे उत्तम वैदिक होते. वे. गोविंदभटजी यांनीं कृष्णयजुर्वेदाचें क्रमान्त अध्ययन पाली येथें वे. वामनभटजी पावगी यांचेजवळ केलें. पुण्याच्या वे. शा. सभेची व इंदूर, कोल्हापूर व नगर येथें वेदपरीक्षा दिल्या. वे. शा. सभेमध्यें परीक्षक म्हणूनहि काम केलें. पुण्यास पुष्कळ वर्षें राहात असत. हल्लीं खार येथें राहातात.


यांच्या पत्नीचें नांव जानकीबाई पिता लक्ष्मण सदाशिव फाटक, पडघवली.

● ● ●


## ५५ : वे. दत्तात्रय गणेश नवाथे

### लिंबगोवें – पुणें

यांचा जन्म शके १८१९ मध्यें झाला. यांच्या वडिलांचें नांव गणेश बळवंत. यांचें वास्तव्य धावडशी जि. सातारा येथें असे. ते वे. दत्तंभटजीच्या वयाच्या सहाव्या वर्षीं वारले. यांच्या घराण्यांत पूर्वीं साताऱ्याच्या छत्रपतींकडून प्रतिवर्षी रु. ३०० योगक्षेमार्थ मिळत. वे. दत्तंभटजी यांच्या मातेचें नांव सरस्वतीबाई पिता शंकरशास्त्री डेंगवेकर, पुणें. वडिलांच्या मृत्यूनंतर वे. दत्तंभटजी धावडशी सोडून लिंबगोव्यास राहाण्यास आले व तेथें वे. रघुनाथ परशुराम गाडगीळ यांच्या जवळ त्यांनीं ऋग्वेदाचें क्रमान्त अध्ययन केलें. नंतर कांहीं वर्षें लिंबगोव्याच्या वेदशाळेंत अध्यापनहि केलें. सन ११४८ मध्यें जळित झाल्यामुळें, लिंबगोवें सोडन वे. दत्तंभटजी पुण्यास राहातात.



वे. विनायकभटजी डोंगरे (पृ. ३७)



धै. विश्वनाथ वामन देव (पृ. ४४)



वे. श्रीकृष्ण वामन देव (पृ. ४६)



वे. भिकंभटजी बळवंत पटवर्धन (पृ. ५१)



फोटोंतील व्यक्तींचीं नांवें परिशिष्ट २ मध्यें दिलीं आहेत.

यांच्या पत्नीचें नांव लक्ष्मीबाई पिता परशुराम आत्माराम आठल्ये, बार्शी. यांना तीन मुलगे असून, थोरले पुरुषोत्तम हे मॅट्रिकच्या परीक्षेंत जगन्नाथ शंकरशेट आले होते. नंतर त्यांचें शिक्षण एम्. ए. पर्यंत होऊन, हल्लीं ते पुण्यास डेक्कन कॉलेज रीसर्च इन्स्टिटयूटमध्यें काम करतात. दुसरे पुत्र भास्कर हे बी. एस्सी., बी. टी. होऊन कर्जत येथें शिक्षक आहेत. तिसरे पुत्र विष्णु हे लेखक आहेत.

● ● ●

## ५६ : गोपाळ गंगाधर नेने

### मिरज

यांचा जन्म सन १८६० मध्यें झाला. यांच्या वडिलांचें नांव गोपाळ विष्णु. हे अग्नीची उपासना करणारे असून, श्रीमंत मिरजकरांचे आश्रित होते. वे. गोपाळभटजींचें कृष्णयजुर्वेदाचें अध्ययन घरीं वडिलांजवळ झालें. नंतर घरीं वेदाध्यापनाचें कार्य विनावेतन त्यांनीं सुमारें चार तपें केलें. सर्व ब्राह्मणांनीं वेदाध्ययन केलेंच पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. 'वेदाध्ययनानें वाणी सुधारते येवढ्याकरतां तरी वेद शिका' असें ते कळकळीनें सर्वांस सांगत.

संस्कृतचेंहि त्यांनीं अध्ययन केलें होतें, तसेंच श्रौतज्ञानही त्यांनीं संपादन केलेलें होतें. यज्ञीय कुंडमंडपांची यांना चांगली माहिती होती. मंत्रजागराव्यतिरिक्त प्रतिग्रह न करण्याचा यांचा नियम असे. तोंडानें म्हणत असतां हातानें चातीवर सूत काढण्याचें काम नेहमीं चालूं असे. त्या सुताचीं जानवीं काढून ते विकीत, व आलेले पैसे निराळे ठेवून त्याचा दानधर्म करीत.

वे. गोपाळभटजी सन १९२६ मध्यें वारले.

● ● ●

## ५७ : वे. अनंतराम भिकाजी पटवर्धन

### काशी

यांचा जन्म सन १९०० मध्यें झाला. यांचे वडील वे. भिकाजी बळवंत पटवर्धन यांची माहिती या पुस्तकांत अन्यत्र दिली आहे. वे. अनंतराम ऊर्फ बाबा गुरुजी यांचें ऋग्वेदाचें अध्ययन वडिलांच्या जवळच झालें. वे. भिकं-भटजी यांच्या मृत्यूनंतर यांनीं वेदाध्यापनाचें कार्य अविरत चालविलें आहे. साङ्ग वेदविद्यालयांत अध्यापक आहेत. वे. अनंतरामभट पुणतांबेकर, पं. गणपतीशास्त्री हेब्बार, वे. गणपती देव, वे. यशवंत अनंतराम पटवर्धन व वे. विश्वनाथ वामन देव इ. मंडळींनीं वे. अनंतरामभट ( बाबा ) पटवर्धन यांच्याजवळ अध्ययन केलें आहे.

वे. अनंतरामभटजींच्या पत्नीचें नांव मथुराबाई पिता रामकृष्ण मोरेश्वर थत्ते शास्त्री, काशी. यांना चार पुत्र व दोन कन्या अशी संतति आहे. मुलांपैकीं वे. यशवंतभटजी घनपाठी वैदिक आहेत.

• • •

## ५८ : वे. गोविंद नारायण दीक्षित पटवर्धन

### मिरज

यांचा जन्म शके १८०७ मध्यें झाला. यांचे वडील वे. नारायण कृष्ण दीक्षित पटवर्धन हे मिरजेस वैदिक होते. वे. गोविंद दीक्षितांच्या मातेचें नांव सरस्वतीबाई पिता केशव हरि गोडबोले, तासगांव. वे. गोविंद दीक्षित यांनीं ऋग्वेदाचें क्रमापर्यंतचें अध्ययन मिरजेस घरीं वडिलांजवळ केलें. यांनीं ऋक्संहिता स्वाहाकार एकट्यानें म्हणून केला. पवमानाच्या एकवीसशें एकवीस ऋचा म्हणून सूर्य नमस्कार एकवीस दिवसांत घातले. यांची त्रिस्थली यात्रा दोन वेळां झाली असून, हरद्वार, हृषीकेश, कलकत्ता, गंगासागर,

6893



जगन्नाथपुरी या ठिकाणीं यात्रेकरतां प्रवास झाला आहे. श्रीमंत मिरजकर यांचा त्यांना आश्रय आहे.

वे. गोविंद दीक्षित यांच्या प्रथम पत्नीचें नांव रमाबाई पिता केशव धोंडदेव जोग, विटें. दुसरी भार्या–रमाबाई पिता दत्तात्रय बळवंत भाटे, इचलकरंजी.

● ● ●

## ५९. : वे. भिकंभटजी बळवंत पटवर्धन

### काशी

यांचें घराणें पनवेलचें रहिवासी असून चांगल्या संपन्न स्थितींतील होतें. यांचा जन्म सन १८५५ मध्यें झाला. वे. भिकंभटजी लहान असतांना त्यांचे वडील वे. बळवंत लक्ष्मण वारले. घरांतील भांडणांमुळें घर सोडून ते काशीस आले होते. नंतर भिकंभटजींचा जन्म झाला. पुढें भिकंभटजींनीं ब्रह्मावर्तास जाऊन वे. विनायकभटजी डोंगरे यांच्याजवळ वेदाध्ययनास सुरुवात केली. कांहीं दिवसांनीं वे. विनायकभटजी काशीस राहाण्यास गेले तेव्हां वे. भिकंभटजी त्यांच्याबरोबरच काशीस गेले व तेथें त्यांनीं ऋग्वेदाचें अध्ययन पूर्ण केलें. नंतर वे. डोंगरे यांच्या आज्ञेवरून त्यांनीं स्वतःच्या घरींच वेदशाळा चालू केली व तेथें पुष्कळ शिष्य पढवून तयार केले. उज्जैन, प्रयाग, गया, कोल्हापूर, पंढरपूर इ. ठिकाणचे विद्यार्थी त्यांच्याकडे शिकून गेले. त्यांच्या शिष्यमंडळीं-पैकीं त्यांचे पुत्र वे. अनंतराम ऊर्फ बाबा गुरुजी पटवर्धन व वे. दत्तात्रय भालचंद्र दीक्षित पानगांवकर आणि वे. बाळकृष्ण महादेव सप्रे हे विद्यमान असून, काशीच्या उत्तम वैदिकांत त्यांची गणना होते.

वे. भिकंभटजी यांची शिष्यांबरोबर वागणूक फार प्रेमळपणाची होती. वे. भिकंभटजी सर्व संथा तोंडी देत असत. पं. लक्ष्मणशास्त्री द्रवीड यांनीं त्यांना विनंति केली कीं, आपल्या पाठशाळेसह आपण साङ्गवेदविद्यालयांत यावें. त्यास अनुसरून घरच्या विद्यार्थ्यांसह वे. भिकंभटजी साङ्गवेदविद्यालयांत प्रविष्ट झाले. तेथें दोन वर्षें त्यांनीं अध्यापन केलें.

यांच्या शिष्यमंडळींत १ वे. विष्णुभटजी केळकर, २ वे. बाबूभटजी पाध्ये ३ वे. अनंतरामभटजी पटवर्धन, ४ वे. दत्तात्रय भालचंद्र पानगांवकर, ५ वे. बाळकृष्ण महादेव सप्रे, ६ वे. रंगनाथभटजी जोशी. इ. वैदिक तयार झाले.

वे. भिकंभटजी ब्रह्मघाटावर ज्या घरांत राहात असत तें घर घराच्या वृद्ध मालकिणीनें त्यांना बक्षीस दिलें. ती मालकीण वारल्यानंतर तिचें औध्र्व-देहिक वे. भिकंभटजींनीं केलें. वे. भिकंभटजींच्या पत्नीचें नांव इंदिराबाई पिता हरिपंत थत्ते, पुणें. यांचे पुत्र वे. अनन्तरामभटजी. वे. भिकंभटजी सन १९२८ मध्यें वारले.

• • •

## ६० : वे. कृष्णाजी बापू ( नरहर ) परांजपे

### अलीबाग

यांचा जन्म अलीबागेस शके १८२५ मध्यें झाला. यांच्या घराण्यांत वेदविद्या सतत सात पिढ्या चालू आहे. यांचे वडील बापू ( नरहर ) वामन हेहि उत्तम वैदिक होते. त्यांची माहिती या पुस्तकाच्या पहिल्या खंडांत दिली आहे. वे. कृष्णंभटजींच्या मातेचें नांव दुर्गाबाई पिता बळवंत सखाराम गोडबोले, उद्धर. वे. कृष्णंभटजी यांचें ऋग्वेदाचें बहुतेक अध्ययन घरींच वडिलांजवळ झालें. वडिलांच्या मृत्यूच्या वेळीं निरुक्त व गृह्यसूत्र म्हणावयाचें राहिलें होतें, तें वे. केशव गणेश जोशी, अलीबाग, यांच्याजवळ म्हटलें. दश-ग्रंथांचें सर्व अध्ययन वयाच्या १९ व्या वर्षी संपवून, वयाच्या २० व्या वर्षी वे. कृष्णंभटजींनीं वांईस ॐकारपूर्वक पदपारायण केलें. पुण्यास वे. शा. सभेची दशग्रंथाची परीक्षा शके १८४७ मध्यें दिली. नंतर वे. शा. सभेचे परीक्षक म्हणूनहि कांहीं वर्षें काम केलें. जटा व घनाची तयारी यांनीं स्वतःच्या परिश्रमानें उत्तम प्रकारची केली आहे. आज महाराष्ट्रांत पट्टीचे विद्वान म्हणून वे. कृष्णंभटजींची ख्याती आहे. श्रीशंकराचार्यांकडून त्यांना ‘ वैदिक शिरोमणी ’ अशी पदवी मिळाली आहे.

वे. कृष्णंभटजी यांची म्हणणी जलद असून, बैठक न मोडतां ते पुष्कळ वेळ म्हणूं शकतात. पेणेस श्री. अण्णासाहेब देव यांच्याकडे यांनीं सहा तासांत ब्राह्मणाची आवृत्ति एका बैठकीनें म्हटली.

इंदूर येथील नरहरगुरुवैदिकाश्रमांत वे. कृष्णंभटजींना मुद्दाम बोलावून त्यांचा सत्कार करण्यांत आला. सांगली, मिरज, भोर येथें यांना वर्षासन मिळत असतें. महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं होणाऱ्या स्वाहाकारांकरतां यांना आवर्जून बोलावण्यांत येतें.

वे. कृष्णंभटजींच्या पहिल्या पत्नीचें नांव राधाबाई पिता नारायण गोविंद लिमये, पेण. दुसरी भार्या विमलाबाई पिता त्रिविक्रम नीळकंठ जोशी, करजगांव, ता. दापोली. यांचे पुत्र १ सुमंगल, २ सुधीर.

वे. कृष्णंभटजींचें कायमचें वास्तव्य अलीबागेस असतें. कनकेश्वर देवस्थानचे ते सरकारनियुक्त विश्वस्त आहेत.

• • •

## ६१ : वे. महादेव धोंडो परांजपे
## मुर्डी

यांचा जन्म सन १८९६ सालीं झाला. यांचे वडील धोंडो भास्कर हे मुर्डी, ता. दापोली येथें रोकडीचा व्यापार व शेती बागायती करीत. मातेचें नांव यमुनाबाई. वे. महादेवभटजींचें ऋग्वेदाचें शाखाध्ययन घरींच आजोबा व वडील यांच्याजवळ वयाच्या तेराव्या वर्षी झालें. पुढच्या वेदाध्ययनाची सोय घरच्याघरीं होण्यासारखी नव्हती. पण वे. महादेवभटजींना शिक्षणाकरतां दूर ठेवण्यास आजोबा तयार होईनात व पितृभक्तीमुळें वे. महादेव भटजींचे वडील स्वतःच्या वडिलांसमोर बोलेनात. मुलाचा काळ शिक्षणाशिवाय फुकट चाललेला पाहून, वे. महादेवभटजींच्या मातुःश्रींनीं हट्ट धरून आजोबांच्या इच्छेविरुद्ध नातवास आंजर्ल्याला निजसुरे यांच्या वेदशाळेंत पाठविलें. ही वेदशाळा सुमारें २०० वर्षें विनावेतन विद्यादान करण्याच्या

हेतूनें चालू होती. निजसुरे घराण्यांतील सहा पिढ्या अध्यापन करण्याचें कार्य सतत चालू होतें. शेवटीं सन १९३९ या वर्षीं ही शाळा बंद पडली. असो. या वेदशाळेंत वे. महादेव भटजींनीं पदें, क्रम व उपग्रंथ यांचें अध्ययन वे. गजानन रामकृष्ण निजसुरे गुरुजी यांच्याजवळ केलें. नंतर कोल्हापूरच्या वेदशास्त्राभ्यासनंदिनी सभेंत परीक्षा दिली.

वे. महादेवभटजी यांचा विवाह सन १९१४ मध्यें झाला. सन १९१८ मध्यें त्याच्या मातुःश्री वारल्या. यानंतर वे. महादेवभटजी यांची परिस्थिति बिकट झाली.

घरांत लहान ६ भावंडें, ९२ वर्षांचे आजोबा, वडिलांचा बाहेरच्या जगाशीं कधीं संपर्क न आलेला, अल्पवयी पत्नी, शिवाय घरांत दुसरें बाई-माणूस नाहीं व सांपत्तिक स्थिति साधारण, यामुळें वे. महादेवभटजींस घरा-कडेच प्रथम सर्व लक्ष द्यावें लागलें. यांच्या घराण्यांत शास्त्राध्ययन करून शेती–बागायती करण्याची परंपरा होती. भिक्षुकी करणें पसंत नसे. त्यास अनुसरून वे. महादेवभटजींनीं बागायतीकडे लक्ष दिलें. सुपारीचें उत्पन्न त्यांनीं कष्ट करून सहापटीपर्यंत वाढविलें, व पानवेलीचा मळाही करूं लागले. अशा रीतीनें ते संसाराचा गाडा चालवीत होते. सन १९१९ मध्यें त्यांचे आजोबा वारले व सन १९२६ मध्यें पत्नी निवर्तली. या वेळपर्यंत बंधूंना नोकऱ्याही लागल्या. तेव्हां मधून मधून वे. महादेवभटजी पर्यटनाकरतां बाहेर पडूं लागले. सिद्धपूर, काशी, गाणगापूर, इ. ठिकाणीं जाऊन आल्यानंतर, सन १९३५ सालीं वांटणी-पत्रक करून, ते बऱ्याच कालपर्यंत गृहत्याग करून बाहेर राहिले.

वे. महादेवभटजींनीं प्रथम दोन वर्षें त्र्यंबकेश्वरीं मुक्काम करून, अध्ययनाला पुन्हां उजळा दिला. नंतर इंदूर, ग्वाल्हेर, जगन्नाथपुरी, हरिद्वार, रामेश्वर, इत्यादि ठिकाणीं जाऊन, कऱ्हाडजवळ कोळे नरसिंगपूर येथें आले. तें गांव राहाण्यास बरें वाटल्यावरून, तेथेंच बारा वर्षें मधुकरी मागून राहिले. तेथील मुक्कामांत सांगलीच्या वेदशाळेंत परीक्षक म्हणून एक वेळ गेले होते.

वे. महादेवभटजी यांनीं पुढीलप्रमाणें वेद-पारायणें केलीं आहेत.

( १ ) आंजलें येथें ॐ सूर्याः प्रत्येक पदाचें प्रारंभीं म्हणून पदपारायण. सन १९३४.

(२) नाशिक येथें ॐ विष्णुः प्रत्येक पदाचे प्रारंभीं म्हणून पदपारायण. सन १९३७.

(३) काशी येथें ब्रह्मघाटावरील दत्तमंदिरांत षट् प्रणव विष्णुसंपुटित पदपारायण. उदाहरण— ॐ विष्णुः ॐ। ॐ परमं ॐ। ॐ विष्णुः ॐ। ॐ विष्णुः ॐ। ॐ पदं ॐ। ॐ विष्णुः ॐ। सन १९३९.

(४) नरसोबाचे वाडीस श्रीदत्ताचे पादुकांजवळ चतुःप्रणव विष्णु-संपुटित क्रमपारायण. सन १९४२.

वरील पारायणें अर्थार्जन करण्याच्या हेतूनें वे. महादेवभटजींनीं केलीं नाहींत. जटा-घनादि विकृति अगर वेद उलट-सुलट म्हणणें यांस योग्य ग्रंथाचा आधार नाहीं असें त्यांचें ठाम मत असल्यानें, संपुटीकरण करून क्रमा-पर्यंत पारायणें करण्याची सुरुवात यांनीं केली. श्री. संकेश्वरमठाकडून यांना '**निगमसंपुटिमार्तंड**' अशी पदवी देण्यांत आली. काशी येथें समारंभ होऊन, यांना मानपत्र व महावस्त्र देण्यांत आलें. तसेंच नरसोबाच्या वाडीस व आंजर्ल्याच्या वेदशाळेंत आणि कोल्हापूर व मुर्डी येथें सत्कार-समारंभ झाले. सन १९५४ पासून यांचें कायमचें वास्तव्य मुर्डीस आहे.

वे. महादेवभटजींच्या पत्नीचें नांव अंबिकाबाई पिता लक्ष्मण दामोदर जोशी, हरेश्वर, ता. श्रीवर्धन. यांची मोठी कन्या मालती वयाच्या बाविसाव्या वर्षीं आंथरुणांत सर्पदंश होऊन वारली. धाकटी कन्या शांताबाई. दोन मुलगे होते पण वांचले नाहींत.

• • •

## ६२ : वे. रामचंद्र गणेश प्रकाशकर

### बडोदें

यांचा जन्म शके १८०१ मध्यें झाला. यांचे वडील गणेशशास्त्री यांनीं न्यायशास्त्राचा उत्तम अभ्यास केलेला होता. पुराण सांगण्याचा व याज्ञिक कृत्यें करण्यांचा त्यांचा व्यवसाय होता. मातेचें नांव सरस्वतीबाई.

वे. रामचंद्रशास्त्री यांनीं ऋग्वेदाच्या दशग्रंथांचें अध्ययन, नर्मदातटाकीं शिनोर येथें त्यांचे मामा वे. गौतमभटजी यांच्याजवळ केलें. तसेंच शिनोर येथें वे. शा. सं. दामोदरशास्त्री कोराने यांच्याजवळ न्यायशास्त्राचा व दुर्गाशंकर वैद्य यांच्याजवळ वैद्यकशास्त्राचा अभ्यास केला. वेदभाष्याचेंही त्यांनीं उत्तम परिशीलन केलें होतें. बडोद्यास श्रावणमास परीक्षेचे ते पुढें पुष्कळ वर्षें व्याकरण व वेदभाष्याचे परीक्षक होते. यांची प्रवचन करण्याची शैलीही वाखाणण्यासारखी असे. गुजरात प्रांतांत रामचंद्रशास्त्री यांना सर्वत्र मोठा मान असे. श्री. प. प. वासुदेवानंद सरस्वती (श्री. टेंबेस्वामी) यांचा गरुडेश्वरीं मुक्काम असतांना, स्वाहाकारादि धर्मकृत्यें ते रामचंद्रशास्त्री यांच्या हातून करीत असत.

पं. रामचंद्रशास्त्री यांनीं पेटलाद व राजकोट येथें वेदपारायणें केलीं होतीं. वे. दिवाकरभटजी सप्रे व वे. वामनभटजी जोगळेकर हे बडोद्यांतील वैदिक यांच्या शिष्यवर्गांपैकीं आहेत. पं. रामचंद्रशास्त्री यांच्या भार्येचें नांव गोदूबाई. यांचे पुत्र वे. नारायणभटजी हे बडोद्यास वैदिक आहेत. पं. रामचंद्रशास्त्री सन १९४१ मध्यें वारले.

● ● ●

## ६३ : वे. शा. सं. गणेश रंगनाथ पाठक

### धार

यांचा जन्म सन १८३१ मध्यें खानदेशांत पारोळ्यास झाला. या घराण्याचें पूर्वीच्या काळीं 'राजपाठक' असें नांव होतें, असें म्हणतात. या घराण्याचें मूळगांव पैठण. तेथून नाशिक जिल्ह्यांतील तांबटाचें ओझर व नंतर चाळीसगांव तालुक्यांतील बहाळ येथें वास्तव्य झालें. तेथें नगरदेवळ्याचे जहागिरदार श्री. पवार यांनीं इनामी जमिनी दिल्या. वे. गणेशशास्त्री यांचे आजोबा जयरामशास्त्री हे बहाळ येथून निघून पारोळ्यास श्री. मोघे जहागिरदार यांचे आश्रित म्हणून राहूं लागले.

वे. शा. सं. गणेशशास्त्री यांचे वडील रंगनाथशास्त्री. यांच्याजवळ गणेशशास्त्री यांनीं अध्ययन केलें. पुराण-प्रवचन यांत यांची चांगली गति झाली. बारा वर्षांच्या वयांत त्यांनीं पारोळ्यास श्रीमद्भागवताचा सप्ताह केला. वडील व मातुःश्री राधाबाई लवकरच वारल्यानें, गणेशशास्त्री यांना कठीण दिवस आले. पण त्याच सुमारास शृंगेरीचे श्री शंकराचार्य यांची भेट होऊन, त्यांनीं गणेशशास्त्री यांना आपल्या परिवारांत ठेवून घेतलें. आचार्यांच्या स्वारींत ते २।३ वर्षें राहिले. नंतर श्रींचा संचार धार येथें होत असतां धारचे अधिपती श्रीमंत यशवंतराव महाराज पवार यांनीं गणेशशास्त्री यांना आपल्याजवळ ठेऊन घेतलें. श्री. यशवंतराव महाराजांना विद्याभिरुचि होती व त्यांनीं पुष्कळ विद्वानांना आश्रय देऊन पदरीं बाळगलें होतें. त्यांत गणेशशास्त्री यांचे आतेबंधु रावजीशास्त्री हेही होते. त्यांच्याकडे राहून गणेशशास्त्री यांनीं साहित्य, व्युत्पत्ति, ज्योतिष इ. विषयांचें अध्ययन त्यांच्याजवळ केलें. सागरचे प्रसिद्ध पंडित बाळशास्त्री आठल्ये हे त्यावेळीं धारकरांचे आश्रित होते. त्यांच्याजवळ गणेशशास्त्री यांनीं व्याकरण व धर्मशास्त्र यांचेंही अध्ययन केलें. शुक्लयजुर्वेदाचें अध्ययन व श्रौताध्ययन त्यांनीं धारेसच केलें. गणेशशास्त्री काव्यरचनाही करीत. शके १७८५ मध्यें त्यांनीं 'गणेश कविकृत स्तोत्रें' या नांवाचें एक लहानसें पुस्तक छापून प्रसिद्ध केलें.

वे. शा. सं. गणेशशास्त्री स्वतः आख्यानें बसवून कीर्तनेंही करीत. त्यांनीं सन १८६४ मध्यें 'आनंदसागर' या नांवाचा पौराणिक आख्यानांचा एक संग्रह लिहून प्रसिद्ध केला. तसेंच, 'बीजप्रकाश' या नांवाचा प्राचीन बीजगणितावरील एक ग्रंथ त्यांनीं लिहिला, पण तो अप्रकाशित राहिला आहे.

शास्त्राध्ययन झाल्यावर गणेशशास्त्री यांनीं शतपथ ब्राह्मणावर फार परिश्रम केले. शतपथ ब्राह्मणास स्वर दिलेले नसतात. सबब, त्या बाबतींत बारा वर्षें परिश्रम करून, गणेशशास्त्री यांनीं 'स्वरप्रकाश' या ग्रंथाचें हस्तलिखित तयार केलें. या कामीं त्यांना धार संस्थानचे त्या वेळचे अधिपती श्री. सर आनंदराव पवार यांनीं पुष्कळ आर्थिक साहाय्य केलें. पण ग्रंथ छापण्यापूर्वी ते व शास्त्रीबुवा असे उभयतांही कैलासवासी झाले. प्रसिद्ध पंडित डॉ. जॉर्ज बुलर व डॉ. मॅक्सम्युलर यांचेकडेही प्रकाशनाबाबत गणेशशास्त्र्यांनीं पत्रव्यवहार केला होता.

डॉ. मॅक्सम्युलर यांनीं ग्रंथाविषयीं अनुकूल अभिप्राय दिला होता. डॉ. बुलर यांस सन १८९३ मध्यें लिहिलेल्या संस्कृत पत्राची नक्कल उपलब्ध आहे. त्यांत गणेशशास्त्री लिहितात.

" मया शुक्लयजुर्वेदीय शतपथ ब्राह्मणोपरि स्वरप्रकाशाख्य व्याख्यानं चत्वारिंशत्सहस्रमितं द्वादश वार्षिकानेह व्यरचि। यस्यावलोकनेन चतुर्वेदी स्वराणामपि आकलनं कलयेयुर्विद्वत्कल्पा परममुष्य मुद्रणे ग्रंथभूयस्त्वात्सार्वजनीन ग्रहणासंभवात् बहुव्ययकरणे स्वसामर्थ्याभावाच्यासावहं जराभिभूतत्ववशेन वा ना शक्नुवम् । शार्मण्यादि देशेषु वेदरसिकविदुषां भूयस्त्वाभूवादृशास्मस्तु प्रयत्नवशेन तत्र मुद्रणमाशासे । "

ग्रंथाचा प्रारंभ पुढील श्लोकानें केला आहे.

" श्रीमद्गणेशस्य च शारदाया मातुःपितुश्चापि गुरोः पदाब्जम् ।
प्रणम्य माध्यंदिन शाखि वेदः स्वरः प्रकाशं रचये गणेशः ॥१॥
शांडिल्य गोत्रे जयरामनाम पितामहो यस्य च रंगनाथ ः ।
पिता तु राधा जननी च ताभ्यां गणेशशर्मा जनि पाठकाख्यः ॥ २ ॥
पवारवंशोद्भव मौक्तिकस्य धाराधिपत्य प्रथितस्य पृथ्व्याम् ।
आनंदनाम्ना कृपाश्रयेण स्वरप्रकाशं कुरुते गणेशः ॥ ३ ॥ "

आणि ग्रंथाचा शेवट पुढील श्लोकानें केला आहे.

" गुरुतया न चकार च भाष्यकृत्शतपथे स्वरलेखनमित्यतः ।
व्यरचितत्कृति वीक्षणा लब्धया निजधिया परिशिष्टमिदं मया ॥

वे. शा. सं. गणेशशास्त्री यांनीं उतारवयांत इंग्रजी शिकण्याचाही प्रयत्न केला. पण प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें तो सोडून द्यावा लागला.

वे. गणेशशास्त्री यांना धार संस्थानांतून दरमहा रु. ३० मिळत व सनदी पटवाऱ्याचे दोन गांव-बाकुरली व भिडोता-त्यांना देण्यांत आले होते. राजशास्त्री, दानाध्यक्ष व न्यायाधिशाचें कामही त्यांच्याकडे देण्यांत आलें. शेवटीं विद्याखातें, वाचनालय व आनंदसागर शिला छापखान्याचें कामही त्यांच्यावर सोंपविण्यांत आलें होतें.

यांच्या पत्नीचें नांव मनकर्णिकाबाई. त्या अमळनेरच्या चिराखे घराण्यांतील होत्या. यांना तीन पुत्र व दोन मुली अशीं अपत्यें होतीं.

वे. गणेशशास्त्री सन १८९६ मध्यें धार येथें वारले.

●●●

## ६४ : वे. दत्तात्रय बळवंत पाठक दीक्षित

### धार

यांच्या घराण्यांत अग्निहोत्र ५ पिढ्या चालत आलें आहे. वे. दत्तात्रय दीक्षितांचे पूर्वज घनपाठी व श्रौतविद्यासंपन्न होते. यांच्या घराण्याचें मूळगाव शिरूर तालुक्यांतील मलठण हें होय. वे. दत्तात्रय दीक्षित यांचे निपणजे यशवंत दीक्षित यांनीं दक्षिणेंत पुष्कळ यज्ञ केले होते. माळव्यांत मुसलमानी अंमलांत मंदिरांची फार मोडतोड झाली होती. मांडवचे महंत रामसनेह यांनीं रामाचें भव्य देवालय बांधण्याचें ठरविलें. त्यास श्रीमंत पवारांनीं मोठी मदत देऊन, शिवाय मंदिरांस मोठ्या रकमेची जहागीरही दिली. याच महंतानें यशवंत दीक्षितांना सन्मानपूर्वक बोलावून आचार्यत्व दिलें. तें अद्याप वे. दत्तात्रय दीक्षितांपर्यंत चालू आहे.

वे. दत्तात्रय दीक्षितांचे वडील वारल्यानंतर अग्निहोत्रांत कांहीं दिवस खंड पडला होता. पुढें सन १९१४ चे सुमारास वे. दत्तात्रय दीक्षितांची व प. प. ब्रह्मीभूत वासुदेवानंद सरस्वती ( टेंबे स्वामी ) यांची भेट चिखलदा येथें झाली असतां, स्वामींनीं दीक्षितांस अग्निहोत्र पुन्हां चालू करण्याबद्दल आज्ञा केली. परंतु धारेस श्रौत शिकविणारा कोणी नाहीं, असें दीक्षितांनीं सांगितलें. तेव्हां ' नरसोबाचे वाडीहून कोणी संन्यासी येऊन तुला माहिती देईल ' असा स्वामींनीं जबाब दिला. पुढें सन १९२६ मध्यें भारतीबुवा गणेशभटस्वामी धार येथें येऊन, त्यांनीं श्रीमंतांच्या इच्छेवरून वे. दत्तात्रय दीक्षितांस शिकवून त्यांच्याकडून आधान करविलें. तें अद्याप चालू आहे. श्रीमंत पवारांचा थोडाफार असलेला आश्रय विलीनीकरणानंतर बंद झाल्यामुळें बिकट परिस्थितींत वे. दत्तात्रय दीक्षितांनीं अग्निहोत्र चालविलें आहे.

वे. दत्तात्रय दीक्षितांनी उच्च संगीताचाहि व्यासंग केलेला असून भारतांत प्रवासही पुष्कळ केलेला आहे.

यांच्या पत्नीचें नांव दुर्गाबाई पिता गणेश इनामदार, तराणें, जि. इंदूर. यांना सहा पुत्र व दोन कन्या आहेत.

• • •

## ९५ : वे. महेश्वर महादेव पाध्ये

### कोळधें

याचा जन्म शके १८११ मध्यें झाला. यांचे वडील वे. महादेव बाळकृष्ण पाध्ये हे वैदिक होते. मातेचें नांव लक्ष्मीबाई पिता कृष्ण वीरेश्वर हळबे, निंसर. वे. महेश्वरभटजींनीं ऋग्वेदाच्या दशग्रंथांचें अध्ययन वे. रामचंद्र नारायण हळबे, कोळधें आणि वे. महादेव गोपाळ पुरोहित, मलकापूर यांच्याजवळ केलें. याज्ञिक व ज्योतिष या विषयांचा अभ्यासही केला. पुण्याच्या वे. शा. सभेंत व इंदूर व कोल्हापूर इ. ठिकाणीं वेदपरीक्षा दिल्या आहेत.

वे. महेश्वरभटजींनीं दशग्रंथांचीं पारायणें सातारा, मुंबई, रत्नागिरी, हरिहरेश्वर, कोळधें व केडगांव येथें केलेलीं आहेत. संहिता – स्वाहाकाराकरतां सांगली, आजरें, संकेश्वर, रत्नागिरी, मुंबई, जांब, नागपूर येथें गेले होते. वे. शा. सभा, पुणें व कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई आणि सांगली व रत्नागिरी येथील वेदशाळेंत परीक्षक म्हणून काम केलें आहे.

यांच्या पहिल्या भार्येचें नांव पार्वतीबाई पिता आत्माराम भास्कर आठल्ये, भडकंबें. दुसरी भार्या यशोदाबाई पिता विश्वनाथ हरि आंबर्डेकर, हरचिरी. वे. महेश्वरभटजींना तीन पुत्र व दोन कन्या अशी संतति आहे. पहिल्या कुटुंबाचे पुत्र वे. सखारामभटजी हे प्रसिद्ध घनपाठी असून, त्यांची माहिती अन्यत्र दिलेली आहे. मोठी मुलगी चंदू वे. रामचंद्र सदाशिव फणसळकर यांना दिलेली आहे.

• • •

## ६६ : वे. सखाराम महेश्वर पाध्ये

### इचलकरंजी

यांचा जन्म शके १८३९ मध्यें झाला. यांच्या घराण्यांत वैदिकांची परंपरा असून, यांचे वडील वे. महेश्वर महादेव पाध्ये हे प्रसिद्ध वैदिक कोलधें येथें असतात. मातेचें नांव पार्वतीबाई पिता आत्माराम भास्कर आठल्ये, भड्कंबें. वे. सखारामभटजींनीं ऋग्वेदाचें घनान्त अध्ययन प्रथम वे. रामचंद्र नारायण पाध्ये, कोलधें व नंतर वे. सखाराम वासुदेव ऊर्फ बाळंभटजी माणगांवकर गुरुजी, इचलकरंजी यांच्याजवळ केलें. पुढें वे. शा. सभा, पुणें व गर्गेगुरु विद्यापीठ, पंढरपूर येथें दशग्रंथांच्या परीक्षा दिल्या. वे. शा. सभेच्या परीक्षत यांना शेंकडा ९५ गुण मिळाले. नंतर सन १९४१ मध्यें काशीच्या साङ्गवेद विद्यालयाच्या दशग्रंथांची, १९४३ मध्यें जटा व प्रातिशाख्याची व १९४५ मध्यें घनाची परीक्षा वे. सखारामभटजी प्रथम श्रेणींत उत्तीर्ण झाले. साङ्गवेद-विद्यालय स्थापन झाल्यापासून सन १९४१ पर्यंत वीस वर्षांत अखिल भारतांतून एकाही ऋग्वेदी विद्यार्थ्यानें घनान्त दशग्रंथांची परीक्षा दिली नव्हती या उज्ज्वल यशाबद्दल विद्यालयाकडून वे. सखारामभटजींना चांदीचें पदक, महावस्त्र व 'वेदरत्न' अशी पदवी देण्यांत आली व यावज्जीव रुपये १०० चें वर्षासन नियमाप्रमाणें देण्यांत आलें. नंतर वे. शा. सभा, पुणें, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई व वेशास्त्राभ्यासाभिनंदिनी सभा, कोल्हापूर येथेंही जटा–घनाच्या परीक्षा दिल्या.

वे. सखारामभटजी यांनीं पुढीलप्रमाणें वेदपारायणें केलीं आहेत:—

१. इचलकरंजीच्या राजवाड्यांत क्रम–पारायण. सन १९४२

२. पुण्यास कसबा गणपति मंदिरांत जटा–पारायण.

३. काशी येथें राजवाडे यांच्या राम मंदिरांत घन–पारायण सन १९४५.

हें पारायण केवळ अठेचाळीस दिवसांत वे. सखारामभटजींनीं पूर्ण केलें. याच्या समाप्तीच्या वेळीं काशीच्या विद्वान मंडळींनीं पारायणींचा मोठा सत्कार करून त्यांना मानपत्र व 'वेदसम्राट' अशी पदवी दिली.

४. मुंबई येथें फडके गणपती–मंदिरांत घन–पारायण. सन १९५३

५. कल्याण येथील त्रिविक्रम मंदिरांत जटा-पारायण. सन १९५५
६. शाखा व दशग्रंथांचीं पारायणें-कंदकूर्ति देवस्थान ( आंध्र ), दावणागिरी ( म्हैसूर ), पंढरपूर, रत्नागिरी, मुंबई, वांई येथें केलीं.
७. पुण्यांस बेलबागेंत घन-पारायण. सन १९६०

वे. सखारामभटजी यांचा सत्कार इंदूर येथें नरहर गुरु वैदिकाश्रम, इचलकरंजी, रत्नागिरी, नरसोबाची वाडी, मुंबई. पुणें, कोलधें, बेळगांव, कुर्धे, उज्जैन, इ. ठिकाणीं करण्यांत आला आहे महाराष्ट्रांत अनेक ठिकाणच्या स्वाहाकारांत व सोंडूर येथें झालेल्या कार्तिक स्वामीच्या प्रतिष्ठेस वे. सखारामभटजी गेले होते. तसेंच गणपती पुळ्यास झालेल्या गणेशयागांत व पंढरपूरच्या विष्णुयागांत यांनीं भाग घेतला होता. पुण्याच्या वे. शा. सभेंत, पंढरपूरच्या गर्गे गुरु विद्यापीठांत आणि सांगलीच्या वेदशाळेंत यांनीं परीक्षक म्हणून काम केलें आहे. पं. सातवळेकर यांनीं स्वाध्याय मंडळामार्फत छापलेल्या ऋग्वेदाच्या कांहीं भागांचीं प्रुफें तपासण्याचें काम यांच्याकडे देण्यांत आलें होतें.

वे. सखारामभटजी यांची इचलकरंजीच्या सरकारी वेदशाळेवर गुरुजी म्हणून नेमणूक सन १९४४ पासून झाली असून, तेव्हांपासून अध्यापनाचें काम ते अल्प वेतनावर करीत आहेत. कै. बाबासाहेब घोरपडे इचलकरंजीकर यांनीं वे. सखाराम भटजींस विद्यार्थिदशेंत शिष्यवृत्ति देऊन व प्रोत्साहन देऊन अध्ययन पूर्ण करण्यास साहाय्य केलें. वे. माणगांवकर गुरुजी यांनींही वे. सखारामभटजींकरतां फार परिश्रम घेतले. काशीस ते परीक्षेस गेले तेव्हां माणगांवकर गुरुजीही स्वखर्चानें शिष्याबरोबर काशीस गेले! वे. शा. सभेकडूनही जटा व घनाच्या अध्ययनाकरतां दरमहा रु. १० प्रमाणें चार वर्षें शिष्यवृत्ति मिळत होती.

वे. सखारामभटजी यांनीं त्रिस्थळी व इतर यात्रा केल्या आहेत. यांच्या पहिल्या भार्येचें नांव सीताबाई पिता रामचंद्र विनायक पाध्ये गुर्जर, मालावली. दुसरीं भार्या-कमलाबाई पिता दत्तात्रय श्रीकृष्ण पराडकर, खानवली. वे. सखाराम भटजींना चार कन्या आहेत.

• • •

## ६७ : वे. हणमंत नारायण पाळंदे

### पुणें

यांचा जन्म शके १८१३ मध्यें पुणें येथें झाला. क्रॉफर्ड प्रकरणांत प्रसिद्धीस आलेले वे. अनंतभटजी पाळंदे यांचे हे नातू व श्री. नारायण अनंत यांचे चिरंजीव. नारायण अनंत हे पुण्यास नोकरी करीत. वे. हणमंतभटजींच्या मातेचें नांव लक्ष्मीबाई पिता मोरेश्वर नीलकंठ जोशी, सातारा. वे. हणमंत-भटजींनीं कृष्णयजुर्वेदाचें अध्ययन प्रथम वे. रामभटजी खरे यांच्याकडे व त्यांच्या मृत्यूनंतर वे. नारायणभटजी खरे यांच्याजवळ केलें. सांगलीस झालेल्या सर्वतोमुख यज्ञांत यांनीं काम केलें होतें.

वे. हणमंतभटजी यांनीं गंगोत्री, जमनोत्री, केदारनाथ, बदरीनारायण, काशी, रामेश्वर इ. यात्रा केल्या आहेत. व्यायामाची आवड असून, पुरांत उड्या टाकण्याइतकें जलतरणपटुत्व आहे.

यांची पहिली भार्या सरस्वतीबाई पिता श्रीधर शिंत्रे, उकसाण. दुसरी भार्या सरस्वतीबाई पिता महादेव लक्ष्मण रानडे, वांई. तिसरी भार्या यशोदाबाई पिता रा. सा. नारायण विष्णु जोशी, पुणें. दुसऱ्या भार्येस एक कन्या असून तिसऱ्या कुटुंबास एक मुलगी व चार मुलगे आहेत.

• • •

## ६८ : वे. वासुदेवाचार्य भट्ट पुराणिक

### काशी

वे. वासुदेवाचार्य यांचें टोपण नांव मारुती आचार्य असें होतें व ते त्या नांवानेंच ओळखले जात. हे काशींतील काण्व शाखीय पहिल्या प्रतीचे वैदिक होते. व्याकरण व वेदांताचाहि उत्तम अभ्यास केला होता. तसेंच योगशास्त्रांतही यांची गति होती. यांनीं मंत्रजागराव्यातिरिक्त कोणताहि प्रतिग्रह केला नाहीं.

वे. वासुदेवाचार्य यांचीं दोन लग्नें झालीं, पण दोन्हीं कुटुंबें लवकरच निवर्तलीं. एका पत्नीचे वडील वे. सदाशिवभटजी वेदांती हे होत.

वे. वासुदेवाचार्य हे कांहीं कारणामुळें घर सोडून अज्ञातवासी झाले. त्यांचा अद्याप पत्ता मिळालेला नाहीं.

• • •

## ६९. : वे. महादेव गोपाळ पुरोहित

### मलकापूर

यांचा जन्म शके १८०६ मध्यें सोनवडें, ता. संगमेश्वर येथें झाला. यांच्या वडिलांचें नांव गोपाळ बाळकृष्ण. हेहि उत्तम वैदिक होते. मातेचें नांव भागीरथीबाई पिता गोपाळ नीळकंठ आंबेटकर. वे. महादेवभटजी यांचें ऋग्वेदाचें अध्ययन प्रथम वे. भिकंभटजी मोरेश्वर पित्रे व नंतर वे. विष्णु महादेव ऊर्फ अण्णा दीक्षित पित्रे यांच्याजवळ जटान्त झालें. नंतर राजापूरच्या संस्कृत शाळेंत म. म. दत्तात्रयशास्त्री वासुदेव निगुडकर यांच्याजवळ राहून प्रथम काव्य व नंतर कौमुदीचें व वेदभाष्याचें अध्ययन वे. महादेवभटजींनीं केलें. शके १८३२ मध्यें विशाळगड संस्थानांतील मलकापूर येथील वेदशाळेवर त्यांची गुरुजी म्हणून नेमणूक झाली व तें काम अद्याप ते करीत आहेत.

वे. महादेवभटजींनीं घनाची तयारी करून, पुणें व मुंबई येथें घनाचीं पारायणें केलीं. नंतर काशीस जाऊन, ब्रह्मघाटावर राजवाडे यांच्या राममंदिरांत शेवटचें घनपारायण केलें. त्यावेळीं तेथें यांचा चांगला सत्कार करण्यांत आला व 'वेदमार्तंड' अशी पदवी देण्यांत आली. इंदूर येथें पाडव्याचे उत्सवांत वे. महादेवभटजी यांची परीक्षा घेण्यांत आली. त्यावेळीं त्यांना प्रथम क्रमांकाचें पारितोषिक व वस्त्र मिळालें. श्रीमंत जमखंडीकर यांनींहि श्रीगणपत्युत्सवाचे प्रसंगीं वे. महादेवभटजींचा सत्कार केला.



वे. शा. सं. गणेश रंगनाथ पाठक (पृ. ५६)



वे. सखाराम महेश्वर पाध्ये (पृ. ६०)



वे. महादेव गोपाळ पुरोहित (पृ. ६४)

कै. म. म. द. वा. पोतदार,



वे. रामचंद्र सदाशिव फणसळकर
( पृ. ६६ )



वे. रामचंद्र गणेश प्रकाशकर (पृ. ५५)

वे. महादेवभटजींनीं वेदविद्येंत पुष्कळ शिष्य तयार केले आहेत. वे. महेश्वर महादेव पाध्ये, राहाणार कोळधें; वासुदेव पांडुरंग जोशी, मलकापूर; वामन वासुदेव जोशी, विशाळगड; वासुदेव गणेश सप्रे, ओशिवळें; हरि काशीनाथ पाध्ये, कोळधें; विनायक सीताराम आठल्ये, भडकंबें; वासुदेव महादेव पुरोहित, मलकापूर यांचा समावेश त्यांच्या शिष्यमालिकेंत आहे.

वे. महादेवभटजींच्या पत्नीचें नांव पार्वतीबाई. या शिवनें येथील वे. धोंडो सखाराम हळबे यांच्या कन्या. यांना दोन मुली व पांच मुलगे अशा अपत्यें आहेत. मुलांपैकीं वासुदेव हे वैदिक असून, त्यांनीं पुणें वेद-शास्त्रोत्तेजक सभेची दशग्रंथाची परीक्षा दिलेली आहे. सांगली येथें त्यांनीं जटेचें व घनाचें पारायणहि केलें आहे.

• • •

## ७० : वे. विनायक रामकृष्ण दीक्षित फडके

### काशी

यांचा जन्म सन १९०८ च्या सुमारास झाला. यांचे वडील वे. रामकृष्ण दीक्षित हे काशीस ख्यातनाम वैदिक होते. वे. विनायक दीक्षित यांनीं ऋग्वेदाचें संपूर्ण अध्ययन वे. गंगाधरभटजी हर्डीकर यांच्याजवळ केलें. यांची स्मरणशक्ति जबरदस्त होती. यांना श्रौत–स्मार्तांची कुंडमंडपान्त उत्तम माहिती होती. इंग्रजी व संस्कृत लेखन-वाचनापुरतें येत होतें. त्यांचीं दोन लग्नें होऊनहि भार्या लवकर वारल्या. त्यामुळें अपत्य नाहीं. यांचे बंधु नारायण दीक्षित हे काशीस वैदिक आहेत.

वे. विनायक दीक्षित सन १९४८ मध्यें वारले.

• • •

## ७१ : वे. रामचंद्र सदाशिव फणसळकर

### पुणें

यांचा जन्म शके १८४७ मध्यें राजापूर तालुक्यांतील शिरगांव येथें झाला. यांचे वडील वे. सदाशिव विनायक फणसळकर हे तेथें वैदिक आहेत. मातेचें नांव सरस्वतीबाई. त्या वे. रामचंद्रभटजी ५ वर्षांच्या असतांना निवर्तल्या. आजोबा वे. विनायक विठ्ठल हेहि प्रसिद्ध वैदिक होते. त्यांनीं शिरवलीस वेदशाळा स्थापन करून पुष्कळ वर्षें चालविली. वे. रामचंद्रभटजी यांचें ऋग्वेदाचें क्रमापर्यंत अध्ययन घरीं आजोबांजवळ झालें. यांबाबत विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे आजोबा, वडील व नातू अशी त्रयी मंत्रजागरांत एकत्र म्हणण्यास बसे! वे. रामचंद्रभटजी यांनीं इचलकरंजीस दोन वर्षें कै. वे. बाळंभटजी माणगांवकर यांच्याकडेहि अध्ययन केलें. घरीं राहून भागण्यासारखें नसल्यानें वे. रामचंद्रभटजी प्रथम मुंबईस गेले. परंतु मुंबईस राहून वेदाध्ययन करणें शक्य नाहीं असें दिसून आल्यावर ते पुण्यास आले. पुण्यास आल्यावर त्यांनीं वे. शा. सभेची शाखेची परीक्षा दिली. त्या वेळचे परीक्षक वे. गोविंदभटजी फाटक यांनीं पुढील अध्ययन चालू ठेवण्याबद्दल यांना प्रोत्साहन दिलें. पुणें वेदपाठशाळेनें दरमहा रु. ५ ची शिष्यवृत्ति दिली व उपगुरुजी म्हणून पाठशाळेंत नेमणूक केली. तें काम वे. रामचंद्रभटजी यांनीं ६–७ वर्षें केलें. याच काळांत त्यांना श्री. स. दाजीसाहेब पटवर्धन यांचा आश्रय मिळाला. पुणें वेदपाठशाळेचे गुरुजी वे. द. पां. किंजवडेकर, घनपाठी यांच्याजवळ जटा व घनाचें अध्ययन केलें. जटा–घनाकरतां वे. शा. सभेनें चार वर्षें शिष्यवृत्ति दिली. ती परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर वे. शा. सभेनें पारितोषिक व 'वैदिकचूडामणि' ही पदवी दिली. नंतर काशी येथील साङ्गवेद–विद्यालयाची परीक्षा द्यावी असा विचार वे. रामचंद्रभटजी यांच्या मनांत घोळूं लागला. काशीचे घनपाठी वैदिक वे. विश्वनाथ वामन देव यांच्या उत्तेजनामुळें, दोन वर्षें परिश्रम करून, वे. रामचंद्रभटजींनीं तीहि सर्वोच्च परीक्षा दिली. शंभर रुपये दक्षणा व महावस्त्र काशीस देण्यांत आलें. पुणें येथें परत आल्यावर श्रीशंकराचार्य मठांत सत्कार करण्यांत आला. सातारा येथें मठांत श्रीजेरेस्वामी यांनींहि

महावस्त्र व ' वैदिक-शिखामणि ' अशी पदवी दिली. नंतर पुण्यास बेलबागेंत जटापारायण केलें. नागरिकांतर्फे सत्कार करण्यांत आला व शंकराचार्यांनीं ' वेदचूडामणि ' ही पदवी दिली. नंतर मुंबईस व ठाणें येथें जटेचें पारायण केलें. याशिवाय राजापूर, नाशिक, विजापूर, बार्शी, बडोदें, चाळिसगांव येथें संहिता व क्रमपारायणें केलीं आहेत. काशी येथील प्रातिशाख्य परीक्षा अद्याप द्यावयाची आहे. त्याकरतां इचलकरंजी ट्रस्टकडून रु. १२० ची वार्षिक शिष्यवृत्ति मिळाली.

वे. रामचंद्रभटजींच्या पत्नीचें नांव सीताबाई. या वे. महेश्वर महादेव पाध्ये, रा. कोलधें, यांच्या कन्या. वे. सखाराम महेश्वर पाध्ये हे प्रसिद्ध वैदिक वे. रामचंद्रभटजींचे मेहुणे होत. वे. रामचंद्रभटजी यांना तीन पुत्र व एक कन्या आहे.

• • •

## ७२. : वे. विनायक विठ्ठल फणसळकर

### शिरवली

यांचा जन्म शके १७८८ मध्यें झाला. यांचे वडील वे. विठ्ठल रामचंद्र हे राजापूर तालुक्यांतील शिरवली येथें शेती व भिक्षुकी करीत. मातेचें नांव रुक्मिणीबाई. वे. विनायकभटजी १३ वर्षांचे असतांना रुक्मिणीबाई वारल्या. घरांतील काम संभाळून वेदाध्ययन होणार नाहीं असें दिसून आल्यामुळें वे. विनायकभटजी घर सोडून कोल्हापुरास अध्ययनाकरतां गेले व तेथें त्यांच्या वडिलांचे चुलतचुलते वे. शंकरभटजी फणसळकर यांच्याजवळ त्यांनीं ऋग्वेदाचें क्रमान्त अध्ययन केलें. कोल्हापूर येथें दशग्रंथाची परीक्षाहि दिली. नंतर कोंडतिवरें ता. राजापूर येथें स्थापन झालेल्या वेदशाळेवर त्यांना चालकांनीं अध्यापक नेमलें. त्या शाळेंत अध्यापनाचें काम वे. विनायकभटजी यांनीं सुमारें तीस वर्षें अव्याहतपणें केलें. या अवधींत त्यांच्याकडे पुष्कळ विद्यार्थी अध्ययन करून गेले. त्यांत वे. रामकृष्ण गुणे, वे. गजानन मोरेश्वर

पाध्ये, वे. सदाशिव फणसळकर, वे. बाळकृष्ण पाध्ये, वे. गंगाधर फणसळकर, वे. विष्णु पाध्ये, वे. गंगाधर करंबेळकर व स्वतःचा नातु वे. रामचंद्र सदाशिव फणसळकर हे वैदिक तयार झाले.

वे. विनायकभटजी यांचें मराठी शालेय शिक्षण झालेलें नव्हतें, पण ते व्यवहार उत्तम जाणत असत. कांहीं वर्षें त्यांनीं गांवची खोतीहि केली.

वे. विनायकभटजींच्या भार्येचें नांव सरस्वतीबाई पिता गोविंद सदाशिव गुर्जर पाध्ये, राजापूर. यांना पांच कन्या व सदाशिव आणि महादेव असे दोन पुत्र झाले. पैकीं वे. सदाशिवभटजी हे वैदिक आहेत.

वे. विनायकभटजी शके १८७२ मध्यें वारले.

• • •

## ७३ : वे. सदाशिव विनायक फणसळकर

### शिरवली

यांचा जन्म शके १८२० मध्यें राजापूर तालुक्यांतील शिरवली येथें झाला. यांच्या घराण्यांत वैदिकीची परंपरा चालत आलेली आहे. यांचे वडील वे. विनायक विठ्ठल यांची माहिती या पुस्तकांत स्वतंत्र दिलेली आहे. वे. सदाशिवभटजींच्या मातेचें नांव सरस्वतीबाई पिता गोविंद सदाशिव गुर्जर पाध्ये, राजापूर. वे. सदाशिवभटजींनीं ऋग्वेदाच्या दशग्रंथांचें अध्ययन कोंडतिवरें येथील वेदशाळेंत वडिलांजवळ केलें. नंतर सांगली, कुरुंदवाड, कोल्हापूर येथें वेदपरीक्षा दिल्या.

वे. सदाशिवभटजी यांनीं कोंडतिवरें येथील वेदशाळेंत दहा वर्षें अध्यापनाचें कार्य केलें. हल्लीं शिरवली येथें शेती व भिक्षुकी करून असतात.

यांच्या पहिल्या भार्येचें नांव अन्नपूर्णाबाई पिता मोरेश्वर गुंडो पाध्ये गुर्जर. यांचीं अपत्यें–वे. रामचंद्रभटजी व शांता. दुसरी भार्या–अन्नपूर्णा पिता महादेव ठाकूर, ओणी. यांना चार मुलगे व दोन मुली अशी संतति आहे.

वे. रामचंद्रभटजी हे घनपाठी वैदिक असून, त्यांची माहिती या पुस्तकांत अन्यत्र दिली आहे.

● ● ●

## ७४ : वे. गणेश ( सोमनाथ ) विश्वनाथ बापट

**काशी**

यांचा जन्म काशी येथें संवत् १९६५ मध्यें झाला. यांचें कृष्णयजुर्वेदाचें अध्ययन प्रथम वे. भिकू दीक्षित लेले यांच्याकडे व पुढील क्रमान्त अध्ययन वे. रामभटजी दामोदर देव यांच्याकडे काशीस झालें. श्रौताचें, स्मार्त याज्ञिक विषयाचें व यज्ञीय सामगानाचेंहि शिक्षण झालें आहे. वयाच्या २१ व्या वर्षी साङ्गवेद-विद्यालयांत यांनीं वेदपरीक्षा दिली. विद्यालयाच्या अधिकाऱ्यांशीं कांहीं मतभेद झाल्यानें यांनीं अंतिम परीक्षा मात्र तेथें दिली नाहीं. सन १९३४ मध्यें इंदुरास परीक्षा दिली. ग्वाल्हेर येथें मोदीच्या राममंदिरांत वयाच्या २२ व्या वर्षीं क्रमपारायण केलें. नंतर सांगली येथेंहि मुरलीधर मंदिरांत क्रमपारायण केलें. सांगली येथें झालेल्या नातूंच्या अनेक यज्ञांत यांनीं आर्त्विज्य केलें, व नागपूरचे वे. कृष्णंभटजी गोखले यांनीं पवनी येथें सोमयाग केला त्यांत आध्वर्यव केलें. दिल्ली येथें झालेल्या शतमुख कोटी होमाचे वेळींहि यांना निमंत्रिलें होतें. वयाच्या २८ व्या वर्षी वे. सोमनाथभटजी यांची काशींतील प्रसिद्ध गोयनका संस्कृत कॉलेजांत कृष्णयजुर्वेदाचे अध्यापक म्हणून नेमणूक झाली व तेथें अध्यापक म्हणून सोमनाथभटजी अद्याप काम करीत आहेत.

वे. सोमनाथभटजी यांच्या पत्नी सरस्वतीबाई. या वे. गंगाधरभटजी लेले यांच्या कन्या. त्या सन १९४८ मध्यें वारल्या, व नंतर एकुलता एक मुलगाहि वारला. वे. सोमनाथभटजी यांना तीन कन्या आहेत.

● ● ●

## ७५ : वे. गोविंद धोंडदेव बापट दीक्षित

### गोळप

यांचा जन्म शके १७९२ चे सुमारास झाला. यांचे वडील धोंडदेव कृष्ण व मातेचें नांव सत्यभामाबाई पिता लेले, गोळप. वे. गोविंदभटजींचे आजोबा कृष्ण यज्ञेश्वर हे गोळपचे आजूबाजूचे भागांत मोठे विद्वान म्हणून सर्वश्रुत होते. कृष्ण दीक्षित यांनी स्वतः सोमयागहि केला होता. वे. गोविंदभटजींपर्यंत या घराण्यांत नऊ पिढ्या अग्निहोत्र होतें. वे. गोविंदभटजी यांनीं कृष्ण-यजुर्वेदाचें क्रमान्त अध्ययन वे. पालकर गुरुजी यांच्या जवळ गोळप येथें केलें व शके १८५० मध्यें यांनीं अग्निहोत्र घेतलें. गोळपची वेदशाळा बंद पडली होती, ती यांनीं सन १९२१ पासून पुनः चालू करविली. प्रसिद्ध राम दीक्षित बापट यांनीं गोळप, सातारा व पुणें येथें यज्ञ केले. त्या तिन्ही यज्ञांत वे. गोविंद दीक्षित हे अध्वर्यु होते. श्रीनारायणमहाराज केडगांवकर यांचा यांना आश्रय होता व केडगांवास ते कांहीं वर्षें राहिलेही होते.

वे. गोविंद दीक्षितांच्या भार्येचें नांव यशोदाबाई. या डोंगरच्या गोखले घराण्यांतील होत्या. यांना पांच पुत्र व एक कन्या अशी संतति झाली. यांपैकीं कृष्ण यांनीं क्रमान्त अध्ययन केलें असून ते गोळपेस असतात.

वे. गोविंदभटजी शके १८५४ मध्यें वारले.

• • •

## ७६ : वे. शा. सं. धुंडिराज गणेश बापट दीक्षित

### पुणें

यांच्या घराण्याचें मूळगांव गोळप, ता. रत्नागिरी हें होय. तेथून धुंडिराज-शास्त्री यांचे पणजोबा नीळकंठ अनंत ( यांची माहिती या पुस्तकाच्या पहिल्या भागांत दिली आहे ) हे पेशवाईत कांहीं वर्षें पुण्यास आले होते. नंतर चिंचणी,

सावळगी, पांचवड येथें या कुटुंबाचें वास्तव्य होऊन, शेवटीं धुंडिराजशास्त्री पुण्यास पुनः राहण्यास आले. या घराण्यांत प्राचीन विद्यासंपन्नता आणि धार्मिक आचार परंपरेनें चालत आला आहे. धुंडिराजशास्त्र्यांपर्यंत सात पिढ्या घरांत अग्निहोत्र होतें व त्यांच्या घराण्यांत यज्ञयागादि मोठीं कृत्यें होत आलेलीं आहेत.

वे. शा. सं. धुंडिराजशास्त्री यांचा जन्म सन १८८२ मध्यें पांचवडास झाला. वडिलांचें नांव गणेश अनंत व मातेचें नांव गंगाबाई पिता परशुराम मेहेंदळे, औंध. वे. गणेशभटजी हे पांचवडास वैदिक व श्रौती होते. ते धुंडिराजशास्त्र्यांच्या वयाच्या सातव्या वर्षी वारले. नंतर धुंडिराशास्त्र्यांनीं स्वतःचे आजोबा अनंत नीळकंठ यांच्या जवळ कृष्णयजुर्वेदाचें क्रमान्त अध्ययन केलें. वेदाध्ययन चालू असतानांच प्रथम माहुलीचे कृष्णशास्त्री गोडबोले यांच्याजवळ व नंतर वांईचे वासुदेवशास्त्री पटवर्धन यांचेजवळ त्यांनीं संस्कृतचें अध्ययन केलें. श्रौतविद्या व स्मार्त याज्ञिक या विषयांचें ज्ञान अनंत दीक्षितांकडूनच त्यांना मिळालें. इतर अनेक विषयांत धुंडिराजशास्त्र्यांची गति असली तरी मुख्यतः श्रौतविद्येंतच त्यांचें मन आजन्म रमलें. वयाच्या २१ व्या वर्षी त्यांनीं कोल्हापुरास सोमयागांत प्रथमच आध्वर्यव केलें व नंतर ठिकठिकाणीं झालेल्या १०।१५ यज्ञांत भाग घेतला. शके १८४४ मध्यें त्यांनीं अग्निहोत्र घेतलें व शके १८४६ मध्यें श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि यांच्या आश्रयानें औंधास स्वतः अग्निष्टोम यज्ञ केला. नंतर शके १८५२ मध्यें इंदुरास साग्निचित्य सर्वपृष्ठातोर्याम याग व शके १८५६ या वर्षी पांचवडास चातुर्मास्य याग धुंडिराज दीक्षित यांनीं केला. शेवटीं शके १८७६ मध्यें पुण्यास त्यांच्याकडून वाजपेय यज्ञ झाला. त्याचा गाजावाजा खूप होऊन, एकंदर प्रयोग व समारंभ चिरस्मरणीय असा झाला.

धुंडिराज दीक्षित यांनीं सन १९२० सालीं ‘ स्वाध्याय ’ या नांवाचें मासिक सुरू करून तें दोन वर्षे चालविलें. त्यांचें लेखन अनेकविध असून, त्यापैकीं पुष्कळ प्रकाशित झालेलें आहे. ‘ आर्यांचे संस्कार ’, ‘ वैदिक राष्ट्रधर्म ’, ‘ टेंबे स्वामी यांचें ओंवीबद्ध चरित्र ’, ‘ वैदिक संगीत ’ हीं पुस्तकें व ‘ ऐतरेय ब्राह्मण ’, ‘ शुक्लयजुर्वेदीय माध्यंदिन संहिता ’ या ग्रंथांचें त्यांनीं केलेलें मराठी

भाषांतर प्रसिद्ध झालेलें आहे. तैत्तिरीय संहिता व ब्राह्मण यांचें भाषांतर त्यांनीं केलें आहे, पण ते अद्याप अप्रकाशित आहे. पुण्याच्या वैदिक संशोधन मंडळानें श्रौतकोश तयार करण्याच्या कामीं त्यांना मुख्य संपादक नेमलें होतें, व त्यांत त्यांनीं महत्त्वाचें काम केलें. ‘ज्ञानकोशां’तील ‘वेदविद्या’ हा खंड तयार करण्यांत धुंडिराज दीक्षितांचा मोठा वांटा होता.

धुंडिराज दीक्षित हे प्रभावी वक्ते होते व इंदूर, बडोदें, धार इ. संस्थानांतून व इतर मोठ्या शहरांतून त्यांनीं वैदिक धर्मावर व्याख्यानमाला गुंफिल्या होत्या.

धुंडिराज दीक्षितांचा नाट्याभिनयाशींहि निकटचा संबंध आला होता. पांचवडास सोशल क्लब या नांवाची नाट्यसंस्था इतर सहकाऱ्यांबरोबर काढून त्यांनीं नाट्यप्रयोगांत कामें केलीं. नंतर कै. अच्युतराव कोल्हटकर यांच्या ‘नारिंगी निशाण’ संस्थेंतहि त्यांनीं रंगभूमीवर कांहीं भूमिका केल्या. कै. न. चिं. केळकर यांनीं परावृत्त केल्यामुळें ते रंगभूमि सोडून परत श्रौतविद्येकडे वळले.

डॉ. केतकर यांच्या ‘ज्ञानकोशमंडळां’त ते सुमारें दोन वर्षें होते. डॉ. केतकर यांनींच त्यांना ‘श्रौताचार्य’ ही पदवी दिली व त्या पदवीनेंच शेवटपर्यंत धुंडिराज दीक्षितांचा उल्लेख होई. पुरीचे श्रीशंकराचार्य व डॉ. कूर्तकोटी यांनीं त्यांना अनुक्रमें ‘महामहोपाध्याय’ व ‘श्रौतचूडामणि’ अशा पदव्या देऊन गौरविलें.

धुंडिराज दीक्षितांच्या जीवनांत पुष्कळ विवाद्य प्रश्नहि उपस्थित झाले. त्यांनीं औंधास केलेला पहिला यज्ञ सपशु केला व पुढचे यज्ञ अपशु केले. त्याबाबत औंध व इंदूर येथें वादविवाद मोठे कडाक्याचे झाले. त्रैवर्णिकास वेदाधिकार असल्यानें, त्यांनीं मराठा ज्ञातींतील मुलांच्या मुंजी लाविल्या व त्यांना संध्या शिकविण्याचा प्रयत्न केला; युरोपियन व अमेरिकन पंडितांना स्वतःच्या होमशाळेंत बसवून त्यांनीं त्यांना यजनकर्म करून दाखविलें; धर्मनिर्णय-मंडळाच्या प्रयोग-समितीवर त्यांनीं काम केलें; इ. कारणांनीं सनातनी मताच्या पुष्कळ पंडितांकडून त्यांना त्यांच्या विद्वत्तेला अनुरूप असा आदर दर्शविला जात नसे. याजुषहौत्रप्रकरणीं कै. भाऊशास्त्री लेले प्रभृतींशीं ते सहमत न झाल्यानें, त्या पक्षाचाहि धुंडिराज दीक्षितांशीं विरोध होता. हे

सत्याषाढ सूत्री होते तरी त्यांनीं बौधायन सूत्रावर विशेष परिश्रम केले होते; व जेथें जेथें त्यांनीं आध्वर्यव केलें तेथें बौधायन सूत्रानुसार परिग्रह केल्यानें, त्या सूत्रानुसारच ते प्रयोग झाले.

धुंडिराज दीक्षितांच्या पहिल्या पत्नीचें नांव यशोदाबाई पिता नारायण रामचंद्र चापेकर, बावधन. दुसरी भार्या–लक्ष्मीबाई पिता सीताराम बाळकृष्ण केळकर, विजापूर. तिसरी भार्या–लक्ष्मीबाई पिता रामचंद्र विष्णु जोशी, सातारा. तिसऱ्या कुटुंबास पांच कन्या व चार पुत्र आहेत.

धुंडिराज दीक्षित सन १९५६ मध्यें पुण्यास वारले.

● ● ●

## ७७. वे. पांडुरंग परशुराम बापट

### धुळें

यांचा जन्म शके १८२१ मध्यें राजापूर तालुक्यांतील गोवळ या गांवीं झाला. यांचे वडील वे. परशुराम कृष्ण हे मुंबईस प्रसिद्ध वैदिक होते. यांच्या मातेचें नांव मथुराबाई पिता नारायण गोखले. वे. पांडुरंगभटजी यांनीं कृष्ण-यजुर्वेदाचें क्रमान्त अध्ययन त्यांचे चुलते वे. गणेश कृष्ण बापट यांच्याजवळ धुळ्यास केलें. नेहमीचें वास्तव्य धुळ्यास असून तेथें पौरोहित्य करतात.

यांच्या पत्नीचें नांव गंगाबाई पिता रामचंद्र रघुनाथ भुस्कुटे, कुवेशी. यांना चार मुलगे व दोन मुली अशीं अपत्यें आहेत.

● ● ●

## ७८ : वे. विष्णु धोंडदेव बापट दीक्षित

### गोळप

यांचा जन्म शके १७९९ मध्यें गोळप जि. रत्नागिरी येथें झाला. यांचे वडील धोंडदेव कृष्ण हे गोळप येथें वैदिक व अग्निहोत्री होते. मातेचें नांव

सत्यभामाबाई पिता लेले, गोळप. वे. विष्णुभटजी यांनीं कृष्णयजुर्वेदाचें क्रमान्त अध्ययन वे. पालकर गुरुजी यांच्याजवळ स्वतःच्या वयाच्या १६ व्या वर्षी संपविलें. कोल्हापूर, सांगली, मिरज, इंदूर इ. ठिकाणीं वेदपरीक्षा दिल्या, व कांहीं ठिकाणीं क्रमाचीं पारायणेंहि केलीं. वे. विष्णुभटजी यांना श्रौताचीहि माहिती होती. केडगांव येथें श्रीनारायणमहाराज यांच्याजवळ यांनीं प्रौढपणीं १९ वर्षें वास्तव्य केलें. महाराजांचा त्यांना आश्रय होता. मृत्यूपूर्वी ६।७ वर्षें ते गोळप येथें जाऊन राहिले होते.

वे. विष्णुभटजी यांच्या भार्येचें नांव लक्ष्मीबाई पिता कृष्णाजी धोंडदेव लेले, सोलगांव. यांना विनायक, दामोदर, वामन व नारायण असे चार पुत्र असून, त्यांचेपैकीं वामन हे क्रमान्त वैदिक पुण्यास असतात.

वे. विष्णुभटजी हे गोळप येथें शके १८७९ मध्यें वारले.

● ● ●

## ७९ : वे. गणेश ( दाजी ) विश्वनाथ बेहेरे

### चिखलें.

यांचा जन्म सन १८६४ चे सुमारास झाला. यांच्या वडिलांचें नांव विश्वनाथ त्र्यंबक व मातेचें नांव पार्वतीबाई. वडिलांचा व्यवसाय खासगी नोकरीचा होता. वे गणेशभटजींनीं ऋग्वेदाचें क्रमान्त अध्ययन वे. बाळंभटजी भाऊ काळे यांच्याजवळ कर्जत तालुक्यांतील तिवरें या गांवीं १२।१३ वर्षें राहून केलें. तिवऱ्यास श्रीमंत दादासाहेब जोशी, इनामदार यांच्या आश्रयानें ते राहात असत. वेदाध्ययन संपल्यानंतर त्यांचें वास्तव्य पनवेल तालुक्यांतील चिखलें या गांवीं होतें. तेथें त्यांचें अखंड वेदाध्यापनाचें कार्य चालू असे. त्यांच्याकडे पुष्कळ विद्यार्थी शिकून गेले. त्यांत कै. पद्माकर विठ्ठल जोशी, चिखलें; कै. विष्णु रामचंद्र बेहेरे, चिखलें; कै. नीळकंठ गोविंद पाटणकर, चिखलें; सीताराम वासुदेव खांबेटे, कोळथरें; प्रभृती शिष्य प्रमुख होते.

वे. गणेशभटजींच्या भार्येचें नांव सरस्वतीबाई पिता रामचंद्रभटजी लागू, पळस्पें. यांना कृष्णाजी व सदाशिव असे दोन पुत्र झाले. कृष्णाजी हे

चिखल्यास भिक्षुकी करतात. सदाशिव अल्पवयांत वारले.

वे. गणेशभटजी शके १८३७ मध्यें वारले.

● ● ●

## ८० : वे. विठ्ठल दुर्गाराम बोरकर

### खांडेपार (गोंवा)-पुणें

यांचा जन्म शके १८२३ मध्यें गोव्यांत झाला. यांचे वडील वे. दुर्गाराम पांडुरंग हे फोंडा तालुक्यांतील खांडेपार येथें भिक्षुकी करीत. मातेचें नांव सावित्रीबाई पिता विष्णु लक्ष्मण जांभळे, चेतोडें. वे. विठ्ठलभटजी यांनीं बोरी-शिरोडें येथें वे. नारायणभटजी पाटील यांच्याजवळ ऋग्वेदाचें प्राथमिक अध्ययन केलें. नंतर वे. नारायणभटजी पाटील व वे. शा. सं. गोविंद लक्ष्मण उपाध्ये यांनीं मुष्टि फंडावर केरी येथें वेदशाळा काढली होती, त्या शाळेंत जाऊन संहितेचें व याज्ञिकाचें अध्ययन केलें. पुढें वयाच्या १४ व्या वर्षी सांगलीस येऊन, सरकारी वेदशाळेंत वे. काशीनाथभटजी केळकर यांच्याजवळ पदांचें अध्ययन केलें. नंतर पुण्यास वैदिक धर्माश्रमांत येऊन वे. हरि बाजी आगाशे यांच्याजवळ क्रमान्त अध्ययन पूर्ण केलें. वे. शा. सं. विनायक पशुराम फडके गुरुजी यांच्याजवळ संस्कृतचेंही अध्ययन केलें. गेलीं ९ वर्षे श्री. आबासाहेब पटवर्धन यांनीं पुण्यास काढलेल्या वेदशाळेंत वेदाध्यापक म्हणून काम करीत आहेत.

वे. विठ्ठलभटजींच्या पत्नींचें नांव राधाबाई पिता गोविंद पांडुरंग आमशेकर. यांना चार पुत्र व एक कन्या अशी संतति आहे. मुलांचें वेदाध्ययन चालूं आहे.

● ● ●

## ८१ : वे. वासुदेव हरि भातखंडे

**नागाव**

यांचा जन्म शके १८४३ मध्यें झाला. यांचे वडील हरि वामन हे वैदिक होते. मातेचें नांव लक्ष्मीबाई पिता गोविंद नारायण फडके, नागोठणें. वे. वासुदेव भटजींचें ऋग्वेदाच्या संहितेपर्यंत अध्ययन घरीं वडिलांजवळ झालें. नंतर पदांपर्यंतचें अध्ययन घनपाठी वे. विनायकभटजी केळकर यांच्याकडे झालें. पुढें सांगलीच्या वेदशाळेंत शिक्षणाकरतां जाऊन, वैदिकचूडामणि काशीनाथभटजी केळकर यांच्याजवळ दशग्रंथांचें अध्ययन पूर्ण केलें. पुन्हां वे. विनायकभटजी केळकर यांच्याकडे येऊन जटा व घनाचें अध्ययन चार वर्षांत पूर्ण केलें. जटा–घनाच्या अभ्यासाच्या वेळीं पुण्याच्या वे. शा. सभेकडून दरमहा रु. १० प्रमाणें व अष्टागर प्रांतीय वे. शा. सभेकडून दरमहा रु. ५ प्रमाणें शिष्यवृत्त्या मिळत होत्या. वे. वासुदेवभटजी यांनीं पुण्याच्या वे. शा. सभेची दशग्रंथाची व नंतर जटा व घनाची परीक्षा दिलेली आहे. तसेंच इंदूर व बडोदा येथीलही परीक्षा दिल्या आहेत.

वे. वासुदेव भटजींनीं पुढें लिहिलेलीं पारायणें केलीं:—

१. नागांव येथील भीमेश्वर मंदिरांत क्रमपारायण. २. इंदूर येथें पट्टाभिराम मंदिरांत ॲंपूर्वक पदपारायण. ३. नागांव येथील भीमेश्वर मंदिरांत जटापारायण. ४. पुणें येथें कसब्याच्या गणपति–मंदिरांत जटापारायण. ५. मुंबई येथें फडके गणपति मंदिरांत घनपारायण. ६. पुणें येथें कसब्याचे गणपति–मंदिरांत घनपारायण.

वे. वासुदेवभटजींच्या पत्नीचें नांव इंदिराबाई पिता रामचंद्र गणेश काळे, चौल. यांना तीन मुलगे व तीन कन्या आहेत.

● ● ●

## ८२ : वे. सखाराम महादेव भावे

### पेण

यांचा जन्म शके १७९६ चे सुमारास झाला. यांचें घराणें मूळचे कुलाबा जिल्ह्यांतील वरसई या गांवचें. वे. सखारामभटजींचे वडील महादेव गणेश हे वैदिक असून वरसईस भिक्षुकी व शेती करीत. नंतर श्रीमंत जोशी (पोतनीस) यांच्या आश्रयानें ते वरसई सोडून पेण येथें राहाण्यास आले. वे. सखाराम भटजींच्या मातेचें नांव पार्वतीबाई. सखाराम भटजी यांनीं ऋग्वेदाचें सुरुवातीचें अध्ययन वे. नरूदादा जोगळेकर यांच्याजवळ केलें व पदांपर्यंतचें अध्ययन वे. विठ्ठलभटजी सहस्रबुद्धे यांच्याजवळ केलें. पुढें घनान्त अध्ययन स्वतः परिश्रम करून पूर्ण केलें. नंतर श्रौतविद्या, ज्योतिष व संस्कृत या विषयांचें अध्ययन करून, सखारामभटजी यांनीं धर्मशास्त्राचेंही उत्तम परिशीलन केलें होतें. असा चतुरस्र विद्वान त्यांच्या काळांत त्या बाजूस नव्हता. काशी येथील बनारस विश्वविद्यालयाच्या वास्तुशांतीच्या वेळीं पं. मदनमोहन मालवीय यांनीं निवडक विद्वान मंडळींत वे. सखारामभटजी यांना निमंत्रण दिलें होतें व त्याप्रमाणें ते गेले होते. स्वाहाकाराकरतांही त्यांना अनेक ठिकाणीं बोलावीत. बडोद्यास त्यांनीं परीक्षा दिली त्या वेळीं त्यांना महावस्त्र देण्यांत आलें होतें. वे. सखारामभटजी यांच्या भार्येचें नांव आनंदीबाई पिता मोरेश्वर हरि सहस्रबुद्धे, किहीम. यांना तीन मुली व श्रीधर व सदाशिव असे पुत्र झाले. वे. सदाशिवभटजी पेणेस भिक्षुकी करतात. वे. सखारामभटजी शके १८४९ मध्यें वारले.

## ८३ : वे. भास्कर विष्णु भिडे

### पुणें

यांचा जन्म शके १८१० मध्यें केळवडें येथें झाला. त्यांच्या वडिलांचें नांव विष्णु गणेश. मातेचें नांव सत्यभामाबाई पिता नारायण परशुराम घारपुरे,

पुणें. वे. भास्करभटजी यांनीं कृष्णयजुर्वेदाच्या पंचग्रंथांचें अध्ययन घरीं वडिलांजवळ केलें नंतर पुण्याच्या वे. शा. सभेची शाखेची परीक्षा दिली. कोल्हापूर येथीलही परीक्षा दिली होती. श्रौताचाहि अभ्यास करून सांगली येथील नातूंच्या सर्वतोमुख यज्ञांत ब्राह्मणाच्छंसी प्रयोग केला. तसेंच केळवड्यास वडिलांनीं केलेल्या यज्ञांत नेष्ट्रत्व प्रयोग केला. गांधीहत्येनंतर झालेल्या जाळितांत घर गेल्यानें वे. भास्करभटजी कायमचें पुण्यास राहूं लागले. त्यांनीं स्वतः स्मार्ताग्नि ठेविला होता.

वे. भास्करभटजींच्या पहिल्या पत्नीचें नांव पार्वतीबाई पिता गणेश काशीनाथ भावे. दुसरी भार्या–पार्वतीबाई पिता गंगाधर चिंतामण सोमण. वे. भास्कर भटजींना तीन मुलगे आहेत.

वे. भास्करभटजी शके १८८१ मध्यें वारले.

● ● ●

## ८४ : वे. विश्वनाथ नारायण भिडे

### पुणें.

यांच्या घराण्याचें मूळगांव रत्नागिरी जिल्ह्यांतील निवेंडी हें होय. या घराण्याची वस्ती नंतर केळवड्यास पुष्कळ वर्षें झाली. गांधीवधानंतर घर जाळित झाल्यामुळें तेव्हांपासून पुण्यास राहातात. आहिताग्नि विश्वनाथभटजी यांचा जन्म केळवड्यास शके १८०७ मध्यें झाला. यांच्या वडिलांचें नांव नारायण गणेश व मातेचें नांव अन्नपूर्णाबाई. वे. विश्वनाथभटजी यांनीं कृष्णयजुर्वेदाच्या पंचग्रंथांचें अध्ययन त्यांचे चुलते विष्णु दीक्षित यांच्याजवळ केलें व श्रौताचाहि अभ्यास केला. सुमारें १८ वर्षांपूर्वीं यांनीं अग्निहोत्र घेतलें. सांगली येथील नातूंचे यज्ञांत व केळवडें येथील यज्ञांत यांनीं आग्नीध्र प्रयोग केला. शके १८८० मध्यें यांनीं ज्योतिष्टोम नांवाचा सोमयाग पुण्यास केला.

वे. विश्वनाथ दीक्षित यांच्या पत्नीचें नांव दुर्गाबाई पिता परशुराम भगवान लिमये. यांना वामन व विद्याधर असे दोन पुत्र आहेत. यांच्यापैकीं

विद्याधर हे एम्. ए. व याज्ञिकचूडामणि असून, पुण्याच्या वैदिक संशोधन मंडळांत काम करता[.

• • •

## ८५ : वे. रामकृष्ण नारायण मराठे

### मिरज

यांचा जन्म शके १८१७ मध्यें मिरजेस झाला. याचें घराणें मिरजेस वेदावेद्य-करतां चार पिढ्यांपासून प्रसिद्ध आहे. यांचे वडील नारायण चिंतामणि हेहि वैदिक होते. मातेचें नांव राधाबाई. वे. रामकृष्णभटजी दोन वर्षांचे होण्याचे आंतच त्यांचे आईवडील वारले. नंतर त्यांचें संगोपन त्यांची आजी व मामा गोविंद रावजी बर्वे यांनीं केलें. वे. रामकृष्णभटजी यांनीं ऋग्वेदाचें संपूर्ण अध्ययन मिरजेच्या वेदशाळेंत वे. बाळंभट काळे यांच्याजवळ केलें. पुण्याच्या वेदशास्त्रोत्तेजक सभेंत व इंदूर, कोल्हापूर इ. ठिकाणीं यांनीं जटा – घनाच्या परीक्षा दिल्या. श्रीमंत मिरजकर यांचा त्यांना आश्रय होता. शके १८४४ पासून मिरज येथील वेदशाळेवर गुरुजी म्हणून त्यांची नेमणूक करण्यांत आली होती. यांना भाऊभटजी या नांवानेंही लोक ओळखत.

वे. रामकृष्णभटजी यांनीं शके १८४६ मध्यें मिरजेस क्रमाचें पारायण केलें. नंतर शके १८४९ मध्यें जटेचें व शके १८५४ मध्यें घनाचें पारायण त्यांनीं मिरजेसच केलें. या कामीं श्रीमंत बाळासाहेब मिरजकर यांचें त्यांना प्रोत्साहन व मदत होती. या पारायणांच्या प्रसंगीं श्रीमंतांनीं वे. रामकृष्णभट यांचा सत्कारहि उत्तम प्रकारें केला. घनपारायणाच्या वेळीं श्रीशंकराचार्यांकडून त्यांना जरीचें महावस्त्र देऊन गौरविण्यांत आलें. वे. रामकृष्णभटजी यांनीं स्वतःचे घरीं शके १८५५ मध्यें ऋक्संहिता – स्वाहाकार मोठ्या समारंभानें केला. यांनीं तीन वेळां काशीयात्रा व चारही धामांच्या यात्रा केल्या होत्या. तें एकदां नेपाळांतही गेले होते.

वे. रामकृष्णभटजींच्या भार्येचें नांव गंगाबाई पिता वासुदेव सदाशिव जोग, भिलवडी.

वे. रामकृष्णभटजी शके १८६६ मध्यें वयाच्या पन्नाशींच्या आंतच वारले.

● ● ●

## ८६ : वे. कृष्ण दीक्षित चिंतामणि महाडकर
### काशी

यांचा जन्म सन १८६२ मध्यें झाला. यांच्या वडिलांचें नांव चिंतामणि राजाराम. वे. कृष्ण दीक्षित यांनीं ऋग्वेदाचं अध्ययन वे. बाळ दीक्षित काळे यांच्याजवळ केलं. वे. कृष्ण दीक्षित यांचा आवाज अत्यंत मधुर पण मोठा होता. गेल्या पन्नास वर्षांत पट्टी गाजविणारा असा वैदिक काशींत झाला नाहीं असा यांचा लौकिक सांगतात. पुण्याच्या श्रीमंत नातूंचे हे काशींतील उपाध्ये होते.

वे. कृष्ण दीक्षितांच्या पत्नीचें नांव रुक्मिणीबाई पिता चिंतामणि भास्कर शिदोरे. यांच्या पांच पुत्रांपैकीं मोठे चिरंजीव कै. दामोदर दीक्षित हे वैदिक होते व त्यांनीं जटेचें पारायणही केलें होतें.

वे. कृष्ण दीक्षित सन १९२७ मध्यें वारले.

● ● ●

## ८७ : वे. गोविंद रामकृष्ण मांडवगणे
### सांगली


यांचा जन्म शके १८२२ चे सुमारास झाला. वडील रामकृष्ण हे शास्त्री होते. यांचें वास्तव्य प्रथम ब्रह्मावर्तास असे. तेथून वडिलासह निघून वे. गोविंदभटजी इंदुरास आले, व तेथें त्यांनीं ऋग्वेदाचें थोडें अध्ययन केलें. नंतर अकोला येथें वे. दत्तंभटजी जोशी यांच्याजवळ कांहीं अध्ययन झालें.




वे. विनायक विठ्ठल फणसळकर (पृ. ६७)




वे. शा. सं. धुंडिराज गणेश बापट
(पृ. ७०)




वे. रामकृष्ण नारायण मराठे (पृ. ७९)



वे. सखाराम बाळकृष्ण येडूरकर
(पृ. ८३)



वे. नीळकंठ गोविंद वाटवे (पृ. ८९)



वे. मुरलीधर वासुदेव शेंड्ये (पृ. ९०)



वे. बाळकृष्ण महादेव सप्रे (पृ. ९२)

अकोला सोडून ते सातार्‍यास आले व बापूभटजी शेवडे यांच्याजवळ वे. गोविंदभटजी यांनीं उपग्रंथ म्हटले. उपग्रंथ संपल्यावर ते सांगलीस राहूं लागले व वे. काशीनाथभटजी केळकर यांच्याजवळ त्यांनीं क्रम व जटा यांचें अध्ययन पूर्ण केलें. केळकर गुरुजी निवृत्त झाल्यानंतर शके १८६० मध्यें सांगलीच्या सरकारी वेदशाळेवर मुख्य गुरुजी म्हणून वे. गोविंदभटजींची नेमणूक झाली व तें काम त्यांनीं अखेरपर्यंत केलें. सांगलीच्या गणपतीच्या देवळांत शके १८५८ मध्यें त्यांनीं जटेचें पारायण केलें. पुण्याच्या वे. शा. सभेची त्यांनीं दशग्रंथाची व जटेची परीक्षा दिली होती. वेदाध्ययनाखेरीज त्याचा संस्कृतचाही व्यासंग होता.

वे. गोविंदभटजी शके १८७९ मध्यें वारले.

● ● ●

## ८८ : वे. वामन नारायण मेहेंदळे

### पुणें

यांचा जन्म शके १८१७ मध्यें पनवेल येथें झाला. यांचे वडील वे. नारायण भास्कर हे वैदिक असून, खासगी वेदशाळा चालवीत. नित्य १२०० नमस्कार घालण्याचा त्यांचा परिपाठ होता. वे. वामनभटजींच्या मातेचें नांव सावित्री-बाई पिता वासुदेवराव दांडेकर. वे. वामनभटजींनीं कृष्णयजुर्वेदाचें अध्ययन प्रथम पनवेल येथें वे. गोपाळभटजी गोखले यांच्याकडे व नंतर पुण्यास वे. लक्ष्मणभटजी विनोद व वे. अण्णाभटजी अभ्यंकर यांच्याजवळ केलें. नंतर पुण्याच्या वेदशास्त्रोत्तेजक सभेंत आणि सांगली, मिरज, कोल्हापूर, रामदुर्ग, इंदूर येथें वेदपरीक्षा दिल्या. यात्रेनिमित्त प्रवासहि बराच झाला होता.

वे. वामनभटजींच्या पत्नीचें नांव गंगाबाई पिता बाळकृष्णपंत बर्वे, पनवेल. यांना एक पुत्र व चार कन्या अशीं अपत्यें आहेत.

वे. वामनभटजी शके १८७८ मध्यें वारले.

● ● ●

## ८९ : वे. त्र्यंबक लक्ष्मण (दाजी) मंजूळ

### पंढरपूर

यांचा जन्म शके १८०६ मध्यें झाला. यांचे वडील वे. दाजीभटजी व आजोबा वे. भिकंभटजी हे पंढरपुरास वैदिक होते. वे. त्र्यंबकशास्त्री यांनीं कण्वशाखेचें घनान्त अध्ययन घरीं वडिलांजवळच केलें. श्रौताचेंहि ज्ञान होतें. शके १८२८ मध्यें त्यांनीं पंढरपुरास घनाचें पारायण केलें, त्या वेळीं बडवे मंडळींनीं त्यांचा मोठा सत्कार केला. त्यांनीं घरीं सुमारें ४० वर्षं अग्निहोत्र ठेविलें होतें. वेदशास्त्रोत्तेजक सभेनें त्यांना वेदपरीक्षक म्हणूनहि नेमलें होतें.

वे. त्र्यंबकशास्त्री यांची बुद्धि सर्वगामी होती. ते पुराण सांगणें, कीर्तन करणें व भजन म्हणणं या गोष्टी अत्यंत रसाळपणें करीत. त्यांचा फलज्योतिष व सामुद्रिक शास्त्राचाहि चांगला अभ्यास होता. पंढरपुरास झालेल्या एका फलज्योतिष परिषदेचे ते स्वागताध्यक्ष निवडले गेले होते. पुण्याचे पं. द्रविड यांचेकडून त्यांनीं कांहीं सामांचीहि माहिती घेतली होती व तीं सामें वे. त्र्यंबकशास्त्री म्हणत असत. यांनीं पंढरपुरास 'श्रीकण्वमहर्षि' या नावाची संस्था स्थापन करून, त्या संस्थेंत वेदशिक्षणाची सोय केली.

वे. त्र्यंबकशास्त्री यांना संकेश्वरच्या श्रीशंकराचार्यांकडून 'वैदिकमुकुटमणि' ही पदवी देण्यांत आली होती. तसेंच, पंढरपूर येथें सत्कार-मंडळ स्थापन होऊन पं. धारूरकर यांच्या हस्तें शके १८६५ मध्यें त्यांचा प्रकट सत्कार करण्यांत आला.

वे. त्र्यंबकशास्त्री यांनीं वेदाध्यापनाचेंहि काम केलें. धारवाड येथील वेद-शाळेवरील गुरुजी वे. तम्मण्णाशास्त्री यांचें अध्ययन वे. त्र्यंबकशास्त्री यांच्या-कडेच झालें आहे.

वे. त्र्यंबकशास्त्री यांचे पुत्र वे. शा. सं. कीर्तनरत्न बाबूराव मंजूळ हे होत. वे. त्र्यंबकशास्त्री शके १८७४ मध्यें वारले.

• • •

## ९० : वे. सखाराम बाळकृष्ण येडूरकर

### कुरुंदवाड

यांचा जन्म शके १८०९ मध्यें येडूर, ता. चिकोडी येथें झाला. यांच्या घराण्यांत वैदिकांची परंपरा मोठी आहे. यांचे आजोबा वे. सखाराम नरहर कागलकर हे प्रसिद्ध वैदिक होते व त्यांचा परिचय या पुस्तकाच्या पहिल्या खंडांत दिला आहे. जोशीपणाची वृत्ति नको म्हणून वे. सखारामभटजी कागल सोडून येडुरास व नंतर नरसोबाचे वाडीस राहाण्यास आले व तेव्हांपासून येडूरकर हें आडनांव रूढ झालें. वे. सखाराम बाळकृष्ण यांच्या वडिलांनीं शाखाध्ययन केलें होतें व ते शेती करीत. मातेचें नांव ताराबाई पिता श्रीपादभटजी एकसंबेकर. वे. सखारामभटजी यांनीं ऋग्वेदाच्या संहितेचें अध्ययन वडिलांजवळ केलें. नंतरचें अध्ययन नरसोबाचे वाडीस वे. बाळंभटजी दत्तात्रय दामले यांच्याजवळ केलें. या वेळीं वे. बाळंभट पुजारी, वासुदेवभट जोशी, कल्होळकर व अनंतभट जोशी येडूरकर हे त्यांचे सहाध्यायी होते. प. प. वासुदेवानंदसरस्वती ( टेंबेस्वामी ) यांच्याजवळ वे. सखारामभटजींनीं आरण्यक म्हटलें व सर्वानुक्रमाची माहिती घेतली. त्यांच्याच कृपेनें वे. सखारामभटजींस ऋक्संहितेंतील कोणत्याहि मंत्राची देवता सांगतां येते.

वे. सखारामभटजींनीं पुण्याच्या वे. शा. सभेची दशग्रंथाची परीक्षा शके १८४३ मध्यें दिली. वे. सखारामभटजींनीं अनेक ठिकाणीं पारायणें केलीं, त्यांपैकीं कांहीं ठळक पारायणें पुढीलप्रमाणें :—

१. शके १८३८ मध्यें कोल्हापुरास देवीच्या देवळांत जटापारायण.

२. शके १८४२ मध्यें कोल्हापुरास श्री. दत्तोपंत पराडेकर यांनीं यांचें दशग्रंथांचें पारायण स्वतःच्या घरीं केलें. श्री. परांडेकर स्वतः हातात पोथी घेऊन श्रवणास बसले होते. नंतर त्यांनीं वे. सखारामभटजींस प्रतिवर्षी शंभर रुपये उत्पन्न येणारी जमीन घेऊन दिली.

३. शके १८४५ मध्यें औरवाड येथें दत्तमंदिरांत जटापारायण.

४. शके १८४५ मध्यें मोरगांवास दशग्रंथ-पारायण.

५. शके १८५० मध्यें इचलकरंजीस गणपतिमंदिरांत श्रौतसूत्रांचें पारायण रात्रीं केलें. या वेळीं योगीराज विनायकबुवा फाटक यांनीं एक तोळा सोन्याची आंगठी व जरीचें धोतर व रुमाल देऊन सत्कार केला.

६. शके १८५२ मध्यें जुन्नरास वे. शा. सं. विठ्ठलशास्त्री देव यांच्याकडे दशग्रंथ–पारायण केलें.

शके १८५५ मध्यें वातविकार होऊन कांहीं दिवस यांच्या जिभेवर परिणाम झाला होता. तेव्हांपासून डॉक्टरच्या सल्ल्यावरून वे. सखारामभटजी यांनीं पारायणें करणें व पट्टींत जोरानें म्हणणें बंद केलें आहे.

वे. सखारामभटजी यांचे महत्त्वाचे अनेक सत्कारसमारंभ महाराष्ट्रांत व बाहेर झाले आहेत व होत आहेत. सन १९४८ मध्यें पुण्यास भांडारकर ओरिएंटल रीसर्च इन्स्टिटयूटमध्यें प्रा. बेलवलकर, प्रा. रा. ना. दांडेकर यांनीं समारंभ करून सत्कार केला. सन १९५१ मध्यें श्री. शंकर सखाराम दाते यांच्या खटपटीनें पुण्यास टिळक-स्मारक-मंदिरांत प्रकट सत्कार झाला. नागपुरास पं. बाळशास्त्री हरदास यांनीं दक्षिणामूर्ति मंदिरांत मानपत्र देऊन मोठा सत्कार केला. अहमदाबादेस प्रा. आठवले व पं. नारायणशास्त्री वाडीकर यांनींहि मोठा समारंभ करून मानपत्र दिलें. यांच्या षष्ट्यब्दपूर्तीनिमित्त कुरुंदवाड येथें समारंभ होऊन रु. १४०० मंडळींनीं जमविले. पैकीं रु. ७०० वे. शा. सभेकडे उत्तीर्ण विद्यार्थ्यांस यांच्या नांवें पारितोषिक देण्याकरतां ठेवलेले आहेत. पं. सातवळेकर यांनीं पुढाकार घेऊन अनेक ठिकाणीं सत्कार करविले. काशी येथें पंडितराज राजेश्वरशास्त्री द्रविड व. पं. देवनायकाचार्य यांनीं काशी येथील वैदिक व शास्त्रीमंडळी यांच्यासमोर यांचे वेदपठनाचे कार्यक्रम करून शंभर रुपये दक्षणा व रेशमी वस्त्र देऊन सत्कार केला. बडोद्यास शके १८८३ मध्यें पारायण प्रसंगीं श्रीमंत फत्तेसिंह महाराज गायकवाड यांच्या अध्यक्षतेखालीं सत्कार करण्यांत आला. याशिवाय अनेक शहरांतून यांचे सत्कार-समारंभ झाले असून, ५०–६० मानपत्रें मिळालेलीं आहेत. दिल्लीस झालेल्या साहित्यसंमेलनाच्या वेळीं श्री. शं. स. दाते यांनीं वे. सखारामभटजी

यांची राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्याबरोबर भेट करविली. त्या वेळीं राष्ट्रपतींनीं मोठा संतोष व्यक्त केला. सन १९६० मध्यें केंद्रसरकारकडून यांना रु. पंधराशें पुरस्कार म्हणून देण्यांत आले. संकेश्वर, द्वारका व पुरी येथील श्रीशंकराचार्यांकडून यांना अनुक्रमें वेदाचार्य, वैदिकचूडामणि व महामहोपाध्याय अशा पदव्या दिल्या आहेत.

वे. सखारामभटजी यांची स्मरणशक्ति लोकविलक्षण असून, त्या गुणामुळें त्यांचा लौकिक सर्वत्र झालेला आहे. ऋक्संहितेंतील कोठलाहि भाग उलट-सुलट म्हणणें, एकान्तरित म्हणणें, नुसता आंकडा सांगितला असतां तो मंत्र म्हणणें अगर कोठलाहि मंत्र विचारला असतां त्याचा आंकडा सांगणें, वेगवेगळ्या सूक्तांतील मंत्र क्रमानें एकापुढें एक म्हणणें इ. अनेक चमत्कृति वे. सखारामभटजी करून दाखवितात. गीतेंतील श्लोकांबद्दलहि ते असाच प्रकार दाखवितात.

वे. सखारामभटजी यांचं वास्तव्य कुरुंदवाड येथें गेल्या २० वर्षांपासून आहे. यांच्या भार्येचें नांव गोदूबाई पिता कृष्णंभटजी पुजारी, नरसोबाची वाडी. याना शंकर या नांवाचे पुत्र आहेत.

● ● ●

## ९१ : वे. चंद्रशेखर रमणी

### गोकर्ण

यांचा जन्म शके १७९४ च्या सुमारास झाला. यांचें वास्तव्य श्रीक्षेत्र गोकर्ण येथें असे. यांनीं वे. जोगळेकर गुरुजी यांच्याजवळ गोकर्णासच ऋग्वेदाचें क्रमान्त अध्ययन केलें. श्रौताचीहि चांगली माहिती होती. चयनांत वालखिल्य–शस्त्र-पठनांत फार कुशल होते व त्याकरतां त्यांना अनेक ठिकाणचें निमंत्रण दिलें जात असे. वृद्धावस्थेंतहि यांचें अखंड वेदपठण चालू असे. यांचे बंधु म्हैसूर प्रांतांत रामचंद्रपूर येथें हविक ब्राह्मणांचे हव्यकमंडलाधीश्वर शंकराचार्य होते.

वे. रामचंद्रशेखरभटजींच्या भार्येचें नांव सावित्रीबाई. यांना व्यंकटरमण या नांवाचे पुत्र होते. तेहि उत्तम वैदिक तयार झाले होते, पण चंद्रशेखरभटजींच्या हयातींतच ते तरुणपणीं वारले.

वे. चंद्रशेखरभटजी शके १८७४ चे सुमारास वारले.

● ● ●

## ९२ : वे. नीळकंठ त्र्यंबक लेले

### वांई

यांचा जन्म शके १८१३ मध्यें वांईस झाला. यांचे वडील त्र्यंबक रामचंद्र हे वैयाकरणी व धर्मशास्त्री होते. मातेचें नांव उमाबाई पिता गणेश अनंत ओक, वांई. वे. निळंभटजी यांनीं कृष्ण यजुर्वेदाचें क्रमान्त अध्ययन वांईचे वे. शंकरभटजी गोखले यांच्याजवळ केलें. श्रौताचेंही अध्ययन केलें आहे. पुणें वे. शा. सभेची पंचग्रंथांची परीक्षा दिली आहे. कौमुदी म्हटली असून, कीर्तनही करतात. ऋग्वेदाचेंही शाखाध्ययन केलें आहे. वे. निळंभटजी यांनीं सांगली येथील वे. शंकर दीक्षित नातू यांच्या अनेक यज्ञांत व डोंगरच्या गोखले यांच्या यज्ञांत हौत्र केलें आहे. शके १८६० मध्यें वे. निळंभटजी यांनीं अग्निहोत्र घेतलें व शके १८७० मध्यें अग्निष्टोम याग केला. आचारसंपन्न वैदिक म्हणून यांची ख्याती आहे.

वे. निळंभटजी यांच्या पत्नीचें नांव गंगाबाई पिता वामन भास्कर आपटे, वांई. यांना पांच पुत्र व एक कन्या अशी संतति असून, थोरले चिरंजीव विश्वनाथ यांनीं शाखाध्ययन केलें आहे.

● ● ●

## ९३ : वे. वेणीमाधव ( भिकू दीक्षित ) विद्याधर लेले

### काशी

यांचा जन्म शके १७६० चे सुमारास झाला. यांच्या पित्याचें नांव विद्याधर विठ्ठल व मातेचें नांव अन्नपूर्णाबाई. वे. भिकू दीक्षित यांचें कृष्णयजुर्वेदाचें क्रमान्त अध्ययन झालें होतें. श्रौत-स्मार्त कर्माचें उत्तम ज्ञान होतें. यांनीं अग्निहोत्र घेऊन तें चाळीस वर्षे चालविलें व काशींत सोमयागही केला. यांनीं स्वतःच्या वेदशाळेंत पुष्कळ वर्षे अध्यापन करून मोठी शिष्यपरंपरा निर्माण केली. यांच्या वेदशाळेंत सुमारें २०० विद्यार्थी असत. यांच्या शिष्यमालिकेंत वे. कृष्ण दीक्षित बापट, वे. भय्यागुरु बापट, वे. बाळंभटजी खरे, वे. महादेवभटजी गोखले, वे. आण्णाभटजी साठे, वे. गंगाधरभटजी लेले, वे. वासुदेव दीक्षित तोरो, वे. रामभटजी देव प्रभृति वैदिकांची गणना आहे.

वे. भिकू दीक्षितांच्या पत्नीचें नांव आनंदीबाई. या काशी येथील खरे घराण्यांतील होत्या.

वे. भिकू दीक्षित शके १८४० मध्यें वारले.

● ● ●

## ९४ : वे. गणेश बाळकृष्ण वाटवे

### मिरज

यांचा जन्म सन १८४५ च्या सुमारास झाला. यांचें घराणें वैदिकीचें असून, श्रीमंत पटवर्धन मिरजकर यांच्या राजोपाध्यायाचें आहे. वे. गणेश दीक्षित यांचे वडील वे. बाळ दीक्षित हे घनान्त अध्ययन केलेले वैदिक होते. यांच्याजवळ वे. गणेश दीक्षित यांचें ऋग्वेदाचें सर्व अध्ययन झालें. अध्ययन संपल्यावर वे. गणेश दीक्षित यांनीं श्री. जमखंडीकर यांच्याकडे क्रमाचें

पारायण केलें. अध्ययन करतांना वे. गणेश दीक्षित यांचें अरण म्हणण्याचें राहून गेलें होतें तें त्यांनीं वयाच्या ५८ व्या वर्षी मुखोद्गत केलें. पट्टीच्या म्हणण्यांत वे. गणेश दीक्षित यांचा प्रभाव विशेष दिसून येई व त्यामुळें त्यांचा लौकिक सर्वत्र झाला होता. वेदाची आवृत्ति म्हणण्याचें काम त्यांचे सतत चालू असे.

वे. गणेश दीक्षित यांना नाट्य व संगीताची अभिरुचि होती. मिरजेच्या वैदिकांच्या 'समर्थ मंडळा'मार्फत होणाऱ्या सार्वजनिक गणपत्युत्सवांतही ते भाग घेत. स्थापत्यशास्त्रांतही त्यांची स्वाभाविक गति होती. मिरजेच्या वेणाबाईचे मठांतील दुघई सोपा त्यांच्या देखरेखीखालीं बांधला गेला.

यांच्या पत्नी गंगाबाई. या हरिपूरच्या केतकर घराण्यांतील होत्या. त्यांना एक मुलगा व दोन मुली अशीं अपत्यें झालीं. वे. गणेश दीक्षित सन १९०८ सालीं वारले.

● ● ●

## ९५ : वे. चिन्तामणि श्रीपाद दीक्षित वाटवे

### मिरज

यांचा जन्म शके १८१० मध्यें झाला. वडिलांचें नांव श्रीपाद बाळ दीक्षित व मातेचें नांव गिरजाबाई. श्रीपाद दीक्षित हे मिरजेस वैदिक होते. वाटवे घराणें हें श्रीमंत मिरजकरांचे उपाध्यायाचें घराणें आहे. वे. चिंतामण दीक्षितांचे पूर्वज (पणजोबांचे वडील) वे. गोविंद बाळंभट यांनीं शके १७१७ चे सुमारास सांगली येथें विष्णूच्या घाटावर सोमयाग केला, तेव्हांपासून या घराण्यास दीक्षित म्हणूं लागले. सोमयाजी गोविंदभटजी यांना दोन भार्या होत्या व गोविंदभटजी निधन पावले तेव्हां त्या दोघीहि सती गेल्या! मिरजेच्या घाटावर त्या दोघींचे कट्टे होते.

वे. चिंतामणभटजी यांनीं ऋग्वेदाचें क्रमान्त अध्ययन मिरजेच्या वेदशाळेंत वे. विष्णु हरि काळे गुरुजी यांच्याजवळ केलें. सर्व याज्ञिक कृत्येंही करतात. श्रीमंत मिरजकरांचे आश्रित व उपाध्याय आहेत.

वे. चिंतामणभटजींच्या भार्येचें नांव लक्ष्मीबाई पिता नरहर महादेव गोखले, नरसिंहवाडी. यांना दत्तात्रय नांवाचे पुत्र व एक कन्या आहे.

• • •

## ९६ : वे. नीळकंठ ( बापू ) गोविंद वाटवे

### मिरज

यांचा जन्म शके १७९५ मध्यें झाला. त्यांचे वडील गोविंद दीक्षित हे वैदिक व याज्ञिक होते. वे. बापू दीक्षित यांचें ऋग्वेदाचें अध्ययन त्यांचे चुलते वे. आबा दीक्षित याच्याजवळ झालें. वास्तव्य नेहमीं मिरजेस असे.

यांच्या घरीं मिरजेंतील कांहीं वैदिक मंडळी नित्य दुपारीं जमत असत व वेदाची आवृत्ति रोज म्हणण्यांत येत असे. परगांवची वैदिक मंडळी मिरजेस आली असतां वे. बापू दीक्षित स्वतःचे घरीं मुद्दाम मंत्रजागर करीत.

यांची पहिली पत्नी मिरजेच्या आपटे घराण्यांतील होती. दुसरें कुटुंब जांभळीचे अनंतशास्त्री ताम्हनकर यांची मुलगी. दुसरें कुटुंबही वे. बापू दीक्षित यांच्या वयाच्या ३५ वर्षीं वारलें. त्यानंतर विधुरावस्थेंतच वे. बापू दीक्षित यांनीं आपल्या तीन अपत्यांचें संगोपन केलें.

वे. बापू दीक्षित सन १९१६ मध्यें प्लेगनें वारले.

• • •

## ९७ : वे. लक्ष्मण विष्णु विनोद ( मोडक )

### पुणें

यांचा जन्म शके १७९९ मध्यें पेढांबें, ता. अलीबाग, येथें झाला. यांचे वडील विष्णु नारायण हे पेढांबें येथें सावकारी करीत. वे. लक्ष्मणभटजी यांचें कृष्णयजुर्वेदाचें अध्ययन प्रथम पेण येथें वे. वामनभटजी सदाशिव गोखले

यांच्या वेदशाळेंत व नंतर पुण्यास वे. रामभटजी खरे यांच्याकडे झालें. यांनीं श्रौताचेंही अध्ययन केलें होतें. वे. राम दीक्षित बापट यांच्या यज्ञांत व कै. भाऊशास्त्री लेले यांच्या यज्ञांतही यांनीं भाग घेतला होता. वे. लक्ष्मणभटजी यांनीं सुमारें ३० वर्षें घरीं स्मार्ताग्नि ठेविला होता. तसेंच, घरीं खासगी वेदशाळाही चालविली होती. या शाळेंत पुढील विद्यार्थ्यांचें वेदाध्ययन झालें:– १ कै. विनायक साठे, २ कै. वामनभटजी मेहेंदळे, पुणें ३ वे. नाना खरे, पनवेल, ४ वे. वीरेश्वर खरे, जांभुळपाडा ५ वे. केशव दीक्षित आपटे इ. वे. लक्ष्मणभटजी कांहीं दिवस पुण्याच्या आनंदाश्रमांत नोकरी करीत असत.

वे. लक्ष्मणभटजींच्या पत्नीचें नांव गंगाबाई पिता श्रीधर बाळकृष्ण भट, बहिरोळें. यांना चार पुत्र व एक कन्या अशी संतति आहे.

वे. लक्ष्मणभटजी शके १८६२ चे अखेरीस वारले.

● ● ●

## ९८ : वे. मुरलीधर वासुदेव शेंड्ये

### गणपति पुळें

वे. मुरलीधरशास्त्रिणां जन्म १८२४ तमे शाके श्रीक्षेत्र–गणपति पुळें–ग्रामे संजातम् । एतेषां पितृचरणाः शेण्ड्ये वासुदेवशास्त्रिणः। इमे व्याकरणधर्मशास्त्रयोः विद्वांसः आसन्। एतेषां ६० वर्षे यावत् पुण्यपत्तने आसीत् निवासः। पुण्यपत्तनस्थे श्रीमोदी–गणपतिमंदिरे प्रतिदिनं पुराणवाचनं एभिः बहुकालं कृतम्। द्विवारं पद्भ्यां एव काशीयात्रा कृता। मुरलीधरशास्त्रिणां मातुः नामधेयं सौ. लक्ष्मीदेवी। एतेषां उपनयनं श्रीपद्मालयक्षेत्रे (खानदेश) अष्टमे वर्षे संभूतम्। ततः श्रीक्षेत्र–गणपति पुळें–ग्रामे स्वभ्रात्रा शेण्ड्ये गणेशशास्त्रिणा साकं वेदाध्ययनारंभः संवृत्तः वे. फाटक जनार्दनभट्टगुरूणां सविधे। तत्र संहिताध्ययनं संवृत्तम्। ततः पुण्यपत्तनं आगत्य वेदपाठशालायां कै. रामभटजी भावे गुरूणां सकाशे पदसमाप्तिपर्यन्तं अध्ययन संवृत्तम्। ततः पुण्यपत्तने अध्ययनप्रत्यूहबाहुल्यात् ते सांगली–ग्रामं गताः। तत्र कै. तात्या केळकर–नाम्नां प्रसिद्धानां गृहस्थानां गृहे उषित्वा कै. केळकर काशीनाथभट्ट गुरूणां संनिधौ क्रमान्तं अध्ययनं

दशग्रंथानां अध्ययनं च संवृत्तम् । ततः वेदशास्त्रोत्तेजकसभायां शाखायाः तथा दशग्रंथानां च परीक्षा संजाता तत्र ते साधुतया उत्तीर्णाः। ततः वेदशास्त्रोत्तेजक-सभातः शिष्यवृत्तिं गृहीत्वा पुण्यपत्तनस्थ संस्कृत–पाठशालायां संस्कृताध्ययनं विधाय वेदशास्त्रोत्तेजकसभायां साहित्यप्रथमपरीक्षा दत्ता। तथा च बडोदास्थ-स्वामिनां पुरतः दशग्रंथानां परीक्षा संजाता। अनंतरं कानिचित् वर्षाणि पुण्यपत्तने उषित्वा ते स्वपितृचरणानां सविधे स्थातुं गणपति पुळें–ग्रामं गताः। तत्र अत्युत्कृष्टां मातृपितृसेवां विधाय सुपुत्र इति प्रसिद्धिं आप्नुवन्। मातृपितृषु स्वानंदवासिषु तत्रैव गणेशसेवां विधाय ते निवसन्ति। प्रतिदिनं गणेशमंदिरे कुलपरंपरागतं पुराणपठनं कुर्वन्ति। तथा एतेषां प्रातःकालं प्रारभ्य रात्रिपर्यन्त ऋषितुल्यमेव आचरणं वर्तते। स्मार्ताग्निसेवां कुर्वन्ति। एतेषां कुले सर्वेऽपि पूर्वजाः स्मार्ताग्निधारका एव आसन्। इदानीं उपजीविकासाधनं कृषिरेव। एतेषां पुत्रद्वयं चतस्रः कन्याः वर्तन्ते। एतेषां पत्न्याः नामधेयं सौ. भागीरथीदेवी पाटणकरकुलोत्पन्ना आरवली ( रत्नागिरी ) ग्रामस्था।

---

वे. मुरलीधरशास्त्री शेंड्ये यांची माहिती त्यांचे बंधु पं. गणेशशास्त्री शेंड्ये यांनीं संस्कृतांत लिहून पाठविली व ती त्या भाषेंतच या ग्रंथांत छापली जावी अशी इच्छा व्यक्त केली. सबब संस्कृतांतच वरील माहिती दिली आहे. संस्कृत भाषा मुळींच न समजणाऱ्यांकरितां वरील मजकुराचा आशय पुढीलप्रमाणें देण्यांत येत आहे:–

वे. मुरलीधरशास्त्री यांचा जन्म शके १८२४ मध्यें झाला. त्यांचे वडील वासुदेवशास्त्री हे वैयाकरणी व धर्मशास्त्री म्हणून पुण्यांत प्रसिद्ध होते. त्यांनीं दोन वेळां पायीं काशीयात्रा केली होती. वे. मुरलीधरशास्त्री यांच्या मातेचें नांव लक्ष्मीबाई. वे. मुरलीधरशास्त्री यांनीं ऋग्वेदाच्या संहितेचें अध्ययन पुळयास वे. जनार्दनभटजी फाटक यांच्याजवळ केलें. नंतर पुण्यास येऊन पुणें वेदपाठशाळेंत वे. रामभटजी भावे गुरुजी यांच्याजवळ पदें म्हटलीं. नंतर सांगलीस जाऊन वे. काशीनाथभटजी केळकर यांच्याकडे क्रम व दशग्रंथांचें अध्ययन पूर्ण केलें. मग वेदशास्त्रोत्तेजक सभेची व बडोद्याची दशग्रंथांची परीक्षा दिली व नंतर वे. शा. सभेची शिष्यवृत्ति घेऊन, पुणें संस्कृत पाठशाळेंत संस्कृताचें अध्ययन केलें व सभेची साहित्याची पहिली परीक्षा दिली.

नंतर कांहीं वर्षे पुण्यास राहून मग गणपति पुळ्यास घरीं राहण्यास गेले. तेव्हांपासून गणपतीची सेवा करून व घराण्यांतील परंपरेस अनुसरून देवापुढें नित्य पुराण सांगून व घरीं स्मार्ताग्नि ठेवून पुळ्यास असतात. निर्वाहाचें साधन म्हणून शेती करतात.

वे. मुरलीधरशास्त्री याच्या पत्नीचें नांव भागीरथीबाई. या आरवलीच्या पाटणकर घराण्यांतील आहेत. यांना दोन पुत्र व चार कन्या अशी संतति आहे.

• • •

## ९९ : वे. बाळकृष्ण महादेव सप्रे

### काशी

यांचा जन्म काशी येथें सन १९०० मध्यें झाला. यांच्या घराण्याची वस्ती तीन पिढ्या काशींत आहे. वे. बाळकृष्णभटजी यांनीं ऋग्वेदाचें संपूर्ण अध्ययन वे. भिकंभटजी पटवर्धन यांच्याजवळ करून, इंदूर येथें दशग्रंथांची क्रमान्त परीक्षा दिली. त्या परीक्षेंत त्यांना पहिल्या क्रमांकाची दक्षिणा व महावस्त्र मिळालें. यांनीं घनपाठाच्या कित्येक आवृत्त्या स्वाध्याय स्वरूपानें केल्या आहेत. वेद बिनचूक म्हणण्याबद्दल यांची ख्याती आहे.

काशींतील तरुण घनपाठी वे. विश्वनाथ वामन देव यांनीं जटा–घनाचा अभ्यास वे. बाळकृष्णभटजी यांच्याजवळ पूर्ण केला.

वे. बाळकृष्णभटजी यांच्या पत्नीचें नांव रमाबाई पिता वे. दामोदरभटजी भाटे. वे. बाळकृष्णभटजी यांना वयाच्या तिसाव्या वर्षींच पत्निवियोग झाला. यांना विश्वनाथ नांवाचे पुत्र असून, ते एम्. ए., बी. एड्. झालेले आहेत.

• • •

## १०० : वे. गोविंद विश्वनाथ साठे

### टोळवाडी

यांचा जन्म शके १८०६ मध्यें झाला. वडील विश्वनाथ गोपाळ हे टोळवाडीस भिक्षुकी करीत. मातेचें नांव आनंदीबाई पिता विठ्ठल बाळकृष्ण

लिमये, मालगुंड. वे गोविंदभटजी यांनीं कृष्णयजुर्वेदाचें क्रमान्त अध्ययन प्रथम घरीं वडिलांजवळ व नंतर आंबेकोंड येथें वे. नागेश्वर गणेश अभ्यंकर गुरुजी यांच्याजवळ केलें. स्मार्त याज्ञिक व थोडें श्रौत यांचेही अध्ययन झालें. वे. अभ्यंकर गुरुजींकडे अग्निहोत्र असल्यानें दर्शपूर्णमास इष्टि व चातुर्मास्य याग यांची माहिती वे. गोविंदभटजींस झाली. गोविंदभटजींचें वास्तव्य नेहमीं टोळवाडीसच असतें.

वे. गोविंदभटजींच्या भार्येचें नांव राधाबाई पिता सदाशिव विश्वनाथ केळकर, नेवरें.

● ● ●

## १०१ : वे. विश्वनाथ रामचंद्र साठ्ये

### देवरुख

यांचा जन्म १७६० मध्यें झाला. यांच्या वडिलांचें नांव रामचंद्र जनार्दन. ते देवरुखास भिक्षुकी करीत. वे. विश्वनाथभटजी यांनीं ऋग्वेदाच्या दशग्रंथांचें संपूर्ण अध्ययन केलें होतें. यांनीं पुणें, मुंबई या भागांत कधीं प्रवास केला नाहीं. परंतु घाटावरून जे वैदिक कोंकणांत जात त्यांना वे. विश्वनाथ-भटजींच्या विद्वत्तेची कल्पना आलेली होती. वे. विश्वनाथभटजींचें तोंडानें आवृत्ति म्हणण्याचें काम अव्याहत सुरू असे. यांच्या घरीं वेदशाळा होती व त्यांतून चार पांच विद्यार्थी यांच्याजवळ संपूर्ण अध्ययन करून गेले. करवीरच्या श्रीशंकराचार्यांकडून यांना प्रशस्तिपत्र देण्यांत आलें होतें.

वे. विश्वनाथभटजींच्या पत्नीचें नांव पार्वतीबाई. या पिरंदवणें येथील भावे घराण्यांतील होत्या. यांना दोन पुत्र व दोन कन्या अशीं अपत्यें आहेत. थोरले चिरंजीव वे. पुरुषोत्तम हे देवरुखास वैदिक आहेत.

वे. विश्वनाथभटजी शके १८३४ मध्यें वारले.

● ● ●

## १०२ : वे. गणेश श्रीधर साने

**पुणें**

यांचा जन्म शके १८०९ मध्यें चिकोडी तालुक्यांतील टाकळी या गांवीं (नरसोबाचे वाडीजवळ) झाला. वडिलांचें नांव श्रीधर कृष्ण. हे टाकळी येथें शेती करीत असत. श्रीमंत इचलकरंजीकर यांनीं अकरा ब्राह्मणांना घरें व जमिनी देऊन टाकळीस वस्ती करविली तेव्हांपासून साने घराण्याचें वास्तव्य या गांवीं होतें. वे. गणेशभटजींच्या मातेचें नांव यशोदाबाई. या हणमंत रामचंद्र जोग यांच्या कन्या होत. वे. गणेशभटजींचा व्रतबंध झाल्यानंतर ते कुरुंदवाडास वेदाध्ययनाकरितां आले व तेथें त्यांनीं वे. गणेश वासुदेव परांजपे यांच्याकडे ऋग्वेदाच्या दशग्रंथांचें अध्ययन पूर्ण केलें. इंदूर व कोल्हापूर येथें दशग्रंथांच्या परीक्षा दिल्या. कुरुंदवाडास कांहीं वर्षें भिक्षुकी करून शके १८५१ चे सुमारास गणेशभटजी पुण्यास राहाण्यास आले. तेव्हांपासून त्याचें वास्तव्य पुण्यांत असून, पुण्यांतील मोठ्या वैदिकांत त्यांची गणना आहे.

वे. गणेभटजींच्या भार्येचें नांव गोपिकाबाई पिता रामचंद्र दत्तात्रय जोशी, कुरुंदवाड. यांना तीन पुत्र व एक कन्या आहे.

● ● ●

## १०३ : वे. सोमनाथ गदाधर सोलापुरकर

**काशी**

यांचा जन्म काशी येथें शके १८१८ मध्यें झाला. वडिलांचें नांव गदाधर विष्णु व मातेचें नांव सावित्रीबाई पिता नारायण जयराम भट्टभट्ट. गदाधरभटजींनीं वेदाध्ययन केलें होतें. यांचे पूर्वज रामचंद्रशास्त्री सोलापुरकर हे महाराष्ट्रांतून सुमारें दीडशें वर्षांपूर्वीं काशीस राहाण्यास गेले व तेव्हांपासून या घराण्याचें वास्तव्य तेथें आहे. सदरचे रामचंद्रशास्त्री हे वैदिक व शास्त्री

होते व काशीस विद्यार्थांस वेदभाष्य शिकवीत. विजयानगरम्‌चे त्या वेळचे राजे विजयराम गजपति यांच्या मातुःश्री अप्पलकुंडम्मा यांनीं रामचंद्रशास्त्र्यांचा उपदेश घेतला होता.

वे. सोमनाथभटजी यांनीं ऋग्वेदाच्या दशग्रंथांचें अध्ययन वे. रामजी दिनकर जोशी यांच्याकडे व श्रौताचें अध्ययन वे. भालचंद्र दीक्षित पानगांवकर यांच्याकडे केलें. नंतर इंदुरास यांनीं दशग्रंथाची परीक्षा दिली. वे. सोमनाथभटजी यांनीं काशीस एक दिवसांत संहिता पारायण केलें व क्रमाचीं पारायणें ग्वाल्हेर, नागपूर, नागांव, काशी, पुणें ( शके १८७१ ), बडोदें व परळ येथें केलीं आहेत.

यांच्या भार्येचें नांव रमाबाई पिता रामचंद्र बाळकृष्ण जोशी, काशी. यांना दोन पुत्र व पांच कन्या आहेत.

## १०४ : वे. काशीनाथभटजी हर्डीकर

काशी

यांचा जन्म सन १८५० मध्यें झाला. यांचें वास्तव्य प्रथम ब्रह्मावर्तास होतें. नंतर काशीस राहाण्यास येऊन वे. विनायकभटजी डोंगरे यांच्याजवळ ऋग्वेदाचें संपूर्ण अध्ययन केलें. नंतर काशीस भिक्षुकी करीत. यांनीं जटेचें एक पारायण व हैद्राबादेस घनाचें पारायण केलें होतें. घन–पारायणाच्या वेळीं श्रवणास वे. नरहरभटजी जोगळेकर होते. लाहोरच्या वैदिकसंमेलनास हे निमंत्रणावरून गेले होते. अफू व भांग यांचें सेवन करीत, पण म्हणतांना पट्टींत यांना कधीं चूक लागत नसे. काशीच्या वैदिकांत त्यांच्या वेळीं ते एक अग्रगण्य म्हणून समजले जात. दोन्ही वेळ गंगेचें स्नान करून, घरच्या देवावर संहितेच्या एका अध्यायाच्या घनाचा अभिषेक करण्याचा त्यांचा परिपाठ होता !

यांचे पुत्र वे. गंगाधरभटजी हेही उत्तम वैदिक होते. वे. काशीनाथभटजी सन १९३० मध्यें वारले.

## १०५ : वे. आत्माराम विनायक हळबे

### पुणें

यांच्या घराण्याचें राहाण्याचें गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील निंवसर हें होय. यांच्या घराण्यांत नऊ पिढ्या वेदाध्ययनाची परंपरा सतत चालत आली आहे. वे. आत्मारामभटजी यांचा जन्म शके १८१४ मध्यें कोंढयें, ता. राजापूर येथें आजोळीं झाला. यांच्या वडिलांचें नांव वे. विनायक कृष्ण हे निंवसर येथें वैदिक होते. मातेचें नांव रुक्मिणीबाई पिता भास्कर गिरिधर पाध्ये, कोंढयें. वे. आत्मारामभटजींनीं ऋग्वेदाचें क्रमान्त अध्ययन घरीं वडिलांच्याजवळ केलें. वयाच्या १६ व्या वर्षीं अध्ययन संपवून, वयाच्या १८ व्या वर्षी वे. आत्मारामभटजी पुण्यास राहाण्यास आले.

वे. आत्मारामभटजी यांनीं पुण्यास भिक्षुकी सुरू केली, पण भिक्षुकीची आवड नसल्यानें त्यांनीं लवकरच दुसऱ्या उद्योगाकडे लक्ष वळविलें. प्रथम थोडे दिवस त्यांनीं तांदुळाचा व नंतर लोण्याचा व्यापार केला. पण त्यांतील अनुभव समाधानकारक न आल्यानें त्यांनीं जळाऊ लाकडांची वखार सुरू केली. सदरची वखार आज चाळीस वर्षें ते पुण्यास चालवीत आहेत. पण हा उद्योग करीत असतांना त्यांनीं आपल्या अध्ययनास मालिन्य येऊं दिलें नाहीं. स्टेशनवर लाकडांची वॅगन खालीं होत असतां, तेथेंच बसून आवृत्ति म्हणण्याचें त्याचें काम सुरू असे! यामुळें आजही ते मंत्रजागरांत बसून उत्तम तऱ्हेनें भाग घेतात.

वे. आत्मारामभटजींनीं तरुणपणीं देशी पद्धतीचा भरपूर व्यायाम केला आहे. अद्यापही वयोमानाप्रमाणें झेपेल असा व्यायाम घेण्याचा त्यांचा क्रम सुरू आहे. वे. आत्मारामभटजींनीं पुणें येथील स्मशान-फंड कमिटीच्या वखारीची व्यवस्था ११ वर्षें विनावेतन पाहिली.

यांच्या पत्नीचें नांव सावित्रीबाई पिता आत्माराम सदाशिव पराडकर, देवळें, ता. संगमेश्वर. यांना तीन मुलगे व दोन मुली अशी संतति आहे.




वे. सोमनाथ गदाधर सोलापुरकर ( पृ. ९४ )



वे. आत्माराम विनायक हळबे ( पृ. ९६ )




वे. काशीनाथ नारायण केळकर (पृ. १०१)



वे. बापूदेव माजलगांवकर ( पृ. १०७ )



पं. गणपति रामकृष्ण हेब्बार ( पृ. १०९ )



वे. गंगाधर राजाराम लेले
( यांची माहिती पहिल्या खंडांत
पृ. ८७ वर दिली आहे )



वे. भिकू दीक्षित लेले ( पृ. ८७ )

## पुरवणी विभाग

### १०६ : वे. सदाशिव ( बाळंभटजी ) गंगाधर अभ्यंकर वांई–पुणें

यांच्या घराण्याचें कोंकणांतील मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील मालगुंड हें होय. यांच्या घराण्यांत वेद व शास्त्र यांच्या अध्ययनाची परंपरा मोठी आहे. यांचे पूर्वज वे. रामचंद्र काशीनाथ हे मालगुंडाहून भोर संस्थानांतील आंबवडें येथें सन १७००च्या सुमारास आले. हे अग्निहोत्री व आचारनिष्ठ असल्यानें, श्रीमंत शंकराजी नारायण सचिव यांना त्यांच्याबद्दल फार आदर वाटे. श्री छत्रपति राजाराममहाराज यांच्या निधनानंतर, त्यांच्या पत्नी ताराबाई यांच्याशीं राजनिष्ठ राहाण्याबद्दल शंकराजी नारायण यांनीं शपथ घेतली होती. पण पुढें शाहू छत्रपति आल्यावर त्यांनीं सचिव आपल्याशीं राजनिष्ठ न राहातील तर जहागीर खालसा करण्यांत यावी असें फर्माविलें. शपथ मोडण्यापेक्षां आत्महत्या करणें श्रेयस्कर असें सचिवांनीं ठरविलें व ते आंबवड्यास वे. रामभटजी यांच्याकडे सल्ला विचारण्यास गेले. 'संन्यास घेऊन जलांत देह विसर्जन करावा म्हणजे ती आत्महत्या होणार नाहीं व त्यामुळें लागणारें पातकही टळेल. आपल्यानंतर मुलाकडे जहागीरही चालू राहील' असा सल्ला वे. रामभटजींनीं दिला. तो सल्ला पटून श्री. शंकराजी नारायण यांनीं आंबवड्यासच सन १७०८ मध्यें चतुर्थाश्रम केला व जलसमाधि घेतली. नंतर लवकरच वे. रामभटजी वाईस राहाण्यास गेले.

या घराण्यांत प्रसिद्ध श्रौती वे. आण्णाभटजी अभ्यंकर, वे. जनार्दन विनायक अभ्यंकर ( या दोघांची माहिती या पुस्तकाच्या पहिल्या खंडांत दिली आहे ), भारत–विख्यात पं. वासुदेवशास्त्री अभ्यंकर अशीं विद्वद्रत्नें जन्मास आलीं. वे. बाळंभटजी यांचे वडील वे. शा. सं. गंगाधरशास्त्री हेही उत्तमपैकीं वैदिक व शास्त्री होते. यांनीं याजुषहौत्रावर संस्कृतमध्यें एक प्रबंध लिहिलेला आहे. यांना इंग्रज सरकारनें सुरत येथील कॉलेजांत शास्त्री म्हणून नेमलें होतें. ते सन १८९० मध्यें वारले.

वे. बाळंभटजींचा जन्म सन १८७१ मध्यें सुरत येथें झाला. यांनीं कृष्ण-यजुर्वेदाचें अध्ययन वडिलांच्या जवळ केलें. दररोज ब्रह्मयज्ञांत क्रमानें वेदाची आवृत्ति म्हणण्याचा यांचा नियम असे. स्मार्त याज्ञिकाचें यांना चांगलें ज्ञान होतें. सन १९०८ पर्यंत वाईस राहून नंतर कायमचें वास्तव्य पुण्यास झालें. श्रीमंत तात्यासाहेब नातू ( बागेंतील ) यांचा यांना आश्रय असे.

वे. बाळंभटजींच्या पत्नीचें नांव पार्वतीबाई पिता हरिशास्त्री गोरे, लिंच. यांना पं. त्र्यंबकशास्त्री व नारायणशास्त्री असे पुत्र आहेत. त्र्यंबकशास्त्री हे बी. ए. असून, वेदाचे चिकित्सक अभ्यासू व उत्तम याज्ञिक आहेत. त्यांनीं ' वैदिक स्वरपद्धति ' व ' कालनिर्णय चंद्रिका ' असे दोन ग्रंथ लिहिले आहेत. पं. नारायणशास्त्री यांनीं ' कारकबोध ' या नांवाचें संस्कृत व्याकरणावर पुस्तक लिहिलें आहे.

वे. बाळंभटजी सन १९४४ मध्यें वारले.

• • •

## १०७ : वे. गोविंद बापू अयाचित

### उमरखेड

यांचा जन्म सन १८४५ च्या सुमारास झाला. यांच्या वडिलांचें नांव बापूभट महादेव. वे. गोविंदभटजी यांनीं ऋग्वेदाचें अध्ययन प्रथम आपल्या आजोबां-जवळ व नंतर वडिलांजवळ केलें. तसेंच श्रौत याज्ञिकाचेंही ज्ञान यांनीं संपादन केलें होतें. वेदाध्ययनानंतर विवाह झाल्यावर यांनीं अग्निहोत्र घेऊन तें छत्तीस वर्षें चालविलें. यांनीं दोन वेळां चातुर्मास्य यागही केले होते. वाशिम व जालना येथें यांचे मोठे सत्कारसमारंभ करण्यांत आले होते.

वे. गोविंदभटजींना दादंभटजी या नांवाचे चिरंजीव होते. पण ते गोविंद-भटजींच्या हयातींतच वारले.

वे. गोविंदभटजी वयाच्या ९० वर्षीं सन १९३५ मध्यें वारले. त्यांच्या मृत्यूपूर्वीं दहा दिवस अगोदर त्यांच्या पत्नी वारल्या. पत्नीच्या मृत्यूमुळें

आपल्या दीर्घकाळ चाललेल्या अग्निहोत्राचा समारोप झाला याबद्दल वे. गोविंदभटजींस फार दुःख झालें व नंतर थोड्याच दिवसांत त्यांनीं इहलोकाचा निरोप घेतला.

● ● ●

## १०८ : वे. राजेश्वर काशिनाथ अयाचित

### उमरखेड

यांनीं ऋग्वेदाचें क्रमान्त अध्ययन आपल्या वडिलांजवळ केलें. नंतर संस्कृत भाषेचा व दर्शनांचाहि व्यासंग केला. तसेंच ज्योतिषशास्त्रांतही पारंगतता प्राप्त करून घेतली होती. पण यांचा बाणा मुख्यत्वें वैदिकाचा होता. दररोज पहाटे तीन वाजतां उठून पदांची आवृत्ति म्हणण्याचा यांचा नियम होता व तो ४८ वर्षें अव्याहत टिकला होता. यांनीं कांहीं विद्यार्थ्यांस अध्यापनही केलें.

यांना रेणुकादास व अम्बादास या नांवाचे दोन मुलगे होते.

वे. राजेश्वरभटजी वयाच्या सत्तराव्या वर्षीं सन १९१३ च्या सुमारास वारले.

● ● ●

## १०९ : वे. रेणुकादास ( दासंभटजी ) राजेश्वर अयाचित

### उमरखेड

यांचा जन्म सन १८८५ च्या सुमारास झाला. यांच्या वडिलांचें नांव राजेश्वर महादेव. वे. दासंभटजी यांनीं ऋग्वेदाचें अध्ययन घरीं वडिलांच्याजवळ केलें. त्याबरोबरच संस्कृत भाषेचें अध्ययन व शालेय शिक्षणही त्यांनीं चालू ठेविलें होतें. व्ह. फायनलची परीक्षा ते तेरा वर्षांचे असतांना उत्तीर्ण झाले. नंतर अकोल्यास ट्रेनिंग स्कूलमध्येंही त्यांनीं दोन वर्षें शिक्षण घेतलें. पुढें संस्कृत भाषेचा व शास्त्रांचा व्यासंग त्यांनीं केला. तसेंच फलज्योतिष व ग्रहगणित यांतही त्यांनीं प्रावीण्य संपादन केलें.

लो. टिळकांच्या पंचांग–संशोधन कार्यांत त्यांनीं बरेंच साहाय्य केलें, व त्या बाबतींत पुष्कळ लेख लिहिले. नागपूरच्या टिळक–पंचांगाचें गणित ते पुष्कळ वर्षें करीत असत.

त्यांनीं चरण-व्यूह भाष्यानुवाद हा ग्रंथ तयार केला. त्या ग्रंथाचा वेदविद्येच्या अभ्यासकांस फार उपयोग होत आहे. त्याचप्रमाणें यांनीं 'उत्तमश्लोक मंडळा'ची स्थापना केली व प्राकृत सप्तशतीचें स्वतः संपादन केलें.

श्रौत–कर्मकांडाचीही यांना उत्तम माहिती होती. विदर्भांत झालेल्या अनेक यज्ञांतून यांनीं कामें केलीं होतीं व नागपूर येथें झालेल्या बाबाजी दीक्षित यांच्या नक्षत्रसत्रांतही भाग घेतला होता.

श्रीशंकराचार्य ( शिरोळकर ) यांनीं त्यांना 'वेदविद्याकोविद' अशी पदवी देऊन भूषविलें होतें.

वे. दासंभटजी यांनीं लो. ना. बापूजी अणे यांच्या नेतृत्वाखालीं राजकीय चळवळींतही भाग घेतला व जंगल सत्याग्रहांत एकदां कारावासही भोगला.

वे. दासंभटजींनीं शेवटीं संन्यासाश्रमाचा स्वीकार केला होता. ते सन १९५७ मध्यें समाधिस्थ झाले.

• • •

## ११० : वे. गजानन गोपाळ कानगांवकर

### पुणें

यांचा जन्म शके १८३४ मध्यें पुण्यास झाला. यांच्या वडिलांचें नांव वे. गोपाळ गंगाधर व मातेचें नांव राधाबाई पिता कृष्णाजी दिवेकर, पळसदें, ता. इंदापूर. वे. गजाननभटजींचें शुक्लयजुर्वेदाचें त्रिपदीपर्यंतचें शिक्षण घरीं वडिलांच्याजवळ झालें. पुण्याच्या वे. शा. सभेची त्रिपदीची परीक्षा यांनीं दिलेली आहे. नंतर वे. गजाननभटजी पुण्यास पौरोहित्य करतात. ते सोमनाथाच्या प्रतिष्ठेकरतां व इंदूर आणि अजमीर येथें विष्णुयागाकरतां गेले होते.

यांच्या पहिल्या पत्नीचें नांव सरस्वती पिता शंकर मार्तंड पाठक, श्रीगोंदें. या पत्नीस तीन कन्या आहेत. दुसरी भार्या – सरस्वती पिता वामन विद्याधर जोशी, संगमनेर. यांना एक मुलगा व एक मुलगी आहे.

• • •

## १११ : वे. काशीनाथ नारायण केळकर

### सांगली

यांच्या घराण्याचें कोंकणांतील मूळ गांव मालवण तालुक्यांतील आचरें हें होय. यांच्या घराण्यांत वैदिकांची परंपरा अनेक पिढ्या चालत आली होती. वे. काशीनाथभटजी यांचे वडील वे. नारायण नीळकंठ हे उत्तम वैदिक असून यांचें वास्तव्य सांगलीस असे. वे. काशीनाथभटजींच्या मातेचें नांव आनंदीबाई. या आचरें येथील बापूराव वझे यांच्या कन्या होत्या. वे. काशीनाथभटजी यांचे थोरले बंधु वे. पुरुषोत्तम नारायण हेही मोठे वैदिक होते. त्यांचा परिचय या पुस्तकाच्या पहिल्या खंडांत दिला आहे.

वे. काशीनाथभटजी यांचा जन्म शके १७८५ मध्यें झाला. यांनीं ऋग्वेदाचें संपूर्ण अध्ययन घरींच वडिलांजवळ केलें. नंतर पुण्यास वे. शा. सभेंत दशग्रंथांची परीक्षा दिली. पुढें घनाचीं पारायणें सांगली, पुणें इ० ठिकाणीं केलीं. शके १८४८ मध्यें पुण्यास झालेल्या घन–पारायणाच्या वेळीं नागरिकांतर्फे यांचा मोठा सत्कार करण्यांत आला. त्या वेळीं श्रीशंकराचार्यांकडून यांना ‘ वैदिकचूडामणि ’ अशी पदवी देण्यांत आली.

वे. काशीनाथभटजी यांनीं सांगलीच्या सरकारी वेदशाळेंत ऋग्वेदाचे मुख्याध्यापक म्हणून सुमारें ३५ वर्षें काम केलें. यांच्याकडे त्या पाठशाळेंत शिकून पुष्कळ विद्यार्थी गेले. त्यांच्यापैकीं कांहीं प्रमुख नांवें :— १. वे. गोविंद रामकृष्ण मांडगवणे गुरुजी. २. वे. दत्तात्रय पांडुरंग किंजवडेकर गुरुजी. ३ वे. वासुदेव हरि भातखंडे. ४ वे. विनायक सीताराम आठल्ये. ५ वे. देवस्थळी. ६. वे. वासुदेव महादेव पुरोहित. ७. वे. नरहरि वासुदेव टिळक. ८. दत्तात्रय वासुदेव टिळक. ९ वे. सखाराम ( बाळंभटजी ) वासुदेव माणगांवकर गुरुजी. १०. वे. मुरलीधर वासुदेव शेड्यें इ.

वे. काशीनाथभटजींच्या पत्नीचें नांव अन्नपूर्णाबाई पिता विठ्ठल विश्वनाथ धैसास, मिरज. यांना दोन पुत्र व एक कन्या अशी संतति झाली.

वे. काशीनाथभटजी सन १९५६ मध्यें वारले.

• • •

## ११२ : वे. शा. सं. गोपाळ पांडुरंग गोरे

### पंढरपूर

यांचा जन्म शके १८३६ मध्यें पंढरपूर येथें झाला. यांच्या वडिलांचें नांव पांडुरंग सिताराम गोरे. यांचें घराणें श्री पांडुरंगाच्या कुलोपाध्यायाचें बेणारे ) आहे. हे पंढरपूर येथें देवाचे उपाध्ये होते. वे. गोपाळशास्त्र्यांच्या मातेचें नांव रुक्मिणीबाई, पिता बडवे.

वे. गोपाळशास्त्र्यांनीं काशी येथें जाऊन वे. वासुदेवाचार्य भट्ट पुराणिक यांच्याजवळ कण्वशाखेचें घनान्त अध्ययन केलें. नंतर पंढरपुरास धारूरकर यांच्या वेदशास्त्र-पाठशाळेंत धर्मशास्त्र, वेदांत, मीमांसा या शास्त्रांचें अध्ययन पं.प्राण_भगवानशास्त्री धारूरकर यांच्याजवळ केलें. पुढें डेक्कन कॉलेजांत कोश-विभागांत कांहीं दिवस यांची नेमणूक झाली होती. हल्लीं पंढरपुरास धारूरकर विद्यालयांत कण्वशाखीय यजुर्वेदाचे व शास्त्राचे अध्यापक म्हणून काम करतात. वेद व शास्त्र यांचें उत्तम अध्ययन केलेल्या कण्वशाखीय मंडळींत यांची गणना आहे.

कानपूर येथें झालेल्या सर्व-वैदिक-शाखा संमेलनामध्यें भारतांतील घनपाठी विद्वानांचा सत्कार करण्यांत आला होता. त्यांत वे. गोपाळभटजी यांचा समावेश होता. शके १८८३ मध्यें नवग्रहशांत्यर्थ करण्यांत आलेल्या मुंबईतील अनुष्ठानांत कुण्डाचार्य म्हणून यांची नियुक्ति करण्यांत आली होती.

वे. गोपाळशास्त्री यांच्या प्रथम पत्नीचें नांव त्रिवेणीबाई. यांना एक पुत्र आहे. दुसरी भार्या कावेरीबाई. उभय भार्यांचे वडील पंढरपूर देवस्थानचे प्रमुख सेवाधारी श्री. बाबासाहेब पुजारी हे होत. यांना तीन मुलगे व तीन मुली अशी संतति आहे.

• • •

## ११३ : वे. कृष्ण ( बाबाभटजी ) नारायण जोशी

### उमरखेड

यांचा जन्म शके १८३४ मध्यें झाला. यांच्या वडिलांचें नांव नारायण रामचंद्र. वे. बाबाभटजी यांनीं ऋग्वेदाचें कांहीं अध्ययन उमरखेड येथील वेदशाळेंत वे. त्र्यंबकभटजी म्हैसकर यांच्याजवळ केलें. नंतर पदांचें अध्ययन पुणें वेदपाठशाळेंत करून, नंतर क्रमान्त अध्ययन सांगलीस वे. काशीनाथ-भटजी केळकर यांच्याजवळ केलें. नंतर वास्तव्य उमरखेड (वऱ्हाड) येथें असून वेदाध्यापनाचें कार्य करतात. विदर्भ व मराठवाड्यांत ठिकठिकाणीं झालेल्या स्वाहाकारात यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला आहे. तसेंच, यांनीं क्रमाचें पारायणही केलें आहे.

यांच्या पत्नीचें नांव रुक्मिणीबाई. यांना गौरीकान्त व चंद्रकान्त असे दोन पुत्र आहेत.

● ● ●

## ११४ : वे. शंकर दीक्षित वासुदेव नातु

### सांगली

यांचा जन्म शके १८२९ मध्यें झाला. यांच्या घराण्यांत अग्निहोत्राची परंपरा चार पिढ्या चालू आहे. यांचे वडील वासुदेव दीक्षित हे वैदिक असून श्रौती आहेत. यांनीं चातुर्मास्य याग व नक्षत्रसत्र सांगलीस केलें. वे. शंकर दीक्षितांचे प्रपितामह लक्ष्मण दीक्षित यांच्या वडिलांनीं सोमयाग केले होते. वे. शंकर दीक्षित यांच्या मातेचें नांव उमाबाई पिता गणेश यशवंत गाडगीळ, कुरुची. वे. शंकर दीक्षित यांनीं कृष्णयजुर्वेदाचें क्रमान्त अध्ययन व श्रौताचें अध्ययन घरीं वडिलांच्या जवळ केलें. तसेंच शास्त्राभ्यास व पुराणांचें वाचनही वडिलांजवळ केलें. वयाच्या बाविसाव्या वर्षीं विवाह झाल्यावर त्यांनीं सप्त पाकसंस्थांचें अनुष्ठान केलें. वयाच्या चोविसाव्या वर्षीं

श्रौताग्नीचें आधान केल्यानंतर वे. शंकर दीक्षित यांनीं सप्त हविःसंस्था आणि सप्त सोम–संस्था यांचीं अनुष्ठानें सांगलीस केलीं. तसेंच, सोमरसाचें बारा दिवस यजन असलेला पौंडरीक नांवाचा मोठा याग यांनीं केला. नंतर चार दिशांना चार महावेदी असलेला सर्वतोमुख नांवाचा महायागही वे. शंकर दीक्षित यांनीं केला. हे सर्व याग व अतिरुद्रस्वाहाकार सांगलीस केले. बृहस्पतिसव आणि अग्निष्टुत् या नांवाचे दोन सोमयाग वे. शंकर दीक्षित यांनीं वांईस केले. सोमयाग हे चयनासहही केले जातात. वे. शंकर दीक्षित यांनीं आपले कांहीं सोमयाग एकसहस्र, द्विषाहस्र आणि त्रिषाहस्र अशा तीन प्रकारच्या चयनांसह केले. काठकचयन या नांवाचा चयनाचा एक प्रकार सांगितलेला आहे. या काठकचयनाचें अनुष्ठान यांनीं चार वेळां केलें. चातुर्मास्य याग दहा वेळां व नक्षत्रसत्र दोनदां केलें. याशिवाय काम्येष्टी व पवित्रेष्टी बऱ्याच केल्या.

अलीकडच्या काळांत एका व्यक्तीनें इतकीं श्रौत अनुष्ठानें केल्याचें उदाहरण सांपडणें कठीण आहे. आगाऊ कोणाचेंही आर्थिक साहाय्य नसतांना वे. शंकर दीक्षित यांनीं स्वतःच्या श्रद्धेच्या बळावर याग केले व ते यज्ञदेवतेच्या कृपेनें तडीसही गेले, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे.

यांच्या भार्येचें नांव पार्वतीबाई. या वांईचे श्री. धुंडिराज रामकृष्ण घैसास यांची कन्या. यांना महादेव व त्र्यंबक या नांवाचे दोन पुत्र व एक कन्या आहे.

• • •

## ११५ : वे. प्रल्हाद रामचंद्र पाठक, औसेकर

### पंढरपूर – उमरखेड

यांचा जन्म सन १८९६ मध्यें झाला. यांच्या वडिलांचें नांव वे. रामचंद्र विष्णु पाठक व मातेचें नांव सत्यभामाबाई पिता वांगीकर. वे. प्रल्हादभटजींचे आजोबा वे. विष्णुआप्पा हे प्रख्यात घनपाठी होते. वे. प्रल्हादभटजी यांनीं शुक्लयजुर्वेदाचें अध्ययन प्रथम पंढरपूर येथें वे. दत्तंभटजी गर्गे यांच्याजवळ व नंतर नाशकास वे. नारायणभटजी देव यांच्याजवळ केलें. पुढें काशीस जाऊन

वे. रामचंद्रभटजी पातुरकर यांच्याजवळ शिक्षण घेऊन घनान्त अध्ययन पूर्ण केले. यांचें वास्तव्य पंढरपुरास असे व तेथें वेदाध्यापनाचें कार्य चतुर्थाश्रमाचा स्वीकार करीपर्यंत चालू होतें.

वे. प्रल्हादभटजींच्या पत्नीचें नांव अन्नपूर्णाबाई पिता गोपाळ तथा बापूराव रंगनाथ महाजन, मंगळवेढें. यांना दामोदर व गोविंद असे दोन पुत्र आहेत. ज्येष्ठ चिरंजीव शास्त्री असून, पुण्यास शिक्षक आहेत.

वे. प्रल्हादभटजी यांनीं सन १९६१ मध्यें संन्यासाश्रमाचा स्वीकार केला. नंतरचें नांव श्री जनार्दनानंदसरस्वती गुरु वासुदेवानंदसरस्वती. हल्लीं वास्तव्य उमरखेड जि. यवतमाळ येथें आहे. तेथेंही त्यांनीं वेदशाळा चालू केली आहे.

वे. प्रल्हादभटजी यांनीं अध्ययन – अध्यापन करीत वेदाची व आश्रमधर्माची सेवा करण्याचें व्रत साऱ्या आयुष्यभर चालू ठेवलें आहे.

• • •

## ११६ : वे. काशीनाथ महादेव महाबळेश्वरकर

### वांई – चिंचवड

यांचा जन्म शके १८१७ मध्यें वांईस झाला. यांच्या वडिलांचें नांव महादेव यज्ञेश्वर व मातेचें नांव उमाबाई पिता वे. हरभटजी मोने, वांई. वे. काशीनाथभटजी यांनीं ऋग्वेदाचें सुरुवातीचें अध्ययन घरीं वडिलांच्याजवळ केलें. वडील शके १८३९ मध्यें वारल्यानंतर वे. काशीनाथभटजी काशीस आपले आजोबा वे. यज्ञेश्वर दीक्षित यांच्याकडे राहाण्यास गेले. तेथें रामजी जोशी यांच्या वेदशाळेंत वे. काशीनाथभटजी यांनीं पदांचें राहिलेलें अध्ययन पूर्ण केलें. नंतर वांईस परत येऊन दशग्रंथांपैकीं राहिलेले ग्रंथ म्हटले. अध्ययन संपल्यानंतर सुमारें पंधरा वर्षें यांचें वास्तव्य वांईसच झालें. पण पुढें चिंचवड संस्थानांतील वेदशाळेवर यांची नेमणूक होऊन, गेलीं १७ वर्षें ते तेथें वेदाध्यापक म्हणून काम करीत आहेत.

वे. काशीनाथभटजी यांनीं हौत्राचें अध्ययन सुरवातीस त्यांचे आजोबा वे. यज्ञेश्वर दीक्षित यांच्याजवळ व नंतर वे. श्रीधर बाळकृष्ण आळतेकर (कोल्हापूर पीठावरील विद्यमान् जगद्‌गुरु) यांच्याजवळ केलें. पंचवीस वर्षांपूर्वी आळतेकर यांनीं माहुली येथें केलेल्या सर्वपृष्ठाप्तोर्याम यज्ञांत यांनीं मैत्रावरुणाचा प्रयाग केला. वे. आळतेकर यांनीं वांईस चातुर्मास्ययाग केले, त्यांतही वे. काशीनाथभटजींनीं भाग घेतला होता. सोमनाथांच्या प्रतिष्ठेच्यावेळीं सोमनाथास गेले होते.

वे. काशिनाथभटजींच्या पहिल्या पत्नीचें नांव लक्ष्मीबाई पिता रामचंद्र दीक्षित तोरो, काशी. यांना एक कन्या आहे. दुसरी पत्नी पार्वतीबाई पिता राजारामभटजी जोशी. वटार जि. कोल्हापूर. यांना विनायक व रामचंद्र असे दोन पुत्र व तीन कन्या अशी संतति आहे.

● ● ●

## ११७ : वे. गणेश कृष्ण महाबळेश्वरकर

### वांई – भोर

यांचा जन्म शके १७५० च्या सुमारास झाला. यांनीं ऋग्वेदाचें संपूर्ण अध्ययन वांई येथें स्वतःचे वडील कृष्ण दीक्षित यांच्यांजवळ केलें. त्या काळांतील मोठ्या वैदिकांत यांची गणना होत असे. भोरचे श्रीमंत पंतसचिव यांनीं वे. बाबाजी जोशी मेणवलीकर यांच्या सल्ल्यानुसार वे. गणेशभटजींना आश्रय देऊन भोरास राहाण्यास बोलावलें. श्री. सचिव यांनीं त्यांना भोरास एक घरही दिलें. तेथें अग्निहोत्र घेऊन वे. गणेशभटजी पुष्कळ वर्षें राहिले.

वे. गणेशभटजींच्या पत्नीचें नांव सरस्वतीबाई. यांच्या चार मुलांपैकीं वे. गोविंदभटजी हे पुढें भोरासच होते.

वे. गणेशभटजी शके १८०३ मध्यें वारले.

● ● ●

## ११८ : वे. उत्तरेश्वर ( बापूदेव ) अंबादास माजलगांवकर -

**जालना**

यांचा जन्म शके १८२२ मध्यें झाला. यांच्या वडिलांचें नांव अंबादास रघुनाथ माजलगांवकर. हे भिक्षुकी करीत. यांना श्री. कुबेरकर जहागिरदार यांचा आश्रय होता. वे. बापूदेव यांच्या मातेचें नांव बकुळाबाई पिता माधव त्र्यंबक पाठक, मंजरथकर. वे. बापूदेव यांनीं शुक्ल यजुर्वेदाचें घनान्त अध्ययन व व श्रौत–कर्मकांडाचें अध्ययन घरीं वडिलांच्या जवळ केलें. नंतर पंढरपूर येथील गर्गेगुरु विद्यापीठांत वेदाची परीक्षा देऊन, 'वेदपारीण' ही पदवी शके १८६३ मध्यें संपादन केली. तसेंच, नगर येथेंही काळेश्वर मंदिरांत परीक्षा दिली. देऊळगांव-राजा येथील वेदशाळेवर अध्यापक म्हणून यांनीं दोन वर्षे काम केलें आहे.

वे. बापूदेव यांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें वेदपारायणें केलीं आहेत:—

१. नागपूर येथें भोंसला वेदशाळेंत जटा–पारायण. शके १८६९
२. वाशीम येथें बालाजी मंदिरांत घन–पारायण.
३. हैद्राबाद येथें सुलतान बाजारांत देवीच्या देवळांत घन–पारायण.
४. मंजरथ क्षेत्रीं घन–पारायण. शके १८७३
५. पंढरपूर येथें माला–पारायण.
६. मुंबई येथें जटेचें व मालेचें पारायण. शके १८७५
७. नांदेड येथें दोन महिनेपर्यंत प्रतिदिवशीं एक याप्रमाणें ६० संहिता–पारायणें केलीं.

वरील सर्व ठिकाणीं वे. बापूदेव यांचा यथायोग्य सत्कार करण्यांत आला. वे. बापूदेव यांनीं अनेक यज्ञयागांतून व अनुष्ठानांतून भाग घेतला आहे :—

१. अमरावती येथें अग्निष्टोम व अग्निचयनामध्यें यांना 'सदस्या'ची वर्णी देण्यांत आली होती. सदरचें अनुष्ठान श्री नारायणगुरु माहुलीकर यांनीं करविल होतें.

२. पुण्यास सन १९५९ मध्यें श्री. नंदे यांनीं वाजपेय यज्ञ करविला त्यांतही वे. बापूदेव 'सदस्य' होते.

३. श्री करपात्रीजी महाराज यांनीं मुंबईस लक्षचंडीचें अनुष्ठान केलें, त्यांत २५ क्रमांकाच्या कुंडाचें आचार्यत्व यांच्याकडे होतें.

४. विलेपार्लें येथें सूरजी वल्लभदास यांनीं केलेल्या यज्ञांत वेदपारायणाकडे वे. बापूदेव यांची योजना झाली होती.

५. पंढरपुरास श्री. श्रीकृष्ण लोहिया यांनीं करविलेल्या विष्णुयागांत दक्षिणेकडील कुंडाचें आचार्यत्व यांनीं केलें.

६. जालन्यास श्रीदत्तमहाराज मुंगळेकर यांनीं पंचकुंडी यज्ञ केला, त्यांत मुख्य आचार्यत्व वे. बापूदेव यांच्याकडे होतें.

७. श्रीक्षेत्र लोणी येथें भृगुसंहितेंतील अनुष्ठान झालें त्यांत त्यांनीं भाग घेतला होता.

८. याशिवाय बीड, माजलगांव, गेवराई, कुबेरम्हैसा, वडवणी, दिंद्रूड इ. अनेक ठिकाणीं चातुर्मास्य-यागांतून यांनीं काम केलें आहे.

वे. बापूदेव यांनीं वेदाध्यापनाचें कार्यही केलें असून, वे. राजाराम नागेश जोशी माजलगांवकर व वे. विश्वनाथ रंगनाथ जोशी यांनीं त्यांच्याजवळ त्रिपदीचें अध्ययन केलें आहे. याशिवाय वे. बापूदेव यांच्याजवळ स्मार्त याज्ञिकाचें अध्ययन पुष्कळ विद्यार्थ्यांनीं केलें आहे.

वे. बापूदेव यांची गणना महाराष्ट्रांतील मोठ्या वैदिकांत केली जाते. त्यांचें नेहमींचें वास्तव्य जालन्यास असलें तरी त्यांचा प्रवासही सतत चालू असतो.
यांच्या पत्नीचें नांव पार्वतीबाई. या गेवराई तालुक्यांतील तलवाड्याचे श्री. धुंडिराज केशव कुळकर्णी यांच्या कन्या आहेत.

वे. बापूदेव यांना पांच पुत्र व दोन कन्या अशी संतति आहे.

• • •

## ११९ : वे. गंगाधर प्रल्हाद वा[illegible]

### उमरखेड

यांचा जन्म सन १८४८ च्या सुमारास झाला. वे. गंगाधरभटजी अल्पवयांतच घर सोडून काशी येथें वेदाध्ययनाकरतां गेले. यांचे वडील सुखवस्तु होते. पण वे. गंगाधरभटजींस वेदाध्ययन करण्याची तीव्र लालसा असल्यानें, त्यांनीं काशी येथें बारा वर्षें वास्तव्य करून ऋग्वेदाचें घनान्त अध्ययन केलें. उपग्रंथही त्यांना उत्तम प्रकारें मुखोद्गत होते. तसेंच श्रौत–कर्मकांडाचीहि उत्तम माहिती होती. उमरखेडचे आहिताग्नि वे. गोविंदभटजी अयाचित यांनीं चातुर्मास्य याग केले. त्यांत वे. गंगाधरभटजींनीं आध्वर्यव केलें होतें. याशिवाय विदर्भांत होणाऱ्या निरनिराळया अनुष्ठानांतून यांनीं भाग घेतलेला होता. श्रीशंकराचार्यांनीं यांना 'वैदिकरत्न' अशी पदवी देऊन यांचा सन्मान केला होता. यांच्याजवळ १. वे. अंबादासभटजी वैद्य २. वे. गोविंदभटजी वैद्य असे शिष्य श्रौतस्मार्त याज्ञिकांत तयार झाले.

वे. गंगाधरभटजी वयाच्या ७० व्या वर्षीं वारले. यांचे पुत्र प्रल्हाद हेही नुकतेच दिवंगत झाले.

● ● ●

## १२० : वे. शा. सं. गणपति रामकृष्ण हेब्बार

### काशी

यांचा जन्म सन १९०७ मध्यें मंगळूरनजीक पण्णमबूर या गांवीं झाला. मंगळूर येथें शालेय शिक्षण घेऊन मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. इंग्रजी शिक्षण चालू असतांनाच घरीं सुरुवातीचें वेदाध्ययन झालें. नंतर शृंगेरीच्या श्रीशंकराचार्यांच्या प्रेरणेवरून वेदशास्त्रांचें शिक्षण घेण्याच्या उद्देशानें ते घर सोडून प्रथम इंदुरास गेले. तेथें सुमारें दोन वर्षें वास्तव्य करून साहित्य व व्याकरणाचा अभ्यास त्यांनीं केला. नंतर काशीस साङ्गवेद-विद्यालयांत पुढील शिक्षणाकरतां प्रविष्ट झालें. प्रथम वे. बाबागुरुजी पटवर्धन यांच्याजवळ

ऋग्वेदाचें साङ्ग अध्ययन वे. गणपतिशास्त्र्यांनीं पुरें केलें. नंतर संहिता, आरण्यक व निरुक्तावर असलेल्या सर्व भाष्यांचें परिशीलन करून, सार्थ वेदाध्यापन करण्याची त्यांनीं तयारी केली. पंडितराज राजेश्वरशास्त्री द्रविड यांच्याजवळ न्याय, वेदान्त व मीमांसा या विषयांचेंही पांडित्य संपादिलें. धर्मशास्त्र व ज्योतिर्गणित यांचाही त्यांनीं उत्तम अभ्यास केला.

पं. गणपतिशास्त्री यांचें विशेष उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे वेद व शास्त्रें यांचें अध्ययन कायम ठेवून, शिवाय त्यांनीं युरोपीय व भारतांतील अनेक भाषा अवगत करून घेतल्या आहेत. इंग्लिश, जर्मन, फ्रेंच या परकीय भाषा व संस्कृत, द्राविडी, तेलगू, मराठी, हिंदी, बंगाली, पंजाबी, उडिसा, नेपाळी, पाली, अर्धमागधी, इ. भारतांतील भाषा त्यांना येत असून, त्यांतून ते लेखन–वाचन करूं शकतात व बोलूं शकतात !

गेलीं १२ वर्षें ते काशीस साङ्गवेद-विद्यालयांत न्याय व वेदान्त या विषयांचे अध्यापक म्हणून काम करीत आहेत. सदर विद्यालयाच्या रजत-महोत्सवाच्या वेळीं भारतांतील श्रेष्ठ विद्वानांचा सत्कार करण्यांत आला. त्या वेळीं यांचा सत्कार होऊन, यांना ‘अध्यापकरत्न’ अशी पदवी देण्यांत आली.

सन १९३० पासून पुढें झालेल्या विद्वत्परिषदांमधून शास्त्रीय प्रश्नांच्या चर्चेंत यांनीं भाग घेतलेला आहे.

‘श्रीकृष्ण शर्मा’ या टोपण नांवानें त्यांनीं लेखनही केलेलें आहे. ‘गणेश’ या नांवाचें त्यांनीं हिंदीमध्यें एक पुस्तक लिहिलें असून, त्यांत डॉ. संपूर्णानंद यांनीं प्रदर्शित केलेल्या विचारांचें खंडन केलें आहे. काशीराजांनीं केलेल्या पुराण–संशोधनाच्या ट्रस्टमार्फत तयार होत असलेल्या ‘मत्स्यपुराणा’चे पं. गणपतिशास्त्री एक संपादक आहेत.

पं. गणपतीशास्त्री हे अविवाहित असून, कोणत्याही रीतीचा जवळ संग्रह न करतां, अयाचित वृत्तीनें राहातात.

• • •

# परिशिष्ट पहिलें

( वेदविद्या व वैदिक विद्वान यांना ऐतिहासिक कालांत किती मान दिला जात होता हें दिग्दर्शित करण्याकरतां नमुन्यादाखल कांहीं सनदा व पत्रें पुढें दिलीं आहेत. **संपादक** )—

## ( १ )

## सिद्धेश्वरभट बिन मेघनाथभट यांस मिळालेली सनद

श्रीसकल तीर्थस्वरूप वेदमूर्ति राजश्री सिद्धेश्वरभट बिन मेघनाथभट ब्रह्मे उपाध्ये, परगणे चाकण स्वामी गोसावी यांसी:—

आज्ञाधारक राजेश्री शिवाजी राजे बिन शहाजी राजे भोंसले, साष्टांग दंडवत, सुरु सन अर्बा खमसैन अलफ. पत्र लेहून दिधलें ऐसीजें, स्वामींच्या अनुष्ठानबळें आपण राज्यास अधिकारी जालों व सकळ मनोरथ चिंतिले पावलों, ऐसा अनुभव आला म्हणून व संकटकाळीं साहाकारी जाणोन, पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें स्वामींस वर्षासन होन पातशाही १०० शंभरी केले असेत. सदरहू वर्षासन यावत्काळ पर्यंत आपलें राज्य तावत्काळपर्यंत चालऊन यासी अन्यथा करूं अथवा पुढें कोणी आपलें वंशपरंपरेचा होऊन अन्यथा करील त्यास श्रीजीची व कुलस्वामीची व आपल्या पूर्वजांची व गोब्राह्मणांची आण असे. या वेगळें स्वर्ग देवतेच्या पूजनास श्रीनवचंडीमध्यें जपतपहवनास व ब्राह्मणभोजनास जें लागेल त्याची आज्ञा करीत जाणें. आज्ञेप्रमाणें प्राप्त करीत जाऊन. राज्य स्वामींच्या प्रसादाचें आहे. आपण आज्ञाधारक असों. जाणिजे. रसानगी छ १ माहे रमजान मोर्तब केलें असे.

( ता. १७ जुलै १६५३ ) रुजू

सुरुनिवीस

[ सनदा व पत्रें–चाड, पृ. ११३ ]

( २ )

वेदशास्त्रसंपन्न राजश्री चिमणभट टकले गोत्र शांडिल्य वास्तव्य जनस्थान स्वामीचे सेवेसी

सेवक पिलाजी जाधवराऊ दंडवत. सु॥ इहिदे सलासीन मया अलफ (१३ ऑगस्ट १७३०) तुमचेविसी सरदेसाई व देशमुख व देशपांडे प्रांत वसई व बहादुरपुरा व दवण याणीं येऊन विदित केलें कीं प्रा॥ मजकूर बहूत दिवस फिरंगियाखाले होता. यामुळें हिंदुधर्माचा लोप जाहला होता. सांप्रत राजश्री पंतप्रधान याणीं तुम्हास या प्रांते रवाना केलें. फिरंगियास मारुन काढिले. देश हस्तगत झाला. तेथें धर्मस्थापन झालें पाहिजे, याजकरतां वेदमूर्तीस गावगना दरगावास रु॥ धर्मादाव करुन द्यावा; त्याप्रमाणें पावत करुन म्हणून विदित केलें. त्यावरुन धर्मादाये दरगावास रुपया एक करार केला असे. त्याप्रमाणें घेऊन स्नानसंध्या करुन राजश्रीस कल्याण इछून सुखरुप राहाणें जाणिजे, छ १० सफर

पेशवे दत्तर, खंड १६ वा ] [ जमाव – रु. नं. १६६३

( ३ )

इ. स. १७६४।६५

वेदमूर्ति राजश्री कृष्णंभट बिन वीरेश्वरभट उपनाम चिपळोणकर, गोत्र अत्रि, सूत्र आश्वलायन, वास्तव्य माहुलीसंगम कृष्णातीर, यांणीं हुजूर येऊन निवेदन केलें कीं, महाराज राजश्री स्वामी यांची धाकटी स्त्री सौभाग्यवती जानकीबाई यांस देवाज्ञा जाहाली तें समयीं आपणांस भूमिदान संकल्प करून जमीन चावर १ एक देविली ते आपले दुमाला जाहली नाहीं, ते हल्लीं नेमून देऊन चालविली पाहिजे म्हणोन; व येविशीं महाराज राजश्री स्वामीचें पत्र पाठविलें त्यावरून धारादत्तपूर्वक दिली ते चालवणें जरूर जाणून, यांजवर कृपाळू होऊन मौजे कोडोली, तर्फ सातारा, येथें पांढरवाडीनजीक अवल,

दुम, सीम तीन प्रतीची वहीत जमीन चावर एक इनाम करार करून दिल्ही असे; तर सदरहू जामिनीचे चतुःसीमापूर्वक यांचे दुमाला करून देऊन जाबिताचीं इनामपत्रें सरकारचीं व राजपत्रें वंशपरंपरेचीं भोगवटियास करून देणें; आणि सदरहू जमीन यांजकडे साल दरसाल साल मजकुरापासून इनाम चालवणें, म्हणोन वेंकाजी माणकेश्वर यांचे नांवें, छ १८ जमादिलाखर. सनद १.

(ता. १२-१२-१७६४) [थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी-वाड; पृष्ठ ५२]

## (४)

## शांभट बिन रामभट महाबळेश्वरकर यांची वर्षासनाबद्दल सनद

वेदमूर्ति शांभट बिन रामभट श्रीमहाबळेश्वरकर; सूर्यउपासनी यांनीं हुजूर येऊन विदित केलें कीं, थोरले कैलासवासी स्वामी यांनीं गोपाळभट, आपले आजे यांजपासून मंत्र उपदेश संपादिला ते समयीं वर्षासन सुभा जावलीपैकीं करून दिल्हेः—

| | |
|---|---|
| होन पातशाही १०० | गल्ला नव शेरीबारुळें |
| वजन टकचंदी | ४८ तांदूळ |
| ·।४ तूप | ४८ नागली |
| ·।४ तेल | ८ |

येणेंप्रमाणें करून दिल्हे पाहिजे. त्यावरून मनास आणून देशाधिकारी परगणे मजकूर यांकडे दिल्हे छ ८ रमजान अशर.

[सनदा व पत्रें - वाड पृ. १४१]

## (५)

इ. स. १७९७।९८ मध्यें श्रावण मास दाक्षिणेंत खालीं लिहिलेल्या वैदिकांस मोठ्या दक्षणा वांटल्याच्या नोंदी आहेत :-

वै. ८

रु. २२५ वेंकट रंगाचार्य सुरापूरकर श्रीनिवासाचार्य यांचे पुत्र—
(आपस्तंभ वैदिक) पृ. २३१

३०० नथुभट मोगरे नाशिककर } आश्वलायन वैदिक
२०० महादेव दीक्षित पराडकर } पृ. २३२

[ दुसरे बाजीराव पेशवे यांची रोजनिशी- वाड]

इ. स. १७९८।९९

( ६ )

वेदमूर्ति सोमेश्वर दीक्षित सोमचयन, वाजपेय, बृहस्पतिसव, व सौत्रामाणित्रय, साग्निचित्त्य, पौंडरीक याजी नवपाठी कुशतर्पणकर हे मौजे मजकुरी गंगातीरीं त्रिसहस्रचयनयुक्त सर्वतोमुख यज्ञ करणार व बारा हजार ब्राह्मणभोजन यज्ञसागता घालणार त्यास साहित्य—

| वजन पक्कें | खंडी | | कित्ता कलमें |
|---|---|---|---|
| ३ | शाक भाजी हरजिनसी | १ | यज्ञास व ब्राह्मणभोजनास मंडप व बारा शाळा घालून देणें. |
| १५ | लांकडें जळाऊ | | |
| १८ | | १ | कुंडें घालावयास गवंडे व कामकाजास कामाठी नेमून देणें. |
| सुमारी | सुमार | | |
| १५००० | विटा मातीच्या पक्क्या | १ | कुंभारकाम व बुरुडकाम कार्या कारण लागेल तें व सुतार व लोहार यज्ञ पात्रें करावयास. |
| | | १ | समिधा व दर्भ व बेलफुलें व तुळशी लागतील त्या देणें. |
| | | १ | यूपस्तंभ सुमारें ४ चार देणें. |
| | | १ | चौकी पहाऱ्यास प्यादे व वाजंत्री व नगारा वाजवावयास देणें. |
| | | ६ | |

येकूण आठरा खंडीं वजन पक्कें व तीस हजार सुमारीं व सहा कलमें सदरहूप्रमाणें देविलें असे. तरी फडफर्मासीचें सामान व बेगारीचीं माणसें मिळतील तीं देऊन बाकीचें सामान राहील तें खरेदी करून देणें, वाजवी किंमत पडेल तें मजुरा दिल्ही जाइल. म्हणून हरि भिकाजी कमाविसदार मौजे कुशतर्पण परगणें बालकोंडा यांचे नांवें. सनद १ रसानगी यादी

[ दुसरे बाजीराव रोजनिशी – वाड. पृ. २५७ ]

( ७ )

वे. दत्तात्रय बळवंत पाठक दीक्षित यांच्या माहितींत (पृष्ठ ५९ वर) उल्लेखिलेली सनद व पत्र याखालीं दिलें आहे.

श्री द्रौपदीबाई
पवार

सुरू सीत समानीन मया व अलफ

राजश्री वर्तमान भावी कमाविसदार मौजे उंटावद
व गुणावद प्रा॥ धार गोसावी यांसी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रती सौ॥ संपन्न द्रौपदीबाई पवार दंडवत सु॥ सीत समानीन मया व अलफ वो॥ राजश्री येशवंतभट दीक्षित यांनीं कवाठियाचे मुकामीं विनंति केली कीं आमची वार्धिका दशा चालले पाहिजे हें मान्य करून मौजे मजकुरी रुपये २०० दिल्हे असत. हे सालदरसाल दीक्षितबाबास देत जाणें. नवीन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची नक्कल घेऊन हें पत्र बाबास भोगवाटियासी देणें. जाणिजे छ २७ माहे सवाल (ता. २–९–१७८५).

श्री द्रौपदीबाई
पवार

( ८ )

वेदमूर्ति राजश्री यशवंतभट दीक्षित यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रती सोदी संपन्न द्रौपदीबाई पवार दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत असीले पाहिजे. विशेष तुम्ही विनंति केली की आमची वार्धिक दशा अग्निहोत्र चाललें पाहिजे. याजकरतां विनंति मान्य करून वर्षासन प्रा॥ धार येथील गाव मौजे गुणावद व उंटावद येथें वर्षासन करून दिल्हे.

१०० मौजे गुणावद
१०० मौजे उंटावद
२००

एकूण दोनशे रुपये देवविले असत. हे साल दरसाल घेत जाणें. आमचें अभीष्ट चिंतन करून असावें. हें दानपत्र लिहून दिल्हे असे. छ २७ माहे सवाल बहुत काय लिहिणें हे विनंति.

( ९ )

पेशवे दप्तर रु. २९३ ] [ शके १७३४ वैशाख

( दुसरे बाजीरावसाहेब पेशवे यांचे खासगी जमाखर्च )

९००० शहर नाशिक येथें आमचे वाडे दोन आहेत. तेथें विद्यार्थ्यांच्या शाळा ३ दर शाळेंत पंचवीस विद्यार्थी व गुरु यांस एकंदर भोजन वगैरे कुलखर्च गुरूंस वर्षासनासुद्धां बेगमीचे १ सालापावेतों.

३००० गु॥ गणेशभट उपाध्ये ऋग्वेदी यांची शाळा
३००० गु॥ वैजनाथ दीक्षित „ „
३००० गु॥ चिंतामणभट करलेकर हिरण्यकेशी व आपस्तंभ यांची शाळा.

९००० 

( लिमयेंकुल – वृत्तान्त, पृ. ४७ )

# परिशिष्ट दुसरें

श्रीमंत तात्यासाहेब मिरजकर यांनीं मिरजेस शके १८६६ मध्यें संहिता–स्वाहाकार केला त्याप्रसंगीं बोलाविलेल्या वैदिकांचा फोटो या पुस्तकांत अन्यत्र छापला आहे. त्या फोटोंतील नांवें :—

**बसलेले** ( डावीकडून ) १ वे. दत्तुशास्त्री मेणवलीकर, २ वे. गोविंदभटजी मांडवगणे, ३ वे. गोविंदभटजी फाटक, ४ वे. काशीनाथभटजी केळकर, ५ वे. कृष्णंभटजी परांजपे, ६ वे. चिंतामण दीक्षित वाटवे, ७ वे. गोविंद दीक्षित पटवर्धन, ८ वे. वामन दीक्षित अथणीकर, ९ वे. जावडेकर, १० वे. धोंडभटजी बेहेरे ११ वे. विनायक चिंतामण ( बंडंभट ) केळकर, १२ वे. पुरुषोत्तम दीक्षित वाटवे १३ वे. जोशी, १४ वे. सदाशिव सीताराम ( नाथ ) जोशी

**मध्यभागीं उभेः—** १ श्रीमंत तात्यासाहेब पटवर्धन, २ श्री. सौ. राणीसाहेब व ३ राजकन्या, मिरज

---

# सूचि

पुस्तकाच्या या दुसऱ्या भागांत ज्यांच्या नांवाचा उल्लेख आला आहे त्या बहुतेकांचा समावेश या सूचींत केला आहे. त्यांपैकीं ज्यांचा परिचय या पुस्तकांत छापला आहे, त्यांच्या नांवामागें + अशी खूण केली आहे.


अणे लो. ना. बापूजी १००
अभ्यंकर आण्णाभटजी ४, ६, १६, १९, ४१, ८१, ९७
अभ्यंकर गंगाधरशास्त्री ९७
अभ्यंकर जनार्दन विनायक ९७
अभ्यंकर नागेश्वर गणेश ९३
अभ्यंकर रामचंद्र काशीनाथ ९७
अभ्यंकर पं. वासुदेवशास्त्री ९७
+ अभ्यंकर सदाशिव ( बाळंभट ) गंगाधर ९७
+ अयाचित गोविंद महादेव ९८
अयाचित दादंभटजी ९८
+ अयाचित राजेश्वर काशीनाथ ९९
+ अयाचित रेणुकादास (दासंभटजी) राजेश्वर ९९
आगाशे हरि बाजी ७५
आचवल सोनभटजी ३३, ३७
+ आठवले गोपीनाथ काशीनाथ ३
+ आठवले गोविंद सदाशिव ४
आठवले महादेव गोपीनाथ ३
आठवले रामचंद्र गोपीनाथ ३
आठवले सदाशिव लक्ष्मण ४
+ आठल्ये गणेश सखाराम १
आठल्ये बाळशास्त्री ५७
+ आठल्ये विनायक सीताराम २, ११
आठल्ये सखाराम ( सुखानंद ) वासुदेव १
आठल्ये सीताराम भास्कर २
आपटे आण्णाभटजी १६
+ आपटे दीक्षित केशव नारायण ४, २४
आपटे दीक्षित नारायण कृष्ण ४
आपटे रामभटजी १६
आपटे विष्णु दीक्षित ४
आळतेकर श्रीधर बाळकृष्ण १०६
इचलकरंजीकर श्रीमंत ९४
+ उत्तरेश्वरी नारायण रामचंद्र ५
उपाध्याय अनंत महाबळेश्वर १५

उपाध्ये गणेशभट ११६
उप्पुंद विश्वेश्वर नागेंद्र १५
+ ओक रामचंद्र विष्णु ६
करपात्रीजी स्वामी महाराज ४, १२, ३४, ४४
करलेकर चिंतामणभट ११६
+ करंबेळकर भालचंद्र वामन ६,१३,२८
करंबेळकर वामन गंगाधर ६
कशाळीकर गंगाराम रामकृष्ण ६
कशाळीकर शंकरशास्त्री ६
कागलकर सखाराम नरहर ८३
+ कांणे गदाधर उद्धव ८
+ कानगांवकर गजानन गोपाळ १००
कानगांवकर गोपाळ गंगाधर १००
कानिटकर नृसिंहभटजी २
काळे जनार्दनभटजी ४
+ काळे बाळ दीक्षित ८, ३२, ३३, ८०
काळे बाळंभट भाऊ २२, ७४
+ काळे विष्णु ( बाळंभट ) हरि ९, १३, ३०, ३४, ७९, ८९
काळे सोनू दीक्षित ९
किंजवडेकर गोपाळ धोंडो ११
+ किंजवडेकर दत्तात्रय पांडुरंग ७, ११, ६६
किंजवडेकर धोंडभटजी ११
किंजवडेकर नृसिंहशास्त्री ११, १२
केडगांवकर नारायणमहाराज ७०, ७४
केतकर डॉ. श्री. व्यं. ७२
केसरी ३९
+ केळकर काशिनाथ नारायण २, ११, ७५, ७६, ८१, ९१, १०१, १०३
केळकर धोंडु दीक्षित ३७
केळकर नारायण नीळकंठ १०१
केळकर नारायण हरि ११
केळकर पुरुषोत्तम नारायण १०१
केळकर वामन ( आण्णासाहेब ) बल्लाळ २७
केळकर विनायक केशव ७६
+ केळकर विनायक चिंतामण १३
+ केळकर विश्वनाथ दिनकर १४
केळकर विष्णुभटजी ५२
कोंडलेकेरे रामचंद्र गणेश १५, १७
कोरान्ने दामोदरशास्त्री ५६
कोल्हटकर अच्युतराव ७२
खरे अनंत केशव १४
खरे केशव गणेश १५
+ खरे गणेश अनंत १४
खरे रामभटजी १९, ६३, ९०
खरे नारायणभटजी ६३
खेलावाड चुनीलाल ९
खेलावाड रामचंद्र ३७
गर्गे दत्तंभटजी १०४

+ गद्रे परशुराम महादव १६
गद्रे महादेव बापू ४१
गद्रे रामभटजी ४
गाडगीळ गुरुजी रघुनाथ परशुराम २५, २६, ४८
गाडगीळ महादेव बाळंभटजी २९
गायकवाड श्रीमंत खंडेराव १, ४०
गुळवणी लक्ष्मण दीक्षित २६
गोखले कृष्णंभटजी ६९
गोखले गोपाळभटजी १८
गोखले दत्तात्रय सीताराम १९
गोखले बल्लाळ विठ्ठल १९
+ गोखले भास्कर परशुराम १७
गोखले वामन गोपाळ १८
गोखले वामन सदाशिव ८९
+ गोखले वासुदेव वामन १८
गोखले शंकरभटजी ४१, ८६
+ गोखले सीताराम बल्लाळ १७, १९
गोगटे कृष्णंभटजी १६
गोगटे गणेशभटजी १९
+ गोगटे बाळकृष्ण विष्णु १९
गोगटे विष्णु प्रभाकर १९
गोडखिंडीकर गणेश दीक्षित ४१
गोडबोले कृष्णशास्त्री ७१
+ गोडबोले गजानन महादेव २०
गोडबोले परशुराम गोविंद २०
गोडबोले महादेव बाळंभट २०
गौतमभटजी ५६
+ गोरे गोपाळ पांडुरंग १०२
गोरे गोपाळ राजाराम ३३
+ गोरे दत्तात्रय रामकृष्ण २१, २२
गोरे पांडुरंग सीताराम १०२
+ गोरे रामकृष्णभटजी २०, ३३
घाटे गोपाळभटजी ३७
घैसास परशुरामभटजी २३
+ घैसास विनायक हरि १३, २२, ३६
घैसास सोमनाथ दाजी २३
घैसास हरि भास्कर २२
घोरपडे श्री. बाबासाहेब ६२
+ चांदेकर गंगाधर मणीराम २४
चितळे महादेव दीक्षित ९
चित्रिगेमठ गजानन सुब्रह्मण्य २४
चित्रिगेमठ गणपती सुब्रह्मण्य २४
+ चित्रिगेमठ सुब्रह्मण्य महाबलेश्वर २४
चिपळोणकर कृष्ण वीरेश्वर ११२
जाधवराव पिलाजी ११२
जामखेडकर भालचंद्रभटजी ४
+ जावडेकर अनंत नीळकंठ २५
जावडेकर नीळकंठभटजी २५
जायदे वासुदेवभटजी ११
जोगळेकर नरहरभटजी ९५
जोगळेकर नरूदादा ७७
जोगळेकर नीळकंठ बाळकृष्ण २५
+ जोगळेकर बाळकृष्ण वासुदेव २५
जोगळेकर रावजीभटजी १६

जोगळेकर वामनभटजी ५६
+ जोशी ( येड्डरकर ) अनंत नीळकंठ २६, ८३
+ जोशी कृष्ण नारायण १०३
जोशी केशव गणेश ५२
जोशी खंडो हरी २८
+ जोशी गजानन सादाशिव २७
+ जोशी चिंतामण विश्वनाथ २८
जोशी ( गोळपकर ) जनार्दन-शास्त्री ३९
जोशी तिवरेकर २२, ७४
+ जोशी दत्तात्रय विष्णु ( मेणवलीकर ) २९
+जोशी दिनकर बाळकृष्ण ८, ३०, ३२
जोशी दत्तभटजी ८०
+ जोशी नरहर बाळंभटजी ३०
जोशी नारायण विनायक ३३
जोशी ( येड्डरकर ) नीळकंठ विरूपाक्ष २६
जोशी ( मेणवलीकर ) परशुराम ( बाबाजी ) सदाशिव २९
जोशी श्री. पोतनीस ७७
जोशी बाळकृष्ण सदाशिव २७
जोशी पं. महेश्वर सदाशिव २७
+ जोशी रघुनाथ विठ्ठल ३१
जोशी रंगनाथभटजी ५२
+ जोशी रामकृष्ण दिनकर ९, ३० ३२, ३३ )
जोशी ( येड्डरकर ) रामचंद्र अनंत २६
+ जोशी ( घांगरेकर ) रामचंद्र बजंभट २२
+ जोशी रामजी दिनकर ९, ३०, ३२, ४३, ९५, १०५
जोशी कल्होळकर वासुदेवभटजी ८३
जोशी विठ्ठल विनायक ३१
+ जोशी विनायक नारायण २०, ३३, ४४, ४६
जोशी ( मेणवलीकर ) विष्णु परशुराम २९
जोशी ( घांगरेकर ) विश्वनाथ ( बजंभटजी ) बहिरव २२
जोशी विश्वनाथ हरि २८
जोशी सदाशिव रामचंद्र २७
+ जोशी सदाशिव ( नाथ ) सीताराम ३४
टकले चिमणभट ११२
टिळक दत्तात्रय वासुदेव १०१
टिळक नरहरि वासुदेव ११
टिळक लो. १००
+ ठकार गणेश शिवराम ३५
+ डोंगरे केशव गणेश ३६
+ डोंगरे विनायकभटजी ३७, ५१, ९५
ताम्हनकर बापूभटजी ६
+ तोरो वासुदेव रामचंद्र ३८, ८७
द्रविड पं. राजेश्वरशास्त्री ११०

द्राविड पं. लक्ष्मणशास्त्री ५१
+ दातार गंगाधर मणिराम ३८
+ दातार गणेश विश्वनाथ ४०
दातार नारायण गणेश ४०
+ दाते काशीनाथ महादेव ४०
दाते कृष्णाजी पांडुरंग १५
दाते जनार्दन रघुनाथ ४१
+ दाते महादेव जनार्दन ४०,४१
दामले बाळंभटजी दत्तात्रय २६
दीक्षित बाळंभटजी ४२
+ दीक्षित यज्ञेश्वर नारायण ४२
दीक्षित वैजनाथ ११६
दीक्षित सोमेश्वर ११४
देव आण्णासाहेब ५३
देव गणपती ५०
+ देव दामोदर बाळकृष्ण ४२
देव नारायणभटजी १०४
+ देव वामन गंगाधर ३३,४३
+ देव विश्वनाथ वामन १३, ४४,५०, ९२
+ देव श्रीकृष्ण वामन ४६
देवस्थळी अनंतभट २
+ धारप गोविंद काशीनाथ ४८
धारूरकर पं. भगवानशास्त्री १०२
धुपकर गुरुजी ८
नवाथे गंगाधरभटजी ३५
+ नवाथे दत्तात्रय गणेश ४८
नागर रामेश्वर दीक्षित ९
नातू बाळाजीपंत ३८
नातू लक्ष्मण दीक्षित १०३
नातू वासुदेव दीक्षित १०३
+ नातू शंकर दीक्षित वासुदेव ५, २०, ८६, १०३
नानल आयुर्वेदाचार्य ६
निगुडकर दत्तात्रय वासुदेव ६४
निजसुरे गजानन रामकृष्ण ५४
+ नेने गोपाळ गंगाधर ४९
+ पटवर्धन अनंतराम भिकाजी ४४,५०,५१,५२,५२, १०९
पटवर्धन आबासाहेब ७५
पटवर्धन गणेशभटजी ३५
+ पटवर्धन गोविंद नारायण ५०
पटवर्धन दाजीसाहेब ६६
पटवर्धन नारायण कृष्ण ५०
+ पटवर्धन भिकाजी बळवंत ३३,३७,५०,५१,९२
पटवर्धन यशवंत अनंतराम ५०
पटवर्धन वासुदेवशास्त्री ७१
+ परांजपे कृष्णाजी बापू ५२
परांजपे गणेश वासुदेव ९४
परांजपे बापू (नरहर) वामन ५२
+ परांजपे महादेव धोंडो ५३
पराडकर महादेव दीक्षित ११४
पवार सर आनंदराव ५७
पवार श्रीमंत द्रौपदीबाई ११५,११६

पवार श्री.यशवंतराव महाराज ५७
प्रकाशकर नारायण रामचंद्र ५६
\+ प्रकाशकर रामचंद्र गणेश ५५
प्रभुणे कृष्णंभटजी ६
प्रभुणे रामभटजी ३५
पांचगांवकर विनायकभटजी ९
\+ पाठक गणेश रंगनाथ ५६
\+ पाठक दीक्षित दत्तात्रय बळवंत ५९
\+ पाठक औसेकर प्रल्हाद रामचंद्र १०४
पाठक यशवंत दीक्षित ११५, ११६
पाठक औसेकर रामचंद्र विष्णु १०४
पाठक औसेकर विष्णुआप्पा १०४
पाध्ये बाबूभटजी ५२
पाध्ये महादेव बाळकृष्ण ६०
\+ पाध्ये महेश्वर महादेव ६०,६१,६५,६७
पाध्ये रामचंद्र नारायण ६१
\+ पाध्ये सखाराम महेश्वर ६१,६७
पानगांवकर दत्तात्रय भालचंद्र ५१
पानगांवकर भालचंद्र दीक्षित ९५
पातुरकर रामभटजी १०५
पावगी वामनभटजी ४८
पाटील नारायणभटजी ७५
पालकर गुरुजी ७०–७४
पाळंदे अनतभटजी ६३
\+ पाळंदे हणमंत नारायण ६३
पित्रे भिकंभटजी मोरेश्वर २७, ६४
पित्रे विष्णु महादेव ६४
पुणतांबेकर अनंतभटजी ५०
\+ पुराणिक वासुदेवाचार्य ६३, १०२
पुजारी बाळंभटजी ८३
पुरोहित गोपाळ बाळकृष्ण ६४
\+ पुरोहित महादेव गोपाळ २, ६०, ६४
पुरोहित वासुदेव महादेव ६५
पुरंदरे सरदार ३५
पेंडसे बाळंभटजी ३, २१
पंतप्रतिनिधि श्री.बाळासाहेब ७१
पंतसचिव श्रीमंत १०६
फडके रामकृष्ण दीक्षित ३३, ६५
फडके विनायक परशुराम ७५
\+ फडके विनायक रामकृष्ण ६५
फडणीस मेणवलीकर २९
\+ फणसळकर रामचंद्र सदाशिव १३, ६६, ६९
\+ फणसळकर विनायक विठ्ठल ६७, ६८
फणसळकर शंकरभटजी ६७
\+ फणसळकर सदाशिव विनायक ६६
फाटक गोविंद भिकाजी ६, २३, २८
फाटक जनार्दनभटजी ९१
ब्रह्मे सिद्धेश्वर मेघनाथ ११९

बापट दीक्षित अनंत नीळकंठ ७१
बापट कृष्ण यज्ञेश्वर ७०
बापट दीक्षित गणेश अनंत ७१
बापट गणेश कृष्ण ७३
+ बापट गणेश ( सोमनाथ ) विश्वनाथ ६९
+ बापट दीक्षित गोविंद धोंडदेव ७०
+ बापट दिक्षित धुंडिराज गणेश ४७, ७०
बापट दीक्षित धोंडदेव कृष्ण ७३
बापट परशुराम कृष्ण ७३
+ बापट पांडुरंग परशुराम ७३
बापट रामदीक्षित ९०
बापट वामन विष्णु ७४
+ बापट दीक्षित विष्णु धोंडदेव ७३
बिवलकर श्री. भाऊसाहेब १
बुल्हर डॉ. जॉन ५७
+ बेंहेरे गणेश ( दाजी ) विश्वनाथ ७४
+ बोरकर विठ्ठल दुर्गाराम ७५
+ भातखंडे वासुदेव हरि ११, ७६
भातखंडे हरि वामन ७६
भावे महादेव गणेश ७७
भावे रामभटजी ९१
+ भावे सखाराम महादेव ७७
+ भिडे भास्कर विष्णु ७७
+ भिडे विश्वनाथ नारायण ५, ७८
भिडे विष्णु दीक्षित ७८
भोसले शिवाजी राजे बिन शहाजी राजे १११
मॅक्सम्युलर डॉ. ५७
मराठे नारायण चिंतामणि ७९
+ मराठे रामकृष्ण नारायण ७९
+ महाडकर कृष्ण दीक्षित चिंतामण ९, ८०
महाडकर दामोदर कृष्ण ८०
महाबळेश्वरकर कृष्ण दीक्षित १०६
+ महाबलेश्वरकर काशीनाथ १५ महादेव १०५
+ महाबलेश्वर गणेश कृष्ण १०६
महाबळेश्वरकर गोपाळभट ११३
महाबलेश्वरकर दत्तात्रय १५
महाबळेश्वरकर महादेव यज्ञेश्वर १०५
महाबळेश्वरकर यज्ञेश्वर दीक्षित १०५
महाबळेश्वरकर शांभट बिन रामभट ११३
+ माजलगांवकर उत्तरेश्वर ( बापूदेव ) अंबादास १०७
+ माजलगांवकर अंबादास रघुनाथ १०७
+ मांडवगणे गोविंद रामकृष्ण ११, ८०

माणगांवकर सखाराम
( बाळंभटजी ) वासुदेव ६१, ६२, ६६
मालवीय पं. मदनमोहन ७७
मिरजकर, श्रीमंत २४, ४९, ५१, ७९, ८७
मेहेंदळे नारायण भास्कर ८०
+ मेहेंदळे वामन नारायण ८१
म्हैसकर त्र्यंबकभटजी १०३
मोगरे नथुभट ११४
मोघे त्रिंबकभट २
+ मंजूळ त्र्यंबक लक्ष्मण ( दाजी ) ८२
मंजूळ दाजी भिकाजी ८२
+ येद्दूरकर सखाराम बाळकृष्ण ८३
रटाटे रामभटजी ९
+ रमणी चंद्रशेखर ८५
रानडे न्या. मू. ३९
रानडे बाळंभटजी ४१
राजेंद्रप्रसाद डॉ. ८५
रामडोहकर बापूभट ९
रास्ते श्री. सरदार १९, २०
लिमये गणेश बळवंत १६
लेले गंगाधर राजाराम ३६, ६९
लेले त्र्यंबक रामचंद्र ८६
+ लेले नीळकंठ त्र्यंबक २०, ८६
लेले भाऊशास्त्री ७२
+ लेले वेणीमाधव ( भिकू दिक्षित )
विद्याधर १७, २४, ६९, ८७
लेले विष्णु ( आप्पा ) बाळकृष्ण २३
लोंढे निळंभटजी ४
वझे पं. भाऊशास्त्री २२
+ वाटवे गणेश बाळकृष्ण ८७
वाटवे गोविंद बाळंभट ८८
+ वाटवे चिंतामणी श्रीपाद ८८
+ वाटवे नीळकंठ ( बापू ) गोविंद ८९
वाटवे बाळ दीक्षित ८७
वाटवे श्रीपाद बाळंभटजी ८८
+ वाटेगांवकर गंगाधर लक्ष्मण १०९
वासुदेवानंद सरस्वती
( श्री टेंबे स्वामी ) ५६, ५९, ८३
विजयानगरम्चे राजे विजयराम ९५
+ विनोद लक्ष्मण विष्णु ४,८१,८९
वैद्य सखारामशास्त्री ४६
श्रीशंकराचार्य १२,१५,२३,४५, ५२,५५,६७,७२,८२,८५, १००,१०१,१०९
शाळिग्राम त्र्यंबकशास्त्री ३८
शाळिग्राम पंढरीनाथ नागेश ३५
+ शेंड्ये मुरलीधर वासुदेव ९०
शेवडे जगन्नाथराव १९

शेवडे बापूभटजी ८१
सचिव शंकराजी नारायण ९७
सप्रे दिवाकरभटजी ५६
+ सप्रे बाळकृष्ण महादेव ५१,९२
सहस्त्रबुद्धे विठ्ठलभटजी ७७
+ साठे गोविंद विश्वनाथ ९२
साठे विश्वनाथ गोपाळ ९२
साठ्ये पुरुषोत्तम विश्वनाथ ९३
+ साठ्ये विश्वनाथ रामचंद्र ९३
सातवळेकर पं. ६२
+ साने गणेश श्रीधर ९४
साने वासुदेवभटजी ३५
सुरापुरकर वेंकटरंगाचार्य ११४
सोलापुरकर रामचंद्रशास्त्री ९४
+ सोलापुरकर सोमनाथ गदाधर ३३, ९४
+ हर्डीकर काशीनाथभटजी ३७,९५
हर्डीकर गंगाधर काशीनाथ ६५,९५
+ हळबे आत्माराम विनायक ९६
हळबे भालचंद्र सखाराम ४३
हळबे रामचंद्र नारायण ६०
हळबे विनायक कृष्ण ९६
+ हेब्बार गणपतिशास्त्री रामकृष्ण ५०,१०९

# शुद्धिपत्र

खालीं लिहिल्याप्रमाणें चुकीचीं नांवें या पुस्तकांत छापलीं गेलीं आहेत. पहिली चूक आमच्या नजरचुकीनें झाली असून, बाकीचीं नांवें प्रथम माहिती मिळाली ती चुकीची मिळाल्यानें, चुकीचीं छापलीं गेलीं आहेत. कृपया सदरचीं नांवें दुरुस्त करून वाचावीं अशी विनंति आहे. झालेल्या चुकीबद्दल आम्ही दिलगीर आहोंत.

( १ ) पृष्ठ ४९ वर वे. गोपाळ गंगाधर नेने यांच्या वडिलांचें नांव गोपाळ विष्णु असें छापलें गेलें आहे, तें गंगाधर विष्णु असें वाचावें.

( २ ) पृष्ठ ९८ वर वे. गोविंद बापू अयाचित यांची माहिती आहे. बापू हें त्यांचें स्वतःचें टोपणनांव असून, सबंध नांव गोविंद महादेव असें पाहिजे. तसेंच त्यांच्या वडिलांचें नांव बापूभट महादेव याऐवजी महादेव काशीनाथ असें वाचावें.

( ३ ) पृष्ठ ९९ वर वे. राजेश्वर महादेव अयाचित याऐवजीं राजेश्वर काशीनाथ असें वाचावें.

( ४ ) पृष्ठ ९९ वर वे. दासंभटजी अयाचित यांच्या वडिलांचे नांव राजेश्वर महादेव असें छापलें आहे, त्याऐवजीं राजेश्वर काशीनाथ असें वाचावें.

( ५ ) पृष्ठ १०९ वर वे. गंगाधरभटजी वाटेगांवकर यांचें नांव गंगाधर प्रल्हाद असें छापलें आहे, तें गंगाधर लक्ष्मण असें वाचावें.

## पुणें वेदपाठशाळेचीं प्रकाशनें

# वैदिक विद्वानांचा परिचय

भाग १ व २

संपादक—: श्री. सी. वि. केळकर

मूल्य— भाग १ ला रु. ३; भाग २ रा रु. ४; शिवाय ट. ख. दोन्ही भाग एकदम घेणारांस रु. सहा, अधिक ट. खर्च.

दोन्ही भागांत मिळून गेल्या शें—दीडशें वर्षांतील २३७ वैदिक विद्वानांचा परिचय करून देण्यांत आला असून, आर्टपेपरवर ५९ फोटो छापण्यांत आलेले आहेत. प्रत्येक वेदाभिमानी गृहस्थानें हे दोन्ही भाग संग्रहीं ठेवणें आवश्यक आहे.

★

## पुणें वेदपाठशाळा या संस्थेच्या

# कार्याचा इतिहास

लेखक—: श्री. चिं. ग. काशीकर

मूल्य रु. एक, अधिक ट. ख.

वेदशाळेच्या अमृतमहोत्सवाच्या प्रसंगीं प्रकाशित केलेला. यांत संस्थेच्या ८१ वर्षांतील कार्याचें सविस्तर इतिवृत्त देण्यांत आलें असून, महाराष्ट्रांतील नव्याजुन्या वेदशाळांचीही संक्षिप्त माहिती देण्यांत आली आहे.

— वरील पुस्तकें मिळण्याचें ठिकाण —

**पुणें वेदपाठशाळा,**

**३८ बुधवार पेठ, जोगेश्वरीजवळ, पुणें २.**